सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
सोलापूर गुरुवार, २५ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक २०७ | पाने १२ | किंमत रु. ८/-

# सोलापूरच्या उजनी धरणातील गाळ अखेर काढणार!

■ राज्यातील सात मोठ्या धरणांतून गाळ काढण्यासाठी सरकारी धोरण जाहीर

■ मिळणारा महसूल संबंधित प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व सुधारणांसाठी वापरणार

**मुंबई, दि. २४ जून-**

सोलापूरची वरदायिनी उजनी धरणातून गाळ काढण्याचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. राज्यातील मोठ्या सिंचन प्रकल्पांची जल साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सात मोठ्या पाटबंधारे प्रकल्पांमधून प्रायोगिक तत्त्वावर गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्याचे सुधारित धोरण जाहीर केले आहे. जलसंपदा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध केला असून, या प्रक्रियेतून मिळणारा महसूल संबंधित प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व सुधारणा कामांसाठी वापरण्यात येणार आहे. राज्यात सध्या ८६ मोठे, २९८ मध्यम आणि ३,३१३ लघु, असे एकूण ३,६९७ सिंचन प्रकल्प आहेत. वर्षानुवर्षे धरणांमध्ये गाळ साचल्याने जलसाठवण क्षमता कमी होत असून त्याचा परिणाम सिंचन, पिण्याचे पाणी आणि वीज निर्मितीवर होत आहे. या पार्श्वभूमीवर धरणांमधील गाळ काढून जलाशयांची क्षमता वाढविण्यासाठी राज्य सरकारने हे धोरण आणले आहे.



शासनाच्या या धोरणांतर्गत पुढील सात मोठ्या प्रकल्पांमध्ये गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्यास मंजुरी देण्यात आली आहे. उजनी धरण (सोलापूर), नांदूरमध्यमेश्वर/नगरणा प्रकल्प (नाशिक), गोसीखुर्द प्रकल्प (भंडारा), मुळा प्रकल्प (अहिल्यानगर), जायकवाडी प्रकल्प (छत्रपती संभाजीनगर), हतनूर धरण (जळगाव), कोयना प्रकल्प (सातारा) या प्रकल्पांमधील कामे संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांमार्फत करण्यात येतील. या उपक्रमाचा वार्षिक आढावा घेऊन दरवर्षी ३० एप्रिलपर्यंत शासनाला अहवाल सादर करावा लागणार आहे.

गाळमिश्रित वाळूमधून वेगळी करण्यात आलेली वाळू महसूल विभागाच्या नियमांनुसार स्वामित्व शुल्क भरून विक्री करता येणार आहे. वाळूच्या विक्रीतून मिळणारा महसूल संबंधित सिंचन प्रकल्पांच्या पुनर्स्थापना व आधुनिकीकरणासाठी वापरण्यात येईल. धरणातून काढण्यात आलेला गाळ शेतकऱ्यांना त्यांच्या स्वतः च्या शेतात वापरण्यासाठी कोणतेही स्वामित्व शुल्क न आकारता उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मात्र, गाळाची वाहतूक शेतकऱ्यांना स्वतःच्या खर्चाने करावी लागेल. या निर्णयामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होणार आहे. धरणातील गाळाच्या प्रमाणानुसार निविदेचा कालावधी ठरविण्यात आला असून तो पुढील प्रमाणे आहे.

५० दशलक्ष घनमीटरपर्यंत गाळ - ५ वर्षे, ५० ते १०० दशलक्ष घनमीटर - ७ वर्षे, १०० दशलक्ष घनमीटरपेक्षा जास्त - १० वर्षे असा असणार आहे.

### राज्यातील सर्व धरणांसाठी मार्ग मोकळा

या सात प्रकल्पांवरील प्रायोगिक उपक्रमाचा अनुभव लक्षात घेऊन पुढील काळात राज्यातील इतर मोठ्या आणि मध्यम प्रकल्पांमध्येही गाळ व गाळमिश्रित वाळू काढण्याचे सुधारित धोरण लागू करण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच मोठे, मध्यम आणि लघु प्रकल्पांमधील गाळ शेतकऱ्यांना विनाशुल्क उपलब्ध करून देण्यासही शासनाने मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे धरणांची जलसाठवण क्षमता वाढणे, सिंचन व्यवस्था मजबूत होणे, शेतजमिनींची सुपीकता सुधारणे आणि शासनाला महसूल मिळणे असे बहुआयामी फायदे अपेक्षित असल्याचे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे.

### या धरणांचा समावेश

उजनी धरण (सोलापूर), नांदूरमध्यमेश्वर/नगरणा प्रकल्प (नाशिक), गोसीखुर्द प्रकल्प (भंडारा), मुळा प्रकल्प (अहिल्यानगर), जायकवाडी प्रकल्प (छत्रपती संभाजीनगर), हतनूर धरण (जळगाव), कोयना प्रकल्प (सातारा)






CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



## एसपीएम स्कूलमध्ये विद्यार्थी परिषद निवडणूक

**सोलापूर, दि. २४ जून-**

शि. प्र. मंडळी, पुणे संचलित एस. पी. एम. इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थी परिषद निवडणूक लोकशाही पद्धतीने संपन्न झाली. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत लोकशाही मूल्यांचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. निवडणुकीसाठी शाळेमध्ये स्वतंत्र मतदान केंद्र उभारण्यात आले होते. निवडणुकीपूर्वी उमेदवारांनी आपल्या निवडणूक जाहीरनाम्याद्वारे शाळेच्या विकासासाठीच्या कल्पना आणि उद्दिष्टे विद्यार्थ्यांसमोर मांडली. विद्यार्थ्यांनीही उमेदवारांच्या विचारांचे बारकाईने निरीक्षण करून मतदानाचा हक्क बजावला. निवडणूक प्रक्रियेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या होत्या. काही विद्यार्थ्यांनी मतदान अधिकारी, सहाय्यक अधिकारी, मतदार नोंदणी कक्ष, शिस्त पथक, स्वागत पथक, घोषणा व जनजागृती पथक अशा विविध भूमिका पार पाडल्या. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेत तयार करण्यात आलेला लोकशाही सेल्फी बोर्ड होय. मतदान केल्यानंतर विद्यार्थ्यांनी सेल्फी बोर्डसमोर छायाचित्रे काढून या संस्मरणीय क्षणांची आठवण जपली. माझे मत-माझा अधिकार यांसारख्या संदेशांनी सजलेला सेल्फी बोर्ड विद्यार्थ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. मुख्याध्यापिका संगीता कोळी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेचे स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष अनिल बर्वे, सदस्य सुरेश मंकणी यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



## माढा महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची फी माफीसाठी निवेदन

**माढा, दि. २४ जून-**

माढा शहरातील कला व वाणिज्य महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची फी माफ करण्यात यावी अशी मागणी जिल्हा परिषद मराठी मुलींची शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश मोरे यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना केली आहे. मोरे यांनी याबाबत निवेदन दिले आहे. माढ्यात महाविद्यालयामध्ये अनुसुचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून फी आकारत आहेत. अनेक विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील असून त्यांना शिक्षणाचा खर्च पेलणे कठीण जात आहे. फुले, शाहू, आंबेडकर, कर्मवीरांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी रयत शिक्षण संस्थेने गरीब व वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. या परंपरेला अनुसरुन अनुसुचित जातीच्या विद्यार्थाची फी माफ करावी, शासनाच्या नियमांनुसार त्यांना पूर्ण शैक्षणिक सवलत देण्याची मागणी केली आहे. विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त फी घेतल्यास त्याची चौकशी करुन ती विद्यार्थ्यांना परत करावी. तसे न केल्यास महाविद्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशाराही दिला आहे. याप्रसंगी गणेश मोरे, यशपाल लंकेश्वर, आकाश सरतापे, जनार्दन ढावरे, चंचल पवार, सुधीर पवार, राजपाल माने, क्षितीज गायकवाड, अमर ढावरे, राज पाटोळे, बाळू मोरे, अभिजित वाळके उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना मिळणार मोफत कंपोस्ट खत; सांगोला नगरपरिषदेचा उपक्रम

**सांगोला, दि. २४ जून-**

सांगोला शहरामधील घनकचरा व्यवस्थापन केंद्र (कचरा डेपो) याठिकाणी शहरातील जमा झालेला ओला व सुका कचरा यावरती प्रक्रिया करुन त्यापासून कंपोस्ट खत तयार केला जात आहे. हा कंपोस्ट खत शेतीसाठी अत्यंत उपयुक्त असून विशेषत: ऊस या पिकासाठी अतिशय फायदेशीर ठरत आहे. तरी सांगोला तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांना हा कंपोस्ट खत हवा असेल त्यांनी दिवसभर कार्यालयीन वेळेत स्वत:चे वाहन आणून त्यांना हवा तेवढा कंपोस्ट खत घेवून जावा असे आवाहन सांगोला नगरपरिषदेचे नगराध्यक्ष आनंदा माने यांनी केले आहे. तसेच यासाठी शेतकरी हा सांगोला तालुक्यातील असणे गरजेचे आहे व त्यांनी सोबत ७/१२ उतारा व आधार कार्ड घेवून येणे बंधनकारक आहे. तरी तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांना खत हवा असेल त्यांनी घनकचरा व्यवस्थापन केंद्र (कचरा डेपो) येथून घेवून जावे असे आवाहन मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी केले आहे.

## शेतकऱ्याला सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी

**अक्कलकोट, दि. २४ जून-**

महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय किसान संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंद्रकांत रेवणसिद्ध पाटील यांनी दिला आहे. राज्य शासनाने नुकतीच शेतकऱ्यांची कर्जमाफी केल्याची घोषणा केली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतची माहिती दिली आहे. पण अद्याप पर्यंत बँकांकडे कर्जमाफी संदर्भात कोणतेच आदेश देण्यात आले नसल्याची माहिती मिळाली आहे. भारतीय किसान संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्याची मागणी राज्य सरकारकडे केली आहे. तसेच २०२५ साली खरीप हंगामात जी अतिवृष्टी झाली होती यामध्ये शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांनी पिक विमा रक्कम भरूनही त्यांना अद्याप पर्यंत ती विमा कंपन्यांकडून कोणतीच नुकसान भरपाई देण्यात आलेले नाही. शासनाने शेतकऱ्यांना पीक विमा भरपाई तातडीने द्यावे. तसेच शेतकऱ्यांना खरीप हंगामातील पेरणीसाठी हेक्टरी दहा हजारांची मदत करण्यात यावी, खतांच्या किमती या कमी करण्यात याव्यात अशा विविध मागण्या भारतीय किसान संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. लवकरच भारतीय किसान संघटनेच्या वतीने अक्कलकोटचे तहसीलदार तसेच सोलापूरचे जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहिती पाटील यांनी दिली.



# पंढरपुरात २५ ट्रॅव्हल्स वाहनांवर कारवाई

### प्रखर एलईडी लाईट, कर्णकर्कश हॉर्न व वेगमर्यादा उल्लंघन करणाऱ्यांना दणका

### आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची विशेष मोहीम

**तभा वृत्तसेवा**

**बार्शी, दि. २४ जून -**

आगामी आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पायी चालत जाणाऱ्या दिंड्या, वारकरी व भाविकांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देत बार्शी तालुका ग्रामीण पोलिसांनी विशेष वाहतूक तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान वेगमर्यादेचे उल्लंघन करणारे, प्रखर एलईडी लाईटचा वापर करणारे तसेच कर्णकर्कश हॉर्न बसविलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

मंगळवार दि. २३ जून रोजी रात्री १० ते बुधवार दि. २४ जून रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत बार्शी बायपास रोडवरील कुर्डूवाडी चौक येथे विशेष नाकाबंदी करण्यात आली होती. या नाकाबंदी दरम्यान ट्रॅव्हल्स, खाजगी वाहने तसेच इतर प्रवासी वाहनांची कसून तपासणी करण्यात आली.



वाहनचालकांना वेगमर्यादा पाळण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वाहतूक नियमांचे महत्त्व समजावून सांगत सुरक्षित वाहनचालना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तपासणीदरम्यान अनेक वाहनांमध्ये नियमबाह्य प्रखर एलईडी लाईट, कर्णकर्कश हॉर्न तसेच इतर वाहतूक नियमांचे उल्लंघन आढळून आले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक अंजना कृष्णा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश माने यांच्या नेतृत्वाखाली पोलीस नाईक जगताप, पोकॉ. रमेश माने, पोहेकॉ. धनराज केकाण, पोकॉ उत्तरेश्वर जाधव, शिवशंकर खराडे तसेच होमगार्ड साठे, रगडे, काळे व पोकळे यांनी ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

**१९ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल**

मोहिमेत एकूण २५ ट्रॅव्हल्स वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून एकूण १९ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. आषाढी वारी कालावधीत वारकरी व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी अशा प्रकारच्या तपासणी मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

## यात्राकर अनुदानातून पंढरपूर नगरपरिषदेला ५ कोटींचा निधी प्राप्त

### आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याला यश; विकासकामांना मिळणार गती

**तभा वृत्तसेवा,**

**पंढरपूर,दि.२४ जून -**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर नगरीतील विविध विकास कामांना चालना देण्यासाठी राज्य शासनाने यात्राकर रद्द केल्यामुळे नगरपरिषदांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदान योजनेअंतर्गत सन २०२६-२७ साठी एकूण ८ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून, त्यापैकी पंढरपूर नगरपरिषदेला तब्बल ५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने भाविक आणि स्थानिक नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या निधीमुळे पंढरपूर शहरातील विविध नागरी सुविधा व विकासकामांना गती मिळणार आहे.

राज्यातील त्र्यंबक, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, रामटेक, पैठण आणि अक्कलकोट या आठ यात्रास्थळ नगरपरिषदांच्या हद्दीत पूर्वी आकारला जाणारा यात्राकर बंद केल्यानंतर शासनाकडून सहायक अनुदान दिले जाते.

यंदा आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे पंढरपूरला संपूर्ण ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, उर्वरित सात नगरपरिषदांसाठी एकूण ३ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शासनाने हा निधी कोणतीही कपात न करता तात्काळ संबंधित नगरपरिषदांना वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच निधीचा विनियोग नियमानुसार करून त्याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त करून महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत निधी खर्च न झाल्यास अखर्चित रक्कम व्याजासह शासनाच्या खात्यात जमा करावी लागणार आहे.

आमदार समाधान आवताडे यांनी सदर निधीबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूर नगरपरिषदेला ५ कोटी रुपयांचे अनुदान मिळाल्याची भावना नागरिक व भाविकांमधून व्यक्त केली जात आहे.

या निधीमुळे आगामी काळात शहरातील मूलभूत सुविधा आणि विकासकामांना नवी गती मिळणार आहे.

## पंढरपूर तालुका पोलिसांची धडाकेबाज कारवाई

### पंढरपूर तालुका पोलिसांनी केला ३ लाख २५ हजार रुपयांचा विदेशी दारूचा साठा जप्त



**तभा वृत्तसेवा,**

**पंढरपूर,दि.२४ जून -**

पंढरपूर तालुका पोलिसांकडून एकूण ३ लाख २५ हजार रुपयाची विदेशी दारू पंढरपूर तालुका पोलिसांनी केला जप्त केली.या प्रकरणी अन्सार शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आगामी काळातील सण उत्सव तसेच आषाढी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पुळुज या गावी मंगळवारी (२३ जून २०२६) येथील सहायक पोलिस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलिसांनी छापामारी करून एकूण २५ बॉक्स रॉयल चॅलेंज, रॉयल स्टॅग आणि रोमॅनो असे वेगवेगळ्या कंपनीचे एकूण तीन लाख २५ हजार रुपयाची विदेशी दारू अन्सार शेख ( वय ५०, रा. पुळूज,ता. पंढरपूर ) याच्या घराच्या बाजूला असलेल्या खोलीतून जप्त केली. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कवाडे, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय.मुजावर, पीएसआय भारत भोसले, निलेश गायकवाड,पोलीस हेडकॉन्स्टेबल दीपक भोसले, मंगेश रोकडे, पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, संतोष चव्हाण, विजयकुमार आवटी, चालक पोलीस कॉन्स्टेबल महेश गोडसे, हासन नदाफ यांच्या पथकाने पार पाडली.

# मंगळवेढा येथे उद्या ३४ वी पाणी संघर्ष परिषद

### निमंत्रक वैभव नायकवडी व अध्यक्ष प्रा. शिवाजी काळुंगे

**तभा वृत्तसेवा**

**मंगळवेढा दि. २४ जून -**

यंदाची ३४ वी पाणी संघर्ष परिषद जोगेश्वरी मंगल कार्यालय, बायपास रोड, मंगळवेढा येथे शुक्रवार, २६ जून रोजी दु. १ वाजता होणार आहे. लोकराजा राजर्षी शाहू महाराजांच्या जयंती निमित्त कृष्णा खोऱ्यातील १३ दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील आणि विशेषत: आटपाडी, सांगोले, मंगळवेढा व जत तालुक्यातील जनतेची ही परिषद असणार असल्याचे कृष्णा खोरे पाणी संघर्ष चळवळीचे अध्यक्ष प्रा. शिवाजी काळुंगे सांगितले.

भीमा, माण व कोरडा नदीला कालव्याचा दर्जा देऊन त्यावरील सर्व कोल्हापूर पद्धतीचे बंधारे भरून देणे, मंगळवेढा उपसा सिंचन योजना सुरू करणे, उजनी उजवा कालवा व जत, सांगोला, मंगळवेढा तालुक्यातील म्हैसाळ ६ व्या टप्प्यातील अपूर्ण कामे पूर्ण करण्यास निधीची व्यवस्था, माण व भीमा नदीवर बॅरेगेट बांधणे यासह पाण्यासंदर्भातील अन्य मागण्यांच्या पूर्ततेसाठी ही पाणी संघर्ष परिषद होत आहे. परिषदेचे निमंत्रक वैभव नायकवडी हे आहेत.

परिषदेमध्ये सांगोल्याचे आ. डॉ. बाबासाहेब देशमुख, तासगाव - कवठेमहांकाळचे आमदार रोहित पाटील, जतचे माजी आमदार विक्रम सावंत, आटपाडीचे माजी आमदार राजेंद्र देशमुख, गौरव नायकवडी यांचेसह ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. बाबुराव गुरव, प्रा. आर. एस. चोपडे, प्रा. बाळासाहेब नायकवडी, विश्वंभर बाबर, आनंद पाटील, ॲड. सुभाष पाटील, ॲड. सरफराज बागवान, ॲड. भारत पवार, प्रा. दत्ताजी जाधव, प्रा. सी. पी. गायकवाड, व्ही.एन. देशमुख, ॲड. बिरप्पा जाधव, तुकाराम बाबा महाराज हे प्रमुख वक्ते सहभागी आहेत.

पिढ्या न पिढ्या दुष्काळाशी सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना कृष्णा खोऱ्यातील आपल्या हक्काचे पाणी मिळावे यासाठीचा संघर्ष पद्मभूषण क्रांतिवीर डॉ. नागनाथ नायकवडी यांनी ११ जुलै १९९३ रोजी पहिली पाणी परिषद घेऊन पुकारला. त्याला आता ३३ वर्षे पूर्ण होत आहेत. आटपाडी तालुका केंद्रबिंदू मानून सांगली, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील तेरा दुष्काळी तालुक्यातील जनतेची चळवळ उभी केली. नागनाथ नायकवाडी व माजी आमदार गणपराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पाणी संघर्ष चळवळीच्या माध्यमातून अत्यंत चिवटपणे जनतेने लढा देऊन सरकारला कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना करायला भाग पाडले. अकरा वर्षांपूर्वी आटपाडी आणि सांगोला तालुक्यातील बुद्धेहाळ तलावात पाणी आले. अपूर्ण कामांच्या आणि हक्काच्या पाणी लढाईसाठी अजूनही शेतकऱ्यांना लढावे लागणार आहे. त्यासाठीच या पाणी परिषदेचे आयोजन केले आहे. तरी सर्व दुष्काळग्रस्त तालुक्यातील नागरिकांनी हजारोंच्या संख्येने ३४ व्या पाणी परिषदेस उपस्थित राहावे असे आवाहन प्रा. शिवाजी काळुंगे यांच्यावतीने केले आहे.



## मोहिते-पाटील विद्यालयास ई-लर्निंग टीव्ही भेट

**तभा वृत्तसेवा,**

**अकलूज, दि. २४ जून-**

श्री जयसिंह मोहिते-पाटील विद्यालय, संग्रामनगर येथे रोटरी क्लब अकलूजच्या वतीने 'रोटरी की पाठशाळा' उपक्रमांतर्गत पी. पी. पटेल अँड कंपनी यांच्या सीएसआर निधीतून ई-लर्निंग डिजिटल क्लासरूमसाठी अत्याधुनिक टीव्ही संच भेट देण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मल्हारी घुले होते. प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब अकलूजचे अध्यक्ष केतन बोरावके, माजी अध्यक्ष बबनराव शेंडगे, सदस्य आशिष गांधी तसेच प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश करडे उपस्थित होते. प्रारंभी सहशिक्षक महेश शिंदे व संगीत विभागातील विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून मान्यवरांचे स्वागत केले. प्रास्ताविक प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश करडे यांनी केले.

यावेळी रोटरी क्लबचे माजी अध्यक्ष बबनराव शेंडगे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही अशा शैक्षणिक उपक्रमांना पाठबळ देण्याची ग्वाही दिली. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विश्वनाथ हलकुडे यांनी केले.

# यमाई तलाव बचाव समितीची आक्रमक भूमिका

## १ जुलै रोजी प्रांत कार्यालयावर काढणार मोर्चा

### यमाई तलाव लगतची जागा गोशाळेसाठी मंदिर समितीस देण्यास विरोध



**तभा वृत्तसेवा,**

**पंढरपूर, दि.२४ जून -**

येथील यमाई तलाव लगतची जागा गोशाळेसाठी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीस देण्याचा निर्णय शासनाने रद्द करावा. अन्यथा यमाई तलाव बचाव समितीच्या वतीने १ जुलै रोजी प्रांत कार्यालयावर मोर्चा काढण्याचा निर्धार येथील पर्यावरण प्रेमी नागरिकांकडून करण्यात आला.

शहरातील यमाई तलावालगतची सुमारे ३.१२ हेक्टर जागा श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीस गोशाळा विस्तारासाठी देण्याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रस्ताव शासनाकडे सादर करावा म्हणून सांगितले होते. नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष व सर्व नगरसेवक यांनी ही जागा गोशाळेसाठी देऊ नये म्हणून जिल्हाधिकारी एस. कार्तिकीयन व प्रांत अधिकारी सचिन इथापे यांना निवेदन दिले होते. पंढरपूर शहरातील नागरिकांचा विरोध असून सुद्धा पुन्हा शासनाने मंदिर समितीस गोशाळेसाठी जागा देण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पंढरपूरकरांमध्ये अतिशय तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे. पंढरपूर शहरातील अनेक पर्यावरण प्रेमी संघटना,राजकीय,सामजिक संघटनेच्या प्रमुख यांनी एकत्रित येत आपलं सर्वांचं शासनाच्या निर्णयाचे विरोधात यमाई तलाव येथे बुधवारी (दि. २४) बैठकीचे नियोजन केले होते. बैठकीत नागरिकांनी

पंढरपूर नगरपरिषदेच्या निधीतून यमाई तलावाची देखभाल पूर्वी पासूनच केली जाते. तसेच राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे विशेष प्रयत्नातून या तलावाचे सुशोभीकरण करून पर्यटनस्थळ म्हणून विकसित केले आहे. सध्या या ठिकाणी वॉकिंग ट्रॅक, तुळशीवृंदावन, तसेच पक्षी निरीक्षणासाठी वॉच टॉवर उभारण्यात आले असून हजारो महिला पुरुष नागरिक दररोज येथे व्यायाम व विरंगुळ्यासाठी येतात. आदी सर्व बाबींचा विचार करता, यमाई तलावालगतची जागा गोशाळेसाठी देणे शहराच्या विकासाच्या व नागरिकांच्या हिताविरुद्ध आहे. त्यामुळे शासनाने दिलेली मंजुरी तात्काळ रद्द करावी. अन्यथा सरकारविरोधात पंढरपूर नगरपरिषदेचे सर्व नगरसेवक, राजकीय, सामाजिक संस्था व पर्यावरण प्रेमी संस्था, शहरातील नागरिक यमाई तलावच्या बचावासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी १ जुलै रोजी प्रांत कार्यालयावर मोर्चा काढणार असल्याची माहिती नगरसेवक ॲड सुनिल वाळूजकर यांनी दिली

यावेळी उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, गट नेते भागवत बडवे ,नगरसेवक ॲड सुनिल वाळूजकर, अमोल डोके, धर्मराज घोडके, राजू सर्वगोड, माजी नगरसेवक किरण घाडगे, ॲड.गुरुदास अभ्यंकर, तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे अध्यक्ष सुधीर धुमाळ, सुप्रभात ग्रुप मंगेश गांगवे, वृक्षप्रेमी ग्रुपचे सोमनाथ होरणे, सौदागर मोळक, रिपाइं नेते संतोष पवार, सुहास शिर्के, भाग्यश्री लिहिणे यांनी तीव्र निषेध नोंदवला. यावेळी सामजिक कार्यकर्ते अशोक शिंदे, विवेक परदेशी ,माजी नगरसेवक सचिन कुलकर्णी योग साधक वृक्षप्रेमी सदस्य व पर्यावरण प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कव्हे येथे झाड कोसळून महिलेचा मृत्यू

**बार्शी, दि. २४ जून-**

बार्शी तालुक्यातील कव्हे येथे मंगळवार दि. २३ जून रोजी दुपारी वादळी पावसादरम्यान विजेचा आघात होऊन लिंबाचे झाड अंगावर कोसळल्याने रत्नमाला चौधरी (वय ४७, रा. कव्हे, ता. बार्शी) मृत्यू झाला. त्या मंगळवारी राजाराम तिकटे यांच्या शेताजवळील लिंबाच्या झाडाखाली बसल्या होत्या. दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास अचानक वीजा व वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू झाला. यावेळी लिंबाच्या झाडावर वीज कोसळून झाड त्यांच्या अंगावर पडले. नातेवाईक आणि ग्रामस्थांनी जखमी अवस्थेत रत्नमाला यांना ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे नेले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मयताचे पुतणे महेंद्र चौधरी यांनी बार्शी तालुका ग्रामीण पोलीस ठाण्यात या घटनेची खबर कळवली.

## करमाळ्याचे बाळासाहेब नरारे यांना दादासाहेब फाळके प्रेरणा पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**

**जेऊर दि.२४ जून-**



करमाळा शहरातील योग व संगीतशिक्षक बाळासाहेब नरारे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल दादासाहेब फाळके प्रेरणा पुरस्कार जाहीर झाला आहे हा पुरस्कार डॉ. सुरेश राठोड फाऊंडेशन संचलित इंडियन पोलीस मित्र भारत व विशेष कार्यकारी अधिकारी न्याय हक्क जनजागृती फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जाहीर करण्यात आला आहे. प्राचार्य बाळासाहेब नरारे यांनी आपल्या कार्यक्षेत्रात उल्लेखनीय, प्रेरणादायी व समाजोपयोगी कार्य करून राष्ट्राच्या प्रगतीत मोलाचा वाटा उचलला असल्याने त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे त्यांच्या सामाजिक बांधिलकी, कर्तृत्व आणि यशाची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे या पुरस्काराचे वितरण २७ जून रोजी पुणे पत्रकार भवन, पुणे येथे होणार आहे. प्राचार्य नरारे यांना हा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण तालुक्यातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, २५ जून २०२६ ।
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



'मी मुळीच अहंकारी नाही. माझे ठायी अहंकाराचा लवलेशही नाही. बाकी सर्व जण अहंकारी आहेत.' आता असे वाटणे हा सुद्धा एक अहंकारच आहे. म्हणूनच स्वतःच स्वतःला तपासून पाहावे. म्हणजे आपल्यामध्ये छुपा अहंकार आहे की खुला अहंकार आहे हे समजेल.

**- पद्मविभूषण**
**स्व. पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र,
पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

## महत्त्वाचे

### पंतप्रधान मोदींना इराण भेटीचे निमंत्रण

**तेहरान :** इराणचे राष्ट्रपती मसूद पेझिश्कियन यांनी, देशाचे सर्वोच्च नेते अयातुल्ला सय्यद अली खामेनेई यांच्या राजकीय अंत्यसंस्कारात सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना अधिकृत निमंत्रण पाठवले आहे. खामेनेई यांच्या पार्थिवावर ९ जुलै रोजी मशहद शहरात अन्त्यसंस्कार होणार आहे. ४ जुलै रोजी त्यांचे पार्थिव तेहरानच्या ग्रँड मोसल्ला कॉम्प्लेक्समध्ये ठेवण्यात येईल.

# कर्जमाफीच्या जाचक अटी दूर करणार



पावसाळी अधिवेशन



**। ३० जूनपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट**
**। महायुती सरकार बळीराजाच्या पाठीशी खंबीर**

**मुंबई, २४ जून**
शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय त्रुटींचा मुद्दा महायुती सरकारने अत्यंत संवेदनशीलतेने हाताळण्याचे ठरविले असून कर्जमाफीच्या नियमांमधील जाचक अटी दूर करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. जे शेतकरी लाभापासून वंचित राहिल आहेत त्यांच्यासाठी ३० जूनपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याच आल्याचे माहिती सरकारने दिली आहे.

आमदार बच्चू कडू यांनी अधिवेशनात महात्मा जोतीराव फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज कर्जमुक्ती योजनांमधील प्रशासकीय लालफीतशाही व बँकांच्या आडमुठ्या धोरणांवर सडकून टीका केली. अनेक पात्र शेतकऱ्यांची नावे यादीत असूनही प्रत्यक्ष खात्यात रक्कम जमा झालेली नाही, त्यामुळे त्यांना नवीन पीककर्जापासून वंचित राहावे लागत आहे. तसेच, दोन लाखांच्या कर्जावर केवळ ५० हजारांची मदत देऊन उर्वरित वसुलीसाठी बँका शेतकऱ्यांमागे तगादा लावत असल्याची गंभीर बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली. प्रशासनाच्या या भोंगळ कारभारामुळे शासनाची प्रतिमा मलिन होत असल्याचे सांगत त्यांनी तातडीने धोरणात्मक सुधारणेची मागणी केली होती. यावर शासनाची बाजू मांडताना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विद्यमान सरकार हे सर्वस्वी शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, नव्या धोरणाची आखणी करताना या सर्व त्रुटींचा आणि सूचनांचा गांभीर्याने विचार केला जाईल, असे स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनुसार राज्यातील तब्बल ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची ऐतिहासिक कर्जमाफी दिली जाणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### वर्षाअखेरीस सर्वच शेतकऱ्यांना दिवसा होणार वीजपुरवठा

सध्या राज्यातील तब्बल ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा उपलब्ध करून देण्यात महायुती सरकारला यश आले आहे. तसेच, या वर्षाअखेरीस उर्वरित २५ टक्के शेतकऱ्यांनाही दिवसा वीजपुरवठ्याच्या कक्षेत आणण्यासाठी शासन युद्धपातळीवर प्रयत्न करत असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत केली. सध्या राज्यात विजेची कोणतीही टंचाई नसून कृषी पंपांना नियमानुसार दिवसा आठ तास वीजपुरवठा सुरळीतपणे सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य सदाभाऊ खोत यांनी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.



### २०२९-३० पर्यंत महाराष्ट्रातील वीज देशात सर्वांत स्वस्त असेल

येत्या २०२९-३० पर्यंत महाराष्ट्र हे देशातील सर्वात स्वस्त वीज देणारे राज्य बनेल, अशी अतिशय महत्त्वाची माहिती मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली. राज्य सरकारने टीओडी (टाईम ऑफ द डे) मीटरबाबत घेतलेला निर्णय हा सर्वसामान्य ग्राहकांचा फायदा डोळ्यासमोर ठेवूनच घेतला असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

राज्याला सध्या लागणाऱ्या एकूण विजेपैकी जास्तीत जास्त वीज ही अपारंपरिक म्हणजेच सौर आणि पवन ऊर्जेसारख्या माध्यमातून मिळवण्यावर सरकारचा भर आहे. २०२९-३० पर्यंत राज्याची ५२ टक्के वीज याच माध्यमातून मिळेल.

# कर्नाटकात भूखंड घोटाळा

**। खडगे कुटुंबीयांना काँग्रेसच्या सरकारने दिली कोट्यवधीची जमीन**
**। भाजपा प्रवक्ते प्रदीप भंडारी यांचा आरोप**

**नवी दिल्ली, २४ जून**
काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांच्या परिवाराच्या नावाने असलेल्या ट्रस्टला कर्नाटकातील काँग्रेसच्या सरकारने कोट्यवधी रुपयांचे भूखंड दिल्याचा गंभीर आरोप भाजपाने केला. मल्लिकार्जुन खडगे आणि त्यांचे पुत्र प्रियंक खडगे यांच्या नावाने असलेल्या सिध्दार्थ विहार ट्रस्टला कर्नाटकातील काँग्रेसच्या सरकारने कोट्यवधी रुपये किंमतीचे भूखंड दिले. या ट्रस्टमध्ये मल्लिकार्जुन खडगे, त्यांची पत्नी, मुलगा प्रियंक आणि जावयाचाही समावेश आहे, असा आरोप बुधवारी आयोजित पत्रपरिषदेत भाजपा प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी केला आहे.



खडगे परिवाराने आपल्या राजकीय प्रभावाचा वापर करत गरिबांसाठी असलेले वेगवेगळ्या ठिकाणचे वेगवेगळे भूखंड हडपले, असा आरोप करत भंडारी म्हणाले की, कर्नाटक औद्योगिक क्षेत्र विकास मंडळाच्या नावाने असलेला एक मोठा भूखंड कर्नाटकमधील काँग्रेसच्या सरकारने २०२४ मध्ये सिध्दार्थ विहारला ट्रस्टला दिला. हा भूखंड अंतराळ आणि संरक्षण क्षेत्रातील संशोधन आणि विकासासाठी होता. ५ एकर या भूखंडाची किंमत तेव्हा १०० कोटी रुपये होती.

हा भूखंड अंतराळ क्षेत्रात संशोधनाचे काम करत असलेल्या वा औद्योगिक संस्थेला द्यायला हवा होता, पण तो एका राजकीय कुटुंबाच्या खाजगी संस्थेला देण्यात आला, असा आरोप भंडारी यांनी केला. (वृत्तसंस्था)

# 'टीपू सुलतान' नामकरण बेकायदेशीर

### प्रशासनाला वकिलाची नोटीस



स्थायी समिती सभागृह

**अकोला, २४ जून**
येथील महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृहाला देण्यात आलेले 'शहीदे वतन हजरत टीपू सुलतान सभागृह' हे नाव पूर्णपणे बेकायदेशीर आणि शासकीय नियमांचे उल्लंघन करणारे असल्याचा दावा करत, उदय महा यांच्या वतीने ॲड. मुकुंद जालनेकर यांनी २३ जून रोजी मनपा आयुक्त, महापौर आणि स्थायी समिती सभापती यांना नोटीस बजावली आहे.

शासकीय इमारती आणि वास्तूंना नावे देण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे स्पष्ट नियम आणि राजशिष्टाचार आहेत. शासनाने यासाठी थोर आणि ऐतिहासिक व्यक्तींची एक अधिकृत यादी प्रसिद्ध केली आहे. मनपा प्रशासनाला पाठवण्यात आलेल्या नोटीसमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, शासनाच्या या अधिकृत यादीत 'टीपू सुलतान' या नावाचा कुठेही समावेश नाही. त्यामुळे शासनाच्या यादीबाहेरचे नाव अधिकृत शासकीय सभागृहाला देणे हा थेट राज्य शासनाच्या प्रशासकीय आदेशांचा आणि नियमावलीचा भंग असून, ही कृती पूर्णपणे अवैध ठरते. त्यामुळे आयुक्त, महापौर आणि स्थायी समिती सभापती या तिघांनाही नोटीस बजावण्यात आली आहे.

या कायदेशीर नोटीसमध्ये केवळ आक्षेप न नोंदवता प्रशासनाला कायदेशीर पर्यायही सुचविण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने अधिकृत केलेल्या थोर व्यक्तींच्या यादीत छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव समाविष्ट आहे. त्यामुळे मनपा प्रशासनाने विहित मुदतीत टीपू सुलतान यांचे अवैधरित्या दिलेले नाव तत्काळ हटवावे आणि त्याऐवजी नियमांनुसार 'छत्रपती संभाजी महाराज सभागृह' असे नामकरण करावे, अन्यथा पुढील कायदेशीर कारवाईसाठी न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशारा नोटीस मधून देण्यात आला आहे. (तभा वृत्तसेवा)



# वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासन सज्ज

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; वारीत भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही**

**डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे वारी सोहळा पोहचणार जगभर**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२४ जून-**
यंदाच्या आषाढी वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणारं नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासन सज्ज असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पालखी सोहळा प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला. यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदा पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण केली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्काम स्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारले आहे. लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्याचा सकारात्मक विचार केला जाईल असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्यांप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष सुरक्षितता घेतली आहे. वारकरी आणि भक्तांची काळजी घेत हा सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करा. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी वारी काळात वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली आहे. पंढरपूर शहरात वारी सोहळ्यात आणि नंतर स्वच्छतेचे सर्व नियोजन केल्याचे सांगितले.

पुणे विभागीय आयुक्त शितल तेली - उगले यांनी सादरीकरणाद्वारे प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती दिली. बैठकीस संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, पोलीस आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.



# सी.एस.आर. फंड मिळवून देतो म्हणून ४० लाखांची फसवणूक; चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**
६० ते ७० कोटी रुपयांचा सामाजिक दायित्व निधी ( सीएसआर फंड ) मिळवून देण्याच्या बहाण्याने एका तरुणाची तब्बल ४० लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे .

श्रीनिवास रेड्डे (रा-बेळगाव ), भाविक एक्झिमचे खातेधारक , अकायदा कंपनीचे देंवेंद्र यादव आणि सुमित (पुर्ण नाव व पत्ता माहित नाही ) अशी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत. याबाबत कामण्णा व्हनसुरे ( वय-३५, रा मुळ हजंगी ता.अक्कलकोट सध्या रा-घर नं २२२,सुभाष नगर जुळे सोलापूर ) यांनी फिर्याद दिली असून ही फसवणुकीची घटना ४ मे रोजी हॉटेल बालाजी सरोवर हॉटेलमध्ये घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .




श्रीनिवास रेड्डे याने व्हनसुरे यांच्याशी रिअल इस्टेटच्या माध्यमातून ओळख वाढवली होती. ओळखीचा गैरफायदा घेत फिर्यादीच्या नातेवाईकांच्या भैरवनाथ शिक्षण संस्थेला ६० ते ७० कोटी रुपयांचा सीएसआर फंड मिळवून देतो, अशी बतावणी केली. फंड न मिळाल्यास पेनल्टी म्हणून ५ कोटी रुपये देण्याचे आमिषही दाखवले. फंड मिळवण्यासाठी कंपनीचा स्लॉट खरेदी करावा लागेल असे सांगितल्यावर फिर्यादीने त्यांच्या मित्राच्या नावे काढलेला ४० लाख रुपयांचा डिमांड ड्राफ्ट रद्द करून ती रक्कम भाविक एक्झिमच्या बँक खात्यावर पाठवली. पुढे ही रक्कम देवेंद्र यादव यांच्या कंपनीच्या खात्यावर वर्ग केली.

मात्र आरोपीने सांगितल्याप्रमाणे अद्यापपर्यंत सी एस आर फंडाची रक्कम तसेच पेनल्टीची रक्कम मिळवून न देता आपली फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. गुन्ह्याचा तपास फौजदार अशोक तरंगे हे करत आहेत.

# जबरी चोरी करणारी टोळी दोन दिवसांत जेरबंद

**टेंभुर्णी पोलिसांच्या डीबी पथकाची धडाकेबाज कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २४ जून-**
पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर मध्यरात्री कांदा वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्याला मारहाण करून वाहनासह लाखोंचा ऐवज जबरी चोरी करणाऱ्या टोळीचा टेंभुर्णी पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत पर्दाफाश करत चार आरोपींना अटक केली आहे. कारवाईत चोरीस गेलेली महिंद्रा बोलेरो पिकअप व कांद्याचा माल असा एकूण १० लाख ३२ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

१७ जून रोजी फिर्यादी शिवाजी नांदे (वय ४५, रा. वीरवाडी नं.२, मदनवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) व त्यांचे चुलत भाऊ तानाजी (रा. राजेवाडी, ता. दौंड, जि. पुणे) हे शेतातील कांदा दोन नवीन महिंद्रा बोलेरो पिकअप वाहनांत भरून विक्रीसाठी सोलापूर मार्केटकडे निघाले होते. १८ जून रोजी मध्यरात्री १२.०५ वाजण्याच्या सुमारास सापटणे (टेंभुर्णी) गावच्या शिवारात त्यांच्या वाहनाचा तिघांनी मोटारसायकलवरून पाठलाग केला. वाहन थांबवून चालकासह शिवाजी नांदे यांना मारहाण केली. तसेच कांद्याची ४३ पोती, नवीन पासिंग न झालेली महिंद्रा बोलेरो आदी मिळून एकूण १० लाख ३४ हजार ३५० रुपयांचा ऐवज जबरीने चोरून नेला.या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. वरिष्ठांच्या सूचनेनूसार पोलीस निरीक्षक महेश ढवाण आणि डीबी पथक प्रमुख सपोनि. संदेश बावकर आणि त्यांच्या पथकाने तपास सुरू केला. तपासादरम्यान उजनी धरण परिसरात चोरट्यांनी झुडपांमध्ये फेकून दिलेली कांद्याची पोती पोलिसांना मिळाली. भिमानगर, रांजणी, हिंगणगाव, तरटगाव, कांदलगाव परिसरात गोपनीय माहिती संकलित करून तांत्रिक विश्लेषणाआधारे आरोपी प्रणित गायकवाड (वय २१, रा. आंबेडकरनगर, ता. माढा), शाहरूख शेख (वय २१, रा. भिमानगर, ता. माढा),अथर्व खानेवाले (वय १९, मूळ रा. आजोती, ता. इंदापूर), ४) संदेश भोसले (वय १९, रा. बाभुळगाव, ता. इंदापूर) यांना ताब्यात घेतले.

# विद्यापीठात अभियंता व ठेकदाराच्या अंगावर भंडारा उधळला

## अहिल्यादेवी स्मारक समितीचे काम रेंगाळल्याने स्मारक समितीच्या बैठकीत निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक उभारणीच्या रखडलेल्या कामावरून बुधवारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या स्मारक समितीच्या बैठकीत समिती सदस्य शरणू हांडे यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनाच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत शासकीय व विद्यापीठाचे अभियंता व ठेकेदारांच्या तोंडावर भंडारा उधळून निषेध व्यक्त केला.

कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्यावेळी समिती सदस्यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठातच त्यांच्या स्मारकाची उभारणी वर्षानुवर्षे प्रलंबित राहणे योग्य नसल्याचे मत अनेक सदस्यांनी नोंदविले. स्मारक उभारणीचा विषय केवळ बांधकामापुरता मर्यादित नसून तो विद्यापीठाच्या गौरवशाली इतिहासाशी आणि सामाजिक बांधिलकीशी संबंधित असल्याचेही सदस्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे यासाठी साडे १४ कोटीचा निधी मिळूनही वारंवार पाठपुरावा करूनही स्मारकाच्या कामाला गती मिळत




नसल्याने सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने ठोस निर्णय घेण्याची मागणी केली.

स्मारकासंदर्भात अनेकदा चर्चा होऊनही प्रत्यक्षात कोणतीही लक्षणीय प्रगती दिसून येत नसल्याबद्दल त्यांनी प्रशासनाकडे जाब विचारला. सदस्यांनी स्मारकाच्या प्रस्तावाची सद्यस्थिती, निधी उपलब्धतेची माहिती, प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीची प्रक्रिया तसेच काम सुरू होण्याचा निश्चित कालावधी जाहीर करण्याची मागणी केली. याबाबत स्पष्ट आराखडा सादर करण्याची अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. दरम्यान, विद्यापीठ प्रशासनाने स्मारक उभारणीसंदर्भातील प्रक्रियेचा आढावा घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, अशी भूमिका बैठकीत मांडल्याचे समजते. मात्र, आश्वासनांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कामाला गती कधी येणार, याकडे आता विद्यापीठ परिवारासह अहिल्यादेवींच्या अनुयायांचे लक्ष लागले आहे.



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख

# सामाजिक समतेच्या दिशेने...

संपूर्ण देशासाठी एकच नागरी कायदा लागू करण्याचा प्रयत्न व्हावा, असे भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्त्वांच्या कलम ४४ मध्ये म्हटले आहे. सध्या देशात गोवा, उत्तराखंड, आसाम, गुजरात या राज्यांत समान नागरी कायदा लागू आहे. महाराष्ट्र राज्यही आता हा कायदा लागू करण्याच्या दृष्टीने पुढे जात असून त्यासाठी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन होणार असल्याची घोषणा विधिमंडळात करण्यात आली आहे. हा निर्णय एका राज्याचा वाटत असला, तरी संपूर्ण देशात सामाजिक समता आणि लिंगभेदमुक्त समाजनिर्मितीसाठी टाकलेले हे ऐतिहासिक पाऊल मानले पाहिजे. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात एकात्मतेचा पाया अधिक भक्कम करण्यासाठी 'एक देश, एक कायदा' ही संकल्पना रुजवण्याकरिता एकापाठोपाठ एक राज्य पुढे येत आहेत, हे स्वागतार्हच आहे.

सध्या भारतात फौजदारी कायदे सर्वांसाठी समान आहेत. पण विवाह, घटस्फोट, वारसाहक्क, दत्तकविधान आणि मालमत्ता यासारखे दिवाणी विषय वेगवेगळ्या धर्मांच्या वैयक्तिक कायद्यानुसार (पर्सनल लॉ) चालतात. समान नागरी कायदा म्हणजे जात, धर्म, पंथ आणि लिंग यांचा विचार न करता सर्व नागरिकांच्या कौटुंबिक आणि नागरी बाबींमध्ये एकसमान कायदा लागू करणे होय. भारताला या कायद्याची गरज का आहे, तर त्यामुळे लिंगभेद आणि महिलांचे शोषण थांबणार आहे. सध्याच्या वेगवेगळ्या वैयक्तिक कायद्यांमुळे विशिष्ट धर्मांतील महिलांवर अन्याय होत आहे. नाशिक जिल्ह्यातील तिहेरी तलाक पीडित महिलांची व्यथा राज्याच्या विधिमंडळातही मांडली गेली. बहुपत्नीत्व आणि मनमानी घटस्फोटामुळे महिलेचे आयुष्य उद्ध्वस्त होताना कुठलीही आदर्श आणि त्यातही लोकनियुक्त राज्यव्यवस्था उघड्या डोळ्यांनी बघू शकत नाही. सर्व धर्मांतील महिलांना विवाहाचा, घटस्फोटाचा आणि पोटगीचा समान अधिकार मिळणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या धार्मिक कायद्यांमुळे नागरिकांमध्ये 'आम्ही आणि ते' अशी वेगळी भावना निर्माण होता कामा नये. सर्वांसाठी एकच कायदा असेल. कायदेशीर पातळीवर सर्व नागरिक समान आहेत, हा राष्ट्रीय एकात्मतेचा भावही अधिक दृढ होईल. समान नागरी कायद्याला मुस्लिम समाजातील काही पारंपरिक आणि कट्टर संघटनांकडून विरोध होताना दिसतो. त्यांच्या म्हणण्यानुसार, हा कायदा त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे. त्यासाठी ते कलम २५ चा हवाला देतात. परंतु धार्मिकच काय, कोणतेच स्वातंत्र्य कधीही अमर्याद नसते. एखादी धार्मिक प्रथा किंवा कायदा मानवी हक्कांचे, विशेषतः महिलांच्या अधिकारांचे उल्लंघन करतो, तेव्हा त्यात सुधारणा करणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य ठरते. जर्मनी, फ्रान्स या देशात समान नागरी कायदा राबविला जातो. अमेरिकेत थोड्या वेगळ्या अर्थाने तो लागू आहे. पोर्तुगाल, रशिया, चीन येथेही हा कायदा स्वीकारला गेला आहे. पाकिस्तान, बांगलादेश, ट्युनिशिया आणि मोरोक्को यासारख्या मुस्लिमबहुल देशांनीही बहुपत्नीत्वाबाबत अनेक कायदेशीर अटी लागू केलेल्या आहेत. भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशात मुस्लिम महिलांना त्यांच्या मानवाधिकार आणि संरक्षणापासून वंचित ठेवण्याचे कारण उरत नाही. धार्मिक अस्मितेच्या नावाखाली समान नागरी कायद्याला विरोध करणे कुठल्याही निकषात बसत नाही. कारण हा देश कोणत्याही विशिष्ट धार्मिक ग्रंथावर नव्हे, तर संविधानावर चालतो. त्यामुळे संविधानातील तरतुदी सर्वोच्च मानल्या पाहिजेत.

समान नागरी कायद्याच्या अंमलबजावणीत लहान-मोठ्या अडचणी सुरुवातीला येतीलही; पण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आधीच स्पष्ट केल्याप्रमाणे, या कायद्याच्या कक्षेतून आदिवासींना वगळले जाणार आहे. हा कायदा लागू करताना उत्तराखंड आणि इतर राज्यांनीही हीच भूमिका घेतली होती. आदिवासींना या कायद्यातून वगळण्यामागे संवेदनशील आणि घटनात्मक कारणे आहेत. भारतातील आदिवासी समाजाच्या स्वतःच्या रूढी, परंपरा आणि वेगळी संस्कृती आहे. त्यांचे विवाह आणि मालमत्ता हक्क त्यांच्या पारंपरिक कायद्यानुसार चालतात. राज्यघटनेतील तरतुदीनुसार जल, जंगल, जमीन आणि आदिवासी संस्कृतीचे संरक्षण करण्याची जबाबदारी सरकारवर आहे. हा समाज आजही आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मुख्य प्रवाहापासून बराच दूर आहे. त्यांच्या रूढी-परंपरांना अचानक धक्का लावल्यास त्यांच्यात असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ शकते. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा आहे. या महापुरुषांनी नेहमीच समताधिष्ठित समाजाचे स्वप्न बघितले. पण देशातील जवळपास अर्ध्या लोकसंख्येत मोडणाऱ्या महिलांना त्यांच्या समुदायासाठी असलेल्या धार्मिक कायद्यांमुळे दुय्यम वागणूक मिळत राहील, तोपर्यंत खऱ्या अर्थाची समता येऊ शकत नाही. कोणत्याही धर्माची असली तरी प्रत्येक महिलेला कायद्याचे समान संरक्षण मिळणे हा तिचा मूलभूत अधिकार आहे आणि तो समान नागरी कायदा त्यांना मिळवून देईल.

भारतात १८३५ मध्येच या कायद्याचा विचार झाला होता. मात्र, ब्रिटिशांनी आपले साम्राज्य टिकविण्यासाठी तेव्हा धार्मिक बाबतीत हस्तक्षेप न करण्याचे धोरण अवलंबिले होते. स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, समान नागरी कायद्याचा जोरकसपणे पुरस्कार केला. पण तत्कालीन परिस्थिती पाहता आणि मुस्लिम समुदायाचा तीव्र विरोध लक्षात घेता आणि संविधान निर्मितीत शक्यतोवर सर्वानुमते निर्णय घेतले जातील, असे साधारणतः धोरण ठरविल्याने हा विषय कलम ४४ अंतर्गत 'मार्गदर्शक तत्त्वांमध्ये' समाविष्ट करण्यात आला. पण त्याचा दुसरा अर्थ, भविष्यात अनुकूल वेळ आल्यावर सरकारने हा कायदा लागू करावा, असाच होता.

भारतात सातत्याने उठणाऱ्या आणि सर्वोच्च न्यायालयानेही वारंवार अधोरेखित केलेल्या समान नागरी कायद्याच्या मागणीकडे खरे तर राजकीय दृष्टिकोनातून पाहूच नये. ही बाब मानवाधिकार आणि महिलांच्या हक्कांशी जोडली आहे. १९८५ मध्ये ७३ वर्षीय शहाबानो यांना त्यांच्या पतीने घटस्फोट दिला तेव्हा सर्वोच्च न्यायालयाने त्यांना पोटगी देण्याचा स्पष्ट आदेश दिला होता. तेव्हाही कट्टरपंथीयांच्या दबावाखाली तत्कालीन सरकारने कायदा बदलून न्यायालयाचा निर्णय फिरवला. नंतरचा १९९५ चा सरला मुदगल खटला बघा. त्याहीवेळी केवळ दुसरे लग्न करण्यासाठी हिंदू पुरुषाने धर्मांतर करणे अवैध ठरवताना न्यायालयाने समान नागरी कायद्याची गरज विशद केली होती. २०१७ चा सायरा बानो खटला ज्यात, तिहेरी तलाक रद्द करताना न्यायालयाने पुन्हा एकदा लिंगाधारित न्यायासाठी समान कायदा लागू व्हावा, असे आग्रही मत मांडले होते. मात्र, त्याच काळात आलेल्या २१ व्या विधि आयोगाने, सध्याच हा कायदा लागू करणे घाईचे होईल, असे मत मांडले. च आयोगाने 'पर्सनल लॉ'मधल्या अनिष्ट प्रथा दूर करण्याची शिफारसही केली होती, ही बाब कट्टरपंथी हेतुपुरस्सर विसरतात. बहुपत्नीत्व रद्द करणे आणि निकाहनाम्यात बदलाच्या तरतुदीही या आयोगाने सांगितल्या होत्या, याकडे हे ऊरबडवे साफ दुर्लक्ष करतात. हा कायदा लागू करताना काही घटकांना विश्वासात घेणे, त्यांचे संभ्रम दूर करणे ओघानेच आले. मात्र, केवळ राजकीय विरोध किंवा धार्मिक कट्टरतेपोटी या कायद्याला प्रदीर्घ काळ प्रलंबित ठेवणे महाराष्ट्राच्या आणि देशाच्याही हिताचे नाही, हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. सामाजिक समतेचे नवे पर्व सुरू करण्यासाठी अनुकूलता आणि जाणीव जागृती याआधी कधीच नव्हती, हेही लक्षात घेतले पाहिजे. ■

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# सुवर्णमुकुटाची सुवर्णकथा

सध्या क्रीडाविश्वात तसेच एकूणच रसिकांमध्ये फुटबॉल विश्व करंडक स्पर्धेची जोरदार चर्चा आहे. त्यातल्या त्यात या स्पर्धेच्या करंडकाची म्हणजे सुमारे पाच किलोपेक्षा अधिक शुद्ध सोन्यापासून तयार करण्यात आलेल्या करंडकाविषयी जास्त कुतूहल आहे. हा करंडक जवळपास १९० कोटी रुपये मूल्याचा मानला जातो. त्यामुळे तो जगातील सर्वांत महागडा क्रीडा करंडक म्हणून ओळखला जातो. फुटबॉल विश्वचषकाचा सध्याचा करंडक १९७४ मध्ये प्रथम वापरण्यात आला. त्याची रचना इटलीतील शिल्पकार सिल्व्हियो गाझ्झानिगा यांनी केली होती. हा करंडक इटलीतील मिलान शहरात तयार करण्यात आला. अंतिम करंडक तयार करण्यासाठी अनेक महिने मेहनत घेण्यात आली. प्रथम माती आणि प्लास्टरमधील नमुने तयार करण्यात आले, त्यानंतर धातूचे साचे बनवून १८ कॅरेट सोन्यातून करंडकाला आकार देण्यात आला. प्रत्येक तपशील कुशल कारागिरांनी हाताने कोरला आणि अनेक टप्प्यांमधील घासणी आणि पॉलिशमुळे त्याला आजची देदीप्यमान चमक प्राप्त झाली. सुमारे पाच किलोहून अधिक सोन्याचा वापर झालेला हा करंडक जगातील सर्वांत मौल्यवान क्रीडा करंडक मानला जातो. विशेष म्हणजे त्याची चमक, सौंदर्य आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो.

या करंडकाचा इतिहासही तितकाच रंजक आहे. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात नवीन करंडकाची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी अनेक देशांमधील नामवंत कलाकारांनी आपल्या संकल्पना सादर केल्या. अखेरीस एका इटालियन शिल्पकाराची रचना निवडण्यात आली. दोन खेळाडू आपल्या हातांनी पृथ्वीचा गोल उंचावत असल्याचे या करंडकाचे स्वरूप आहे. या कलाकृतीमध्ये विजय, एकता आणि मानवाच्या अमर्याद क्षमतेचे दर्शन घडते. करंडकाची उंची सुमारे ३६ सेंटीमीटर असून त्याचे वजन सहा किलोपेक्षा अधिक आहे. त्यामध्ये पाच किलोपेक्षा जास्त शुद्ध सोने वापरण्यात आले आहे. जगातील प्रत्येक फुटबॉलपटूसाठी हा करंडक म्हणजे आयुष्यभराच्या स्वप्नांची पूर्तता असते. फुटबॉल विश्वचषक स्पर्धा दर चार वर्षांनी आयोजित केली जाते. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेकडो देश पात्रता फेऱ्यांमध्ये खेळतात. लाखो खेळाडूंमधून निवडलेले मोजके खेळाडू अंतिम स्पर्धेत सहभागी होतात. महिनाभर चालणाऱ्या या स्पर्धेकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले असते. अंतिम सामन्यानंतर विजेत्या संघाचा कर्णधार हा सुवर्ण करंडक आकाशाकडे उंचावतो, तेव्हा तो क्षण इतिहासात कायमचा कोरला जातो.

या करंडकाने अनेक महान खेळाडूंचे स्वप्न पूर्ण केले आहे. अनेक दिग्गज खेळाडूंनी आपल्या देशासाठी सर्वोच्च सन्मान मिळविण्यासाठी अथक प्रयत्न केले. काहींना यश मिळाले, तर काहींना हा करंडक हातात घेण्याचे भाग्य लाभले नाही. त्यामुळे या करंडकाचे महत्त्व आणखी वाढते. तो केवळ विजयाचे प्रतीक नसून संघर्ष, चिकाटी आणि संघभावनेचा गौरव आहे. जगातील इतर अनेक क्रीडा स्पर्धांचे करंडक प्रसिद्ध आहेत. क्रिकेट, टेनिस, मोटारशर्यती किंवा इतर खेळांमध्येही प्रतिष्ठित पारितोषिके दिली जातात. परंतु मूल्य, लोकप्रियता आणि जागतिक आकर्षणाचा विचार केला तर फुटबॉल विश्व करंडक सर्वांपेक्षा वेगळा ठरतो. अब्जावधी प्रेक्षक, शेकडो देशांचा सहभाग आणि जगभरातील माध्यमांचे लक्ष यामुळे त्याचे स्थान अद्वितीय आहे. आजच्या काळात क्रीडा हा केवळ मनोरंजनाचा विषय राहिलेला नाही. तो राष्ट्रांची प्रतिष्ठा, अर्थव्यवस्था, पर्यटन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांच्याशी जोडला गेला आहे. विश्वचषक स्पर्धेमुळे यजमान देशांना मोठा आर्थिक फायदा होतो. पायाभूत सुविधा विकसित होतात, पर्यटन वाढते आणि जगभरातील लोकांमध्ये मैत्रीचे संबंध दृढ होतात. या सर्व प्रक्रियेचे केंद्रबिंदू म्हणून हा सुवर्ण करंडक उभा असतो. फुटबॉल सुवर्ण करंडक अत्यंत मौल्यवान असल्याने विशेष पद्धतीने देखभाल केली जाते. तो नियंत्रित तापमान व आर्द्रता असलेल्या सुरक्षित वातावरणात ठेवला जातो. प्रशिक्षित तज्ज्ञ नियमितपणे त्याची स्वच्छता करतात आणि विशेष मऊ कापडांच्या साहाय्याने धूळ व बोटांचे ठसे काढले जातात. करंडकाला अनावश्यक स्पर्श होऊ दिला जात नाही आणि विजेत्या संघातील केवळ काही निवडक व्यक्तींनाच तो हाताळण्याची परवानगी असते.

सोन्याला गंज लागत नसल्यामुळे नैसर्गिक चमक दीर्घकाळ टिकते; मात्र ओरखडे, डाग किंवा इतर नुकसान टाळण्यासाठी अत्यंत काळजी घेतली जाते. त्यामुळे हा करंडक वर्षानुवर्षे तेजस्वी आणि आकर्षक दिसत राहतो. फुटबॉल विश्व करंडक हा जगातील सर्वांत मौल्यवान क्रीडा प्रतीकांपैकी एक असल्याने त्याची सुरक्षा अत्यंत कडक असते. तो विशेष बुलेटप्रूफ काचेच्या पेटीत ठेवला जातो आणि वाहतुकीसाठी उच्च दर्जाच्या सुरक्षित पेट्यांचा वापर केला जातो. सशस्त्र सुरक्षा कर्मचारी, अत्याधुनिक कॅमेरे, संवेदक आणि सतत देखरेख करणाऱ्या यंत्रणांद्वारे त्याचे संरक्षण केले जाते. आंतरराष्ट्रीय प्रवासासाठीही स्वतंत्र सुरक्षा नियम लागू असतात. मूळ करंडक स्वित्झर्लंडमधील 'फिफा'च्या यंत्रणेच्या ताब्यात सुरक्षित ठेवला जातो. विजेत्या देशाला तो कायमस्वरूपी दिला जात नाही; काही काळानंतर मूळ करंडक परत घेतला जातो आणि त्याऐवजी अधिकृत प्रतिकृती प्रदान केली जाते. त्यामुळे या अमूल्य वारशाचे दीर्घकालीन संरक्षण सुनिश्चित केले जाते. जगभरातील लाखो चाहत्यांना या करंडकाचे दर्शन घडावे यासाठी तो विविध प्रदर्शनांमध्येही प्रदर्शित केला जातो

फुटबॉल विश्व करंडक हा मानवी कल्पकता, कलात्मकता आणि क्रीडाप्रेम यांचा संगम आहे. त्यामध्ये सोन्याचे मूल्य आहे, परंतु त्याहून अधिक मौल्यवान आहेत त्याच्याशी जोडलेल्या भावना. प्रत्येक खेळाडूचे घामाचे थेंब, प्रत्येक चाहत्याचा उत्साह आणि प्रत्येक राष्ट्राचे स्वप्न या करंडकात सामावले आहे. म्हणूनच तो केवळ जगातील सर्वांत महागडा करंडक नाही, तर जगातील सर्वांत प्रतिष्ठित आणि प्रेरणादायी क्रीडा प्रतीक आहे. सोन्याची चमक काळानुसार कमी होऊ शकते, परंतु या करंडकाने निर्माण केलेल्या आठवणी, प्रेरणा आणि अभिमान यांचे तेज कधीही कमी होणार नाही. फुटबॉल विश्व करंडक हा मानवी जिद्दीचा, जागतिक एकतेचा आणि विजयाच्या अमर भावनेचा सुवर्णमुकुट आहे. फुटबॉल करंडक केवळ सोन्याची कलाकृती नाही; तो अभियांत्रिकी, कलात्मकता, संरक्षणशास्त्र आणि जागतिक क्रीडा वारशाचा एक अद्वितीय नमुना आहे. त्याची चमक जशी सोन्यामुळे टिकते, तशीच त्याची प्रतिष्ठा जगभरातील अब्जावधी फुटबॉलप्रेमींच्या मनात कायम झळकत राहते. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# भयावह घटनांचा गंभीर इशारा

गतवर्षी इंदूर येथील सोनम रघुवंशी प्रकरण चांगलेच चर्चेत होते. आता पुण्यातील सिया गोयल प्रकरणाने समाजमन पुन्हा हादरले आहे. समाजात अशा काही घटना घडल्या की मन सुन्न होते. प्रेमसंबंधातून हत्या, आई-वडिलांविरुद्ध गुन्हे, शिक्षकांचा अपमान, किरकोळ कारणांवरून हिंसा, व्यसन, जबाबदारीपासून पळ काढणारी मानसिकता आणि स्वतःच्या इच्छेसाठी कोणत्याही टोकाला जाण्याची तयारी ही वृत्ती वाढत असल्याचेच या घटना अधोरेखित करतात. खरं म्हणजे कुटुंब पद्धती, कुटुंबातून सहज रुजणारा मूल्यसंस्कार हे आमच्या संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. मात्र, जेव्हा अशा घटना घडतात त्यावेळी गत काही दशकांमधील झालेले बदल आणि त्याचा दृश्य परिणाम संवेदनशील मनात अस्वस्थता निर्माण करतात.

पूर्वी कुटुंबांमध्ये मुलांवर तर प्रेम केले जायचेच; त्याचबरोबर शिस्तीची शिकवणही दिली जायची. घरात आई-वडिलांचा धाक, शिक्षकांबाबत आदर तर वडीलधाऱ्यांचे ऐकण्याची सवय होती. हे करू नकोस असे कोणी सांगितले तर त्यामागे काळजी, अनुभव, प्रेम आहे हे मुलांना कळत होते. आज मात्र परिस्थिती बदलल्याचे चित्र आहे. मुलं दुखावली जाऊ नयेत म्हणून त्यांना कधी रागावू नका, त्यांच्यावर कोणतेही बंधन घालू नका, त्यांच्या प्रत्येक मताला अंतिम सत्य माना, त्यांना पूर्ण स्वातंत्र्य द्या अशी विचारसरणी मोठ्या प्रमाणात रुजत आहे. त्याचा परिणाम असा झाला की, मुलांना प्रेम तर मिळते; पण मर्यादा शिकवल्या जातात का? अधिकार सांगितले गेले, पण कर्तव्याची शिकवण दिली जाते का? स्वातंत्र्य दिले गेले, पण जबाबदारीची जाणीव करून दिली जाते का? असे प्रश्न निर्माण झाले आहेत. आज अनेक घरांमध्ये आई-वडील मुलांचे पालक कमी आणि मित्र जास्त बनले आहेत. मित्र असणे चुकीचे नाहीच; पण पालकाची भूमिका सोडून चालत नाही. मुलाला जे हवे ते लगेच मिळते. हट्ट पूर्ण होतात. अनेकदा चूक झाली तरी तिचे समर्थन केले जाते. शाळेत शिक्षकांनी तक्रार केली तर मुलाची बाजू घेतली जाते. अशा वातावरणात वाढलेल्या मुलाला आयुष्यातील पहिला नकार, पहिला अपमान किंवा पहिले अपयश सहन करणे कठीण जाते. जीवन त्याच्या इच्छेनुसार चालत नाही तेव्हा संताप, नैराश्य, हिंसा किंवा सूडभावना निर्माण होते. म्हणूनच आज आपण पाहतो की, क्षुल्लक कारणांवरूनही एकमेकांचे जीव घेतले जात आहेत. प्रेम नाकारले म्हणून हत्या, वाद झाला म्हणून मारामारी, समाज माध्यमावर टीका झाली म्हणून आत्महत्येचे प्रयत्न ही केवळ समस्या नाही तर पुढील पिढी भावनिकदृष्ट्या कमकुवत होत असल्याचे लक्षण आहेत.

आधुनिकतेच्या नावाखाली आपल्या परंपरा, संस्कृती आणि मूल्यांची थट्टा करण्याची प्रवृत्तीही वाढली आहे. आधुनिक होणे म्हणजे आपल्या मूल्यांचा तिरस्कार करणे नव्हे. आपल्या संस्कृतीतील कुटुंबव्यवस्था, नात्यांचे पावित्र्य, संयम, त्याग, कर्तव्य आणि नैतिकतेकडे दुर्लक्ष केले तर समाजात स्वार्थ आणि व्यक्तिकेंद्रीपणा वाढणार नाही का? आज मुलांना सर्व काही शिकवले जाते; करीअर शिकवले जाते, तंत्रज्ञान शिकविले जाते, पैसे कमवायला शिकवले जाते. या बाबी गरजेच्या आहेतच; पण चांगला माणूस म्हणून जगण्यासाठी सत्याच्या बाजूने उभे राहणे, चुकीची कबुली देणे, वडीलधाऱ्यांचा आदर करणे, स्त्रियांचा सन्मान करणे, अपयश स्वीकारणे आणि स्वतःच्या इच्छांवर नियंत्रण ठेवणे या मूल्यांचे शिक्षण देणार तरी कोण? याचाही विचार समाजधुरिणांनी करण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. वास्तविक माणूस म्हणून जगण्याकरिता लागणारी मूल्य सहज विकसित होणारी आमची कुटुंब व्यवस्था आहे. पण आधुनिक जीवनशैली नावाच्या मृगजळामागे धावत असताना अनेकांना ही व्यवस्था जुनाट वाटते. भौतिकतेच्या हव्यासापोटी रूढी-परंपरा नकोशा वाटतात. ज्यावेळी अशा भयंकर हृदयाचा थरकाप उडवणाऱ्या घटना घडतात त्यावेळी मात्र संस्कार, संस्कृती, नैतिकता याची आठवण होते. कोणत्याही राष्ट्राचे भविष्य केवळ त्याच्या भौतिक प्रगतीवर नव्हे तर ते त्या राष्ट्राच्या मुलांच्या चारित्र्यात असते आणि चारित्र्याची पायाभरणी ही कुटुंबातील प्रेम, शिस्त, संस्कार आणि जबाबदारीची जाणीव यांच्या मजबूत आधारावरच होत असते. जर हा पाया कमकुवत झाला, तर कितीही प्रगती झाली तरी समाज आतून पोखरलेला राहतो. आज दिसणाऱ्या या भयावह घटनांकडे केवळ गुन्हे म्हणून नव्हे, तर समाजाला मिळालेला गंभीर इशारा म्हणून पाहण्याची गरज आहे. ■

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# पंजाब विधानसभा भाजपा स्वबळावर लढणार

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व विजय मिळाल्यानंतर भाजपाने आपले संपूर्ण लक्ष पंजाब विधानसभा निवडणुकीकडे वळविले आहे. देशात बिहार आणि महाराष्ट्रानंतर पंजाब असे राज्य होते, ज्याठिकाणी भाजपाला आपल्या मित्रपक्षासोबत निवडणूक लढवावी लागत होती. या तीनही राज्यात सुरुवातीची अनेक वर्षे भाजपा लहान भावाच्या भूमिकेत होता. आता मात्र बिहार आणि महाराष्ट्रात भाजपा मोठ्या भावाच्या भूमिकेत आला आहे. मात्र भाजपा या दोन्ही राज्यात अजूनही स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या मानसिकतेत नाही. या दोन्ही राज्यात भाजपा मित्रपक्षांसोबत निवडणूक लढवत आहे. पंजाबचाही याला अपवाद नव्हता. पंजाबमध्ये गेली अनेक वर्षे भाजपा शिरोमणी अकाली दलासोबत निवडणूक लढवत होता. २०२२ मध्ये पहिल्यांदा याला छेद गेला.

२०२७ मध्ये होणारी पंजाब विधानसभेची निवडणूक भाजपाने स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला असल्याचे समजते. या राज्यात भाजपाने अकाली दलाशी असलेली आपली मैत्री तोडली नाही, तर अकाली दलाने भाजपासोबतच्या आपल्या मैत्रीला निरोप दिला. या संधीचा फायदा घेत २०२७ मध्ये होणाऱ्या पंजाब विधानसभेच्या निवडणुकीत सर्व म्हणजे ११७ जागा स्वबळावर लढविण्याची घोषणा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी केली आहे. पंजाबमध्ये भाजपा आणि शिरोमणी अकाली दल पुन्हा एकत्र येतील, अशी चर्चा सुरू झाली होती. मात्र, भाजपा आणि अकाली दलाचे सुखबीरसिंग बादल यांनी या चर्चेला इन्कार केला. पंजाबमध्ये शिरोमणी अकाली दल आणि महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना हे एकेकाळी भाजपाचे सर्वात जुने मित्र होते. मात्र आता दोन्ही पक्षांची स्थिती 'दोस्त दोस्त ना रहा' सारखी झाली आहे.

पंजाबमध्ये सध्या आपची सत्ता आहे. भगवंत मान मुख्यमंत्री आहेत. पंजाबमध्ये यावेळी बहुरंगी लढत होण्याची शक्यता आहे. भाजपा, काँग्रेस, अकाली दल आणि सत्ताधारी आप अशी लढत राज्यात होईल, असे दिसते. पंजाबमधील आपली सत्ता टिकविण्यासाठी आपला भाजपा, काँग्रेस आणि अकाली दल अशा तिघांशी लढत द्यावी लागणार आहे. मुख्यमंत्री म्हणून भगवंत मान यांची पाच वर्षांची कामगिरी समाधानकारक राहिली नाही; मात्र आपने मान यांनाच पुन्हा नाईलाजाने मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले आहे. आपचे सध्या पूर्णपणे रिकामे असलेले सर्वेसर्वा अरविंद केजरीवाल यांच्यासमोर याशिवाय अन्य कोणताही पर्याय नव्हता. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राघव चढ्डा यांच्यासह आपचे राज्यसभेतील सहा खासदार भाजपात सहभागी झाले आहेत. यामुळे आपला मोठा धक्का बसला आहे. पंजाबात भ्रष्टाचार, अमली पदार्थ आणि बेरोजगारी तसेच कायदा आणि सुव्यवस्था असे चार प्रमुख मुद्दे आहेत. यासोबत धर्मांतरण ही पंजाबमधील सर्वात मोठी समस्या झाल्याचे समजते. त्यामुळेच सत्तेवर आल्यानंतर धर्मांतरावर बंदी घालण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणूक आटोपल्यानंतर भाजपा पंजाब विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागला आहे. काही दिवसांपूर्वी दिल्लीतील भाजपा मुख्यालयात पंजाबमधील भाजपा नेत्यांना एका बैठकीसाठी बोलाविण्यात आले होते. भाजपाचे राष्ट्रीय संघटनमंत्री बी. एल. संतोष याच्यासोबत ही बैठक झाली. विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा भाग म्हणून भाजपाने पंजाबमधील आपचा अध्यक्ष बदलवला. आतापर्यंत काँग्रेसमधून आलेले सुनील जाखड पंजाब भाजपाचे अध्यक्ष होते. आता भाजपाने केवलसिंह ढिल्लो यांच्याकडे पंजाब प्रदेश भाजपाची जबाबदारी दिली आहे. विशेष म्हणजे निवडणूक तयारीचाच भाग म्हणून भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन तीन दिवस पंजाबच्या दौऱ्यावर होते.

भाजपाचे रवनीतसिंग बिट्टू सध्या केंद्रात मंत्री आहेत. मात्र राज्यसभा सदस्य म्हणून त्यांचा कार्यकाळ संपला आहे. भाजपाने त्यांना राज्यसभेची फेरउमेदवारी दिली नाही. त्यामुळे त्यांना केंद्रातील मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागणार आहे. पंजाब विधानसभा निवडणुकीत बिट्टू यांचा उपयोग करण्याचा भाजपाचा विचार असल्याचे समजते. सामान्यपणे भाजपाच्या कोणत्याही कार्यक्रमात जनसंघाचे संस्थापक असलेले डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि भारतमातेचे छायाचित्र राहात असते. यावेळी पंजाबमध्ये मात्र भाजपाने या तीन छायाचित्रांसोबत महाराजा रणजितसिंह यांचेही चौथे छायाचित्र ठेवले होते. पंजाबमध्ये भाजपासोबतच्या युतीचा फायदा हा शिरोमणी अकाली दलाला मोठ्या प्रमाणात होत होता. अकाली दलाला राज्यात शिखांची तर भाजपाला हिंदूंची मते मिळायची. या दोन्ही मतांमुळे अकाली दलाचे सरकार राज्यात सत्तेवर येत होते. मात्र, २०२० मध्ये पंजाबमधील शेतकरी आंदोलनाचे निमित्त करीत अकाली दलाने भाजपाशी असलेली आपली मैत्री तोडली आणि याचा सर्वाधिक फटका त्यालाच बसला. राज्यात सत्तेवर येणे त्याला कठीण झाले. पंजाबमध्ये भाजपा आणि अकाली दलाची युती ही नैसर्गिक होती; राज्यातील जनतेने ती स्वीकारली होती. आता अकाली दलाला स्वबळावर लढावे लागणार असल्यामुळे सत्तेवर येण्याची त्याची शक्यता मावळली आहे.

२०२२ च्या विधानसभा निवडणुकीत हे दोन्ही पक्ष पहिल्यांदा वेगवेगळे लढले. भाजपाने विधानसभेच्या दोन जागा जिंकल्या तर अकाली दलाला फक्त ३ जागांवर समाधान मानावे लागले. राज्यात भाजपा आणि अकाली दल यांची युती होती, तेव्हा भाजपा विधानसभेच्या २३ जागा लढवायचा आणि अकाली दल ९४. लोकसभेच्या १३ पैकी १० जागा अकाली दल लढवायचा तर भाजपाच्या वाट्याला फक्त ३ जागा यायच्या. म्हणजे भाजपाला दोन्ही ठिकाणी लहान भावाची भूमिका घ्यावी लागायची. भाजपाला आता कोणत्याच राज्यात लहान भावाची भूमिका मान्य नाही. बिहार आणि महाराष्ट्रात भाजपा कधीच मोठा भाऊ झाला आहे. आता पंजाबमध्ये मोठा भाऊ होण्याच्या तयारीत आहे. अकाली दलासोबतची युती तुटल्याचे भाजपाला अल्पकालीन नुकसान झाले असले, तरी त्याचा दीर्घकालीन फायदाही झाला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पंजाबमध्ये काँग्रेसने ७ तर आपने ३ जागा जिंकल्या. शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर बादल या एकमेव विजयी झाल्या. सरबजितसिंह खालसा आणि खलिस्तान समर्थक अमृतपाल सिंह हे दोन अन्य उमेदवारही विजयी झाले. भाजपाला लोकसभेची एकही जागा जिंकता आली नसली, तरी काँग्रेस आणि आपनंतर भाजपा राज्यात १८.५६ टक्के मते घेत तिसऱ्या स्थानावर आला. भाजपाने अकाली दलालाही मागे टाकले. त्यामुळे यावेळी भाजपाचा उत्साह वाढला आहे. भाजपाने राज्यातील विधानसभेच्या सर्व म्हणजे ११७ जागा स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला आहे. भाजपा पूर्ण तयारी करूनच कोणत्याही राज्यातील निवडणुकीला सामोरा जात असतो. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह पंजाबमधील विधानसभा निवडणुकीवर जातीने लक्ष ठेवून आहेत. अमित शाह ज्या राज्यातील निवडणुकीत लक्ष घालतात, तेथे भाजपाला जिंकण्यापासून कोणी रोखू शकत नाही. ■

९८८१७१७८१७

## डॉ. राजीव पोतदार यांचे अभिनंदन



नागपूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत भाजपाचे ज्येष्ठ नेते व महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ. राजीव पोतदार हे प्रचंड मतांनी निवडून आले. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन. डॉ. पोतदार हे भाजपाचे जुने व निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. त्यांनी नागपूर जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी दोन वेळा काम केले. या काळात त्यांनी जिल्हा पिंजून काढला. जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी त्यांची घट्ट नाळ जुळत गेली. डोक्यावर बर्फ, तोंडात साखर व पायाला चक्र हे आदर्श कार्यकर्त्यांचे सूत्र ते शब्दशः जगले. सामान्य कार्यकर्त्यालाही विश्वास दिला. पदाचा बडेजाव न मिरवता सहजतेने कार्यकर्त्यांत मिसळणारा नेता ही त्यांची प्रतिमा याच काळात निर्माण झाली. अध्यक्षपदाचा दोन वेळचा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतरही कार्यकर्त्यांच्या मनातील त्यांच्याविषयीचा आदर कमी न होता तो वाढतच गेला. पूर्वी अखंड असलेला नागपूर जिल्हा, ज्याचे आज काटोल व रामटेक असे दोन जिल्हे झाले आहेत, या दोन्ही जिल्ह्यांतील प्रत्येक मंडळातील पन्नास-शंभर कार्यकर्त्यांना नावानिशी ओळखणारा नेता ही डॉक्टर साहेबांची खरी ओळख. अतिशय नाराज होऊन आलेल्या कार्यकर्त्यालाही, ''अरे, असे कसे चालेल... हे तुलाच पाहावे लागेल बरे,'' असे सांगत त्याची नाराजी दूर करण्याची विलक्षण हातोटी त्यांना लाभली आहे.

कळमेश्वर व सावनेर विधानसभा हे त्यांचे खरे कार्यक्षेत्र. जाती-धर्माच्या भिंती त्यांनी केव्हाच ओलांडल्या. अतिशय चांगली असलेली वैद्यकीय प्रॅक्टिस त्यांनी वेळोवेळी बाजूला ठेवली. परिवारालाही त्यांना फार वेळ देता आला नाही. पण याचे कधी त्यांनी भांडवल केले नाही. समर्पित व पक्षाच्या विचारधारेवर अतूट निष्ठा असलेला कार्यकर्ता हीच त्यांची खरी ओळख. आज ते आमदार झालेत याचा आनंद जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांना आहे. ते आमदारकीची कारकीर्दही पक्षासाठी व पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी कामी लावतील हा विश्वास आहे. पुन्हा एकदा डॉ. राजीव पोतदार यांचे अभिनंदन.

**प्रा. श्रीकांत पांडे**/९४२३१०२४५५

## वाचक पत्रे

### धाक आणि भीती वाटावी असे नियम हवेत

समुद्राच्या सान्निध्यात आनंद घेण्यासाठी दरवर्षी लाखो पर्यटक गणपतीपुळे येथे भेट देतात. मात्र २०२३ पासून गणपतीपुळे समुद्रात १४ जणांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी व चिंताजनक आहे. अनेक पर्यटकांना समुद्राचा पुरेसा अनुभव नसतो किंवा पोहण्याची कला अवगत नसते. तरीही खोल पाण्यात जाऊन धोकादायक लाटांमध्ये खेळणे, सेल्फी काढण्याच्या नादात सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे अशा प्रकारांमुळे अपघातांना आमंत्रण मिळते. स्थानिक जीवरक्षक, पोलिस आणि प्रशासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सूचनांकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. नियमांचे पालन न करणे तसेच कायद्याचा धाक, भीती न वाटणे यामुळे ही अपघातांची संख्या वाढण्यास हातभार लागतो. त्यामुळे समुद्रकिनाऱ्यांवरील सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या उत्साही पर्यटकांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. पर्यटकांमध्ये कायदा व नियमांविषयी आदर आणि धास्ती निर्माण झाल्यासच अशा दुर्घटनांचे प्रमाण कमी होईल. यासाठी प्रशासनाने जनजागृतीबरोबरच नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

**विश्वनाथ पंडित**/ठाणे

■■■

### आगीच्या घटना आणि प्रशासकीय जबाबदारी

लखनौ आणि दिल्लीतील कोचिंग क्लासच्या इमारतीला लागलेल्या भीषण आगीच्या घटनांनी संपूर्ण देश हादरून गेला आहे. या दुर्दैवी घटनांत अनेक निष्पाप विद्यार्थ्यांना आपला जीव गमवावा लागला. चौकशीअंती समोर आलेले सत्य धक्कादायक आहे. ज्या इमारतींमध्ये हे कोचिंग क्लासेस सुरू होते, त्यांच्याकडे अग्निशामक दलाचे साधे प्रमाणपत्रही नव्हते. आता या घटनांनंतर शहरांमधील सर्व इमारतींची तपासणी करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. मात्र, ही 'सुबुद्धी' केवळ अशा दुर्दैवी घटनांनंतरच का येते? हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. नियमावलीनुसार, १५ मीटरपेक्षा जास्त उंचीच्या इमारतींचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी महानगरपालिका आणि अग्निशामक दल अशा दोन्ही यंत्रणांकडून नकाशा आणि सुरक्षा सुविधांची कडक तपासणी होणे बंधनकारक आहे. असे असूनही, शहरांत आणि विशेषतः पुण्यासारख्या वेगाने विस्तारणाऱ्या शहरात व उपनगरांमध्ये सर्रासपणे नियमांची पायमल्ली करून बांधकामे केली जात आहेत. प्रशासनाला कळकळीची विनंती आहे की, केवळ घटना घडल्यावर जाग येण्यापेक्षा, 'प्रतिबंधात्मक कारवाई' अधिक महत्त्वाची आहे. अशा बेकायदेशीर इमारतींचे, चालू बांधकामांचे त्वरित ऑडिट व्हावे आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. सामान्य नागरिकांनीही आपल्या सुरक्षेबाबत जागरूक राहायला हवे, पण कायद्याची अंमलबजावणी करण्याची मुख्य जबाबदारी प्रशासनाचीच आहे. प्रशासनाने आता तरी आपली जबाबदारी ओळखून 'दिसण्यापुरती' नाही, तर 'करून दाखवण्यापुरती' कारवाई करावी. ■

**शंतनु चिंचाळकर**/पुणे

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापुरात ऑलिंपिक दिन उत्साहात साजरा

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गौरव



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जून -**

सोलापूर जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय आणि स्वामी विवेकानंद प्रशाला, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, २३ जून रोजी ऑलिंपिक दिन कार्यक्रम २०२६ चे अत्यंत उत्साही वातावरणात आयोजन करण्यात आले होते. या दिनाचे औचित्य साधून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्राप्त खेळाडू ,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूरचे जिल्हा क्रीडाधिकारी प्रकाश मोहारे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नॅब सोलापूरचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश यलगुलवार उपस्थित होते. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते क्रीडा संस्कृतीचे जतन करणाऱ्या आणि देशाचे व राज्याचे नाव उंचावणाऱ्या आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू व मार्गदर्शकांचा स्मृतिचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

**राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू :** अरुण राठोड, मदन रानगट (मैदानी), भुवनेश्वरी जाधव, आर्या जाधव (कराटे) साई ढवळे, गौरी ढवळे (रायफल शुटिंग) सुंधा जिद्दे (पॅरा बॅडमिंटन ), बळीराम दळवे, ध्रुव राऊत (डॉजबॉल) श्रावणी सूर्यवंशी(डायव्हिंग) अर्चना व्हनमाने, सृष्टी रुपनवर, सपना बंडे, गौरी कासवीद,चेतन चव्हाण,रवीं दरगोंडा, सादिया मुल्ला(खो खो) तनिष्का ठोकळ, साईराज हनमे (धनुर्विद्या).

या कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता वरकड, तालुका क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे, तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड, क्रीडा अधिकारी नदीम शेख, क्रीडा अधिकारी इजियाज पठाण,शशीभूषण यलगुलवार, नरसिंह असादे, पद्माकर कुलकर्णी आणि स्वामी विवेकानंद प्रशालेचे मुख्याध्यापक हणमंत नारायणकर क्रीडा शिक्षक खंडू शिंदे आदी उपस्थित होते. तसेच सोहळ्याला सोलापूर जिल्ह्यातील अनेक क्रीडाप्रेमी व मान्यवर, क्रीडा मार्गदर्शक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**यांचा झाला सन्मान**

**शिवछत्रपती पुरस्कार विजेते संघटक व खेळाडू:** हाजीमलंग नदाफ सर(बास्केटबॉल ), श्रीकांत ढेपे(खो-खो).उमेश सूळ (कुस्ती), भरत मेकाले (उपमहाराष्ट्र केसरी), अजित संगवे (क्रीडा पत्रकार).

# मुदलियार आणि सातोस्कर संघांनी शानदार विजय

## लिटिल चॅम्प क्रिकेट : सुजल भांडेकर, श्लोक चौगुले सामनावीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जून -**

लिटिल चॅम्प क्रिकेट स्पर्धेत साखळी सामन्यात मुदलियार आणि सातोस्कर संघांनी शानदार विजय मिळवले.

जुळे सोलापूर येथील भंडारी क्लबच्या मैदानावर झालेल्या पहिल्या सामन्यात मुदलियार संघाने चंदू खाडिलकर संघाचा ८ गडी राखून पराभव केला, तर दुपारच्या सामन्यात सातोस्कर संघाने चंदू पवार संघावर ४४ धावांनी मात केली.



सुजल भांडेकर



श्लोक चौगुले

पहिल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना चंदू खाडिलकर संघाला मुदलियारच्या भेदक गोलंदाजीसमोर मोठी धावसंख्या उभारता आली नाही. त्यांचा संपूर्ण संघ १६.४ षटकांत ९ बाद ७७ धावांवर मर्यादित राहिला. यात मुदलियार संघाकडून सुजल भांडेकरने ३ षटकांत १० धावा देत ३ बळी घेतले, तर गणेश वेर्नेकरने २ तर मानस जैस्वालने १ बळी टिपला. ७८ धावांच्या माफक लक्ष्याचा पाठलाग करताना मुदलियारच्या फलंदाजांनी संयमी खेळ केला. नीलच्या नाबाद २६ धावा (२५ चेंडू, ५ चौकार), सोमेश लोखंडेच्या १२ धावा आणि साईविराजच्या १० धावांच्या जोरावर त्यांनी १२ षटकांत २ बाद ७८ धावा करून सामना सहज जिंकला. सुजल भांडेकरला 'सामनावीर' तर नीलला 'सर्वोत्तम फलंदाज' घोषित करण्यात आले.

दुपारच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना सातोस्कर संघाने २५.३ षटकांत ९ बाद १६६ अशी स्पर्धात्मक धावसंख्या उभारली. चंदू पवार संघाकडून गोलंदाजी करताना अवनीक एल. याने ३ षटकांत २० धावा देऊन ३ बळी घेतले. १६७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चंदू पवार संघाचा डाव २६.१ षटकांत १२२ धावांवर आटोपला. चंदू पवार संघाकडून सुरज मोरे यांनी ४० चेंडूंत ४ चौकारांसह सर्वाधिक नाबाद २९ धावा केल्या. सातोस्करच्या श्लोक चौगुलेने १५ धावांत ३ बळी आणि अर्जुन पाटीलने ४ धावांत २ बळी घेत चंदू पवार संघाला बॅकफूटवर ढकलले. सातोस्करच्या श्लोक चौगुलेला 'सामनावीर', अर्जुन पाटीलला 'सर्वोत्तम गोलंदाज', सुरज मोरे यांना 'सर्वोत्तम फलंदाज' आणि अवनीक एल. यांना 'फायटर ऑफ द मॅच' पुरस्काराने गौरविण्यात आले.

# प्रा. शरद सावळे यांना शारीरिक शिक्षणातील पीएच.डी. पदवी

**बार्शी, दि.२४ जून -**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशनचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. शरद सावळे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने शारीरिक शिक्षणशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.



प्रा. सावळे यांनी संशोधनासाठी 'वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संशोधनविषयक अभिवृत्ती विकसनासाठी शारीरिक शिक्षण संशोधन पद्धती कार्यक्रमाचे विकसन व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास' हा विषय निवडला होता. बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर येथील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. बी. सी. मोहिते यांनी संशोधन मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. प्रा. सावळे यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. पी. शिखरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एम. एस. डिसले आदींनी अभिनंदन केले.

# पाठलाग करून मजूर महिलेला धमकी

**सोलापूर :** कामावरून घराकडे निघालेल्या ३३ वर्षीय मजूर महिलेला अश्लील हातवारे करून, पाठलाग करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एकाविरुद्ध एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. निसार अब्दुलगणी बागवान (वय ५८, रा. नई जिंदगी) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. २२ जून रोजी संध्याकाळी पावणे आठच्या सुमारास एम आयडीसी भागातील ई.आर.टी. चौकातून जात असताना, आरोपी निसारने त्यांना पाहून मनाला लज्जा वाटेल असे अश्लील हातवारे केले. महिलेने दुर्लक्ष केले असता, आरोपीने तिचा पाठलाग केला आणि कोंडा नगर येथे त्यांना अडवून, 'तुला लय मस्ती आली आहे, तुला काय करायचे ते कर, तुला बघून घेतो' अशी धमकी दिली. हवालदार घोडके हे तपास करीत आहेत.

# संगमेश्वर कॉलेजमध्ये योग दिन उत्साहात




**सोलापूर, दि. २४ जून-**

बारावा योग दिन संगमेश्वर कॉलेजमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. संगमेश्वर रात्र विभाग आणि विविध शाखांच्या माध्यमातून योग प्रात्यक्षिकाचे आयोजन महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले होते. प्रा.संतोष खेंडे यांनी प्रास्तविक केले. योगशिक्षक अजित कलागते यांनी योग प्रात्यक्षिकांच्या सूचना आणि निवेदन केले. त्यांच्यासोबत प्रा. शिवराज पाटील आणि कॉमर्स विभागाची विद्यार्थिनी स्नेहा जाधव हिने प्रात्यक्षिक केले. संगमेश्वर कॉलेज शिक्षण संकुलातील सर्व शिक्षक, कर्मचारी बांधवानी प्रशिक्षकासोबत प्रात्यक्षिके केली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ श्रीनिवास गोठे, कनिष्ठ विभाग पर्यवेक्षक डॉ मल्लिनाथ साखरे यांच्यासह जिमखाना विभागाचे डॉ.शरण वांगी, प्रा.विक्रांत विभुते आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलांनी दिलेल्या अधिकार व माहिती व कागदपत्रावरून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ - शास्त्री नगर ब झोपडपट्टी, सोलापूर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील घर नं. ६७० व ४५३ १/२ ही मिळकत घरजागा असून यांसी म.न.पा. मिळकत क्र.१०११७०२६४१ असा आहे. सदरची मिळकत घरजागा आमचे अशील श्रीमती. अंबुबाई गोरखनाथ बिज्जा यांची सासू कै. रुक्मिणीबाई नरसप्पा बिज्जा यांचे नांवावर असून त्यांचे दि.१४/०४/१९८९ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे व तसेच त्यांचे सासरे म्हणजे पतीचे पती कै.नरसप्पा व्यंकप्पा बिज्जा यांचे ही त्यापुर्वीच दि. ०१/०५/१९६६ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे व तसेच आमचे अशिलाचे पती गोरखनाथ नरसप्पा बिज्जा यांचेही दि. ०२/११/२००० रोजी मृत्यु झालेला आहे. या तिघांचे मृत्युपश्चात आमचे अशील हे त्यांची सून कुटुंबकती या नात्याने मुख्य कायदेशीर वारस आहे.

सदर ठिकाणी आमचे अशिलाचे सासू कै. रुक्मिणीबाई नरसप्पा बिज्जा यांचे नांवे घर नं. ६७० व ४५३ १/२ शास्त्रीनगर ब, सोलापूर येथे एकूण ४८० चौ.फूट जागेत १० X १५ फुटांचे दोन खोल्या आहेत, सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधून वरती पन्हाळी पत्रे अँगल घातलेले आहेत. यात लाईट व नळ कनेक्शनची सुविधा आहे.

सदरहू घरजागेत आमचे अशील श्रीमती. अंबुबाई गोरखनाथ बिज्जा हे त्यांचे कुटुंबासह कायमस्वरुपी त्यांचे सासू-सासरे व पतीचे हयातीपासून राहणेस आहेत. सदरहू घर नं. ६७० व ४५३ १/२ शास्त्रीनगर ब सोलापूर या मिळकतीवरील आमचे अशिलाचे सासू कै. रुक्मिणीबाई नरसप्पा बिज्जा हे मयत झाल्याने त्यांचे नाव कमी करुन आमचे अशील श्रीमती. अंबुबाई गोरखनाथ बिज्जा यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशील म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर अन्य कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचेही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशील त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा. चे कर आकारणी विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : २४/०६/२०२६

सही/-
**ढेकणे एसे.एम.**
**ॲडव्होकेट**
**रा. १२६-ए वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे डव्होकेट**

## जाहीर प्रगटन

प्रकरण क्र. ९७१/२०२६

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापूर यांचे कार्यालय

**प्रकरण:- जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

अर्जदार महादेव शामराव गायकवाड रा. काक्रंबा ता. तुळजापूर येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांची स्वतः नामे महादेव शामराव गायकवाड यांचा जन्म दिनांक १०/१०/१९४९ रोजी काक्रंबा येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

**सही/-**
**तहसिलदार तुळजापूर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळवण्यात येते की तुकडी जिल्हा सोलापूर, पोट तुकडी तालुका मोहोळ, गाव - शेटफळ येथील गट नंबर ९२/१/ब यांसी एकूण क्षेत्र १ हेक्टर ५४ आर पैकी क्षेत्र १ हेक्टर ५४ आर इथून पुढे 'सदर मिळकत' असे संबोधलेले आहे. सदर मिळकत ही श्री. माधव भागवत वागज यांचे मालकीची असून, त्यांनी ती श्री. रवींद्र रघू बोबडे यांना दिनांक १०/०६/२०२६ रोजीच्या भाडेपट्ट्याने भाड्याने दिलेली आहे.

सदर मिळकतीवर बांधण्यात येणाऱ्या आमच्या अशील कंपनीच्या म्हणजेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या पेट्रोल पंपासंदर्भात ही नोटीस देण्यात येत आहे. सदर मिळकत ही संपूर्णपणे निर्दोष, निजोखमी व बोजारहीत असल्याची, तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वादाचा विषय नसून त्यावर जप्ती अथवा मनाईचा हुकूम नाही अशी खात्री व भरवसा आमच्या अशिलांना म्हणजेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना दिला आहे तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लीज, लोन, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, कुळ, खंड, साठेखत, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत आमच्याकडे समक्ष येऊन, मूळ कागदपत्रांनिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी.

येणेप्रमाणे मुदतीत मूळ कागदपत्रांनिशी आक्षेप न आल्यास, सदर मिळकतीवर, अन्य कोणाचीही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजण्यात येईल व व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. सबब जाहीर नोटीस दिली असे. सोलापूर, दिनांक २४/०६/२०२६.

सही/-
**ॲड. श्री. आनंद रामचंद्र देशपांडे,**
**बी.ए., एल.एल.बी., एम.ए. (इतिहास).**
**पत्ता : ९१/अ, मुरारजी पेठ, सोलापूर - ४१३००१.**
**मोबाईल : ९८२३२९१६४३**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर व आजूबाजूच्या भागातील सर्व रहिवाशांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डी ।। व सब डी ।। सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर तसेच शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील जुनी मिल कामगार गृहनिर्माण संस्था मर्या. (धरमशीलाईन) मुरारजी पेठ, सोलापूर येथील पुढील वर्णनाची ब्लॉक जागा तिचा तपशिल पुढीलप्रमाणे जुना स.नं. २२७ यांसी नविन स.नं.८५२१/१/१०/३७ पैकी १०/९१ जुनी मिल कामगार गृहनिर्माण संस्था मर्या. (धरमशीलाईन) मुरारजी पेठ, सोलापूर क्षेत्र ४४ चौ.मी. इतके असून सदर जागेत लिव्हींग, किचन, २ बेडरुम, संडास, बाथरुम असे एकूण बांधकाम ४४ चौ.मी. क्षेत्रात आर.सी.सी. स्वरूपाचे आहे.

सदरची घरजागा श्री. अशोक ज्ञानोबा तिन्हेकर यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची असून आमचे अशिलांना सौ. अंबिका अशोक तिन्हेकर यांना खुषखरेदी देण्याचे ठरवून आमचे अशिलांकडून इसारा रक्कम स्विकारलेली आहे. सदरची घरजागा ही निर्वेध व निजोखमी असल्याचा व ती यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लीज अथवा अन्यमार्गाने गुंतविलेली नाही, अशी हमी त्यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू घरजागेवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, लीज, लीन, इजमेंट राईट, कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा, अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ (आठ) दिवसांच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरूपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही, कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २४/०६/२०२६

सही/-
**ॲड. मनोज डी. घोडके**
**एम.कॉम., डीसीए, एलएल.बी.**
**शॉप नं. २, दुधपंढरी जवळ, पार्क चौक,**
**सोलापूर-४१३००१ मोबा. ९८२३५३१५७२**

## करमाळा नगरपरिषद

जनसेवा हिच ईश सेवा

करमाळा, जि. सोलापूर ४१३००३ दूरध्वनी क्रमांक (०२१८२) २२०३१५
E-Mail : comckarmala@gmail.com

जावक क्रमांक : पाणी पुरवठा विभाग ९३३/२०२६ दिनांक २४/०६/२०२६

### जाहीर ई-निविदा सुचना

१) संगम चौक ते स्वामी विवेकानंद चौक येथे नवीन पाईप लाईन टाकणे.

वरील कामांची ई-निविदा योगय त्या नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार यांचेकडून खालील तपशीलात नमूद केलेल्या कामांच्या ई-निविदा विहीत नमुन्यात मान्यताप्राप्त ठेकेदाराकडून मागविण्यात येत आहेत. ई-निविदा फॉर्म स्विकृतीची कार्यवाही खालील दिलेल्या कालावधीत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येईल. आधिक माहिती उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा विक्री | दिनांक २५/०६/२०२८ ते दि. ०२/०७/२०२६ साय. ६ पर्यंत |
| २) | निविदा स्विकृती | दिनांक २५/०६/२०२८ ते दि.०२/०७/२०१६ साय. ६ पर्यंत |
| ३) | निविदा उघडण्याचा दिनांक / वेळ | दि. ०३/०७/२०१६ सकाळी ११.०० वाजता (शक्य झाल्यास) नगरपरिषद कार्यालय, करमाळा. |

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## टी.सी. हरवली आहे

दिनांक १४/६/२६ रोजी नळदुर्ग ते अणदूर प्रवास दरम्यान प्रतीक्षा गुलाब जाधव या नावाची जवाहर महाविद्यालय अणदूर या संस्थेची १२ वी पास टी.सी. हरवली आहे, ज्यांना सापडली असेल त्यांनी खालील पत्त्यावर आणून द्यावी, त्यांना योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**प्रतीक्षा गुलाब जाधव**
**मु.पो. घोडके तांडा, खुदावाडी**
**ता. तुळजापूर, जि. धाराशिव**

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old Name **YASMIN AJIJKHWA PATHAN** has Bee changed to New Name **YASMIN AYUB SHAIKH** and residing at A/p. Khadakpura Vairag Tal. barshi,Dist. Solapur kindly note the same.

**Affi No: 2652642461268501057764**
**Date: 24/06/2026**

## करमाळा नगरपरिषद, जि. सोलापूर

### ई-निविदा प्रसिध्दीकरण सुचना

करमाळा नगरपरिषद, करमाळा नगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रात १५ वा वित्त आयोग योजनेअंतर्गत करावयाच्या खालील विकास कामांची ई-निविदा महाराष्ट्र शासनाकडील नोंदणीकृत वर्ग १ ते ५ अनुभवी ठेकेदारांकडून तांत्रिक ब-१ च्या नमुन्यात स्पर्धात्मक मागवित आहे..

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षित रक्कम | ठेकेदार वर्ग | कामाची मुदत | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | NEW 11 KV FEEDER BAY WITH GANTRY STRUCTURE AS PER APPLICATION RECEIVED BY EXITING HT CONSUMER 347589006470 CHIEF OFFICER, KARMALA NAGAR PARISHAD, KARMALA PUNE ROAD, VILLAGE KARMALA, TAL. KARMALA UNDER 1.3% DDF SCHEME AT 33/11 KV DAHIGAON SUBSTATION | २९,९४,४८०/- | ३०,०००/- | २% रोखीने व ७% बिलातून कपात | १ ते ५ | २ महिने | १,५००/- |

१) निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि. २५/०६/२०२६ सकाळी १०.०० वाजलेपासून ते दि. ०१/०७/२०२६ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत
२) निविदा फॉर्म ऑनलाईन स्विकृतीची दि. २५/०६/२०२६ सकाळी १०.०० वाजलेपासून ते दि. ०१/०७/२०२६ सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत
३) लिफाफा क्रमांक १ व २ उघडण्याचा दिनांक दि. ०३/०७/२०२६ (शक्य झाल्यास)
४) सर्व पात्र / इच्छुक निविदाधारकांनी निविदा पत्र डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या मेन पोर्टल http:// mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**शर्ती व अटी :-**
१) प्राप्त निविदांपैकी कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवला आहे.
२) सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यास अनामत रक्कमेत सवलत दिली जाणार नाही.
३) कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास याबाबत नगरपरिषदेचा निर्णय अंतीम राहील.

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 133581547 | मालमत्तेवर कर्ज | १. भानुदास महादेव पुजारी<br>२. लक्ष्मी भानुदास पुजारी | 17/06/2026 | INR 10,38,503.21/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्र. ६८/२ असलेले निवासी घर, एकूण जमिनीचे क्षेत्रफळ १५०५ चौ. फूट, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे तळमजल्याचे क्षेत्रफळ = १२०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ = १२०० चौ. फूट, ठिकाण: गाव: विटे, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र - ४१३३०४, आणि चतु:सीमा खालीलप्रमाणे: पूर्व: सदाशिव रामचंद्र पुजारी, पश्चिम: अनिल तात्या पुजारी, उत्तर: ग्रामपंचायत खुली जागा, दक्षिण: ग्रामपंचायत खुला रस्ता. .

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

दिनांक : 25/06/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या तारणावर (गहाणखत) सुरक्षित करण्यात आली आहेत. ते संबंधित कर्ज करारांच्या अटी व शर्तींचे पालन करण्यास अपयशी ठरल्यामुळे आणि त्यांच्या खात्यातील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांचे कर्ज खाते 'एनपीए' (अनुत्पादक मालमत्ता) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यांच्याकडून **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित नोटीसनुसार दिली आहे, आणि सदर रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून कंत्राटी दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 143202563 | मालमत्तेवर कर्ज | १. आकाश संजय माळी<br>२. निकिता आकाश माळी | 03/06/2026 | INR 6,20,783.22/- |

**मालमत्तेचा पत्ता :** दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर असलेली सर्व मालमत्ता आणि तिचा हिस्सा, ज्याचे एकूण बांधकाम क्षेत्र ९८०.०० चौ. फूट, एकूण जमीन - ११८८.०० चौ. फूट असून, ती मौजे वैरागवाडी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर येथे स्थित आहे आणि जिची नोंदणी मिळकत क्रमांक ४८०, ग्रामपंचायत हद्द बैरागवाडी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र अशी आहे. सदर मालमत्तेच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व: किसन यल्लप्पा माळी, पश्चिम: रस्ता, उत्तर: संदीप दिलीप माळी, दक्षिण: जयंत हरिबा माळी.

याद्वारे तुम्हाला आवाहन करण्यात येते की, वरील तक्त्यामध्ये दर्शविलेल्या तपशिलानुसार, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जिचे **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीनीकरण झाले असून सध्या ती **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) त्यांच्या संबंधित तारखांपासून करारातील व्याजदरासह आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी रकमा या प्रकाशनाच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत अदा कराव्यात. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** देय रक्कम वसूल करण्यासाठी, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. याशिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत तुम्हाला उपरोक्त सुरक्षित मालमत्ता विक्री, भाडेपट्टा (लीज) किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

दिनांक : 25/06/2026
स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र

# धडाका फुटबॉल विश्वचषकाचा



# घानाने हॅरीच्या संघाला रोखले

**बॉस्टन, २४ जून**

फिफा २०२६ विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत येथे झालेल्या साखळी सामन्यात घानाच्या संघाने स्टार खेळाडू हॅरी केनच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाला गोलशून्यने बरोबरीत रोखले. प्रतिस्पर्धी संघाविरुद्ध कडवा संघर्ष करूनही हॅरीच्या संघाला अखेरच्या क्षणापर्यंत एकही गोल करता आला नाही, अखेर त्यांना एक गुण व एकही गोल न खाता सामना संपवून परतावे लागले.

घानाविरुद्ध थॉमस टुशेलच्या मार्गदर्शनाखालील संघाने आक्रमक खेळ केला, प्रतिस्पर्ध्याच्या बचाव फळीची चाचपणी केली, पण त्यांना गोल करता आला नाही. अन्यथा इंग्लंडचा संघ अंतिम ३२ संघांच्या फेरीच्या एक पाऊल जवळ पोहोचले असते. घानाने शिस्त, संयम आणि एका स्पष्ट योजनेच्या जोरावर सामना बरोबरीत सोडवला. त्यामुळे इंग्लंडचा संघ काहीसा अस्वस्थ दिसला.



हॅरी केन

इंग्लंड 'ग्रुप एल'मध्ये अपराजित राहिले, पण त्यांनी आपल्या दमदार सुरुवातीचे रूपांतर गटावर लवकर नियंत्रण मिळवण्यात करण्याची संधी गमावली.

दुसरीकडे, पनामाविरुद्धचा त्यांचा सलामीचा विजय हा काही अपवादात्मक नव्हता, हे घानाने सिद्ध केले. घानाने गोलशून्यने सामना बरोबरीत राखून अंतिम ३२ च्या फेरीसाठी आपल्या पात्रतेच्या आशा जिवंत ठेवल्या. इंग्लंड व घाना संघांचे प्रत्येकी ४ गुण असून एल गटात ते पहिल्या दोन क्रमांकावर आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

## गट फेरीतील सर्वाधिक गोलचा विक्रम मोडला

**मेक्सिको, २४ जून**

फिफा २०२६ फुटबॉल विश्वचषकाच्या या हंगामातील पहिल्या ४८ सामन्यांमध्ये आतापर्यंत एकूण १४१ गोल झाले आहेत; यंदा विश्वचषकाचे स्वरूप विस्तारित असल्याने आणि गट फेरीतील आणखी २४ सामने बाकी असल्याने, गट फेरीतील एकूण गोलची संख्या अजून वाढणार आहे.ऑस्ट्रियाविरुद्धच्या सामन्यात लिओनेल मेस्सीने केलेला पहिला गोल त्याला स्पर्धेत सर्वाधिक गोल करणारा खेळाडू (टॉप स्कोरर) बनवून गेला; त्याने मिरोस्लाव क्लोझला मागे टाकले आणि सामन्याच्या अंतिम क्षणांत आपल्या गोलच्या संख्येत आणखी भर घातली. ◂ (वृत्तसंस्था)

# आम्ही दाखविलेला आत्मविश्वास महत्त्वाचा : रोनाल्डो



ख्रिस्तियानो रोनाल्डोला गराडा घालून विजयाचा आनंद साजरा करताना पोर्तुगालचे खेळाडू

**ह्युस्टन, २४ जून**

मी खूप आनंदी आहे. माझ्यासाठी आमचे काम आणि आम्ही दाखविलेला आत्मविश्वास सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. आमच्या संघाने खरोखरच चांगली कामगिरी केली आणि त्यात बरीच सुधारणा झाली. 'प्रत्येक संकटातही आशेचा किरण असतो' अशी एक म्हण आहे. अर्थात, वैयक्तिक पातळीवर बोलायचे तर विक्रम करणे नेहमीच छान असते, पण राष्ट्रीय संघाला त्यांची उद्दिष्टे साध्य करण्यात मदत करणे हेच माझे मुख्य ध्येय असते, असे ख्रिस्तियानो रोनाल्डो विजयानंतर म्हणाला.

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये मंगळवारी उझबेकिस्तानविरुद्धच्या सामन्यात पोर्तुगालसाठी दोन गोल करत ख्रिस्तियानो रोनाल्डोने टीकाकारांची बोलती बंद केली

रोनाल्डोचा शेवटचा आंतरराष्ट्रीय गोल १४ ऑक्टोबर २०२५ रोजी हंगेरीविरुद्ध झाला होता. त्यानंतर, विश्वचषकातील पोर्तुगालच्या पहिल्या सामन्यात (डीआर काँगोविरुद्ध) त्याची कामगिरी अपेक्षेपेक्षा कमी झाल्यामुळे टीकाकारांनी त्याच्यावर जोरदार टीका केली. टीकाकारांनी संघ-खेळाडू म्हणून त्याच्या जुळवून घेण्याच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. मंगळवारी रोनाल्डोने या टीकेला आपल्या कामगिरीतून चोख प्रत्युत्तर दिले. रोनाल्डोच्या दोन गोलच्या जोरावर पोर्तुगालने उझबेकिस्तानवर ५-० ने विजय नोंदविला. ◂ (वृत्तसंस्था)

### रोनाल्डोचा विक्रम

» विश्वचषकाच्या इतिहासात गोल करणारा ख्रिस्टियानो रोनाल्डो हा ४१ वर्षे आणि १३८ दिवस वयाचा दुसरा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. या यादीत त्याच्यापुढे केवळ रॉजर मिला आहेत,. रॉजर मिलाने १९९४ मध्ये कॅमेरूनकडून खेळताना रशियाविरुद्ध ४२ वर्षे आणि ३९ दिवस वय असताना गोल केला होता. रोनाल्डोने दोन गोल करीत युसेबियोला मागे टाकत पोर्तुगालचा विश्वचषकातील सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून स्थान मिळवले. हा रोनाल्डोचा दहावा विश्वचषक गोल ठरला, पोर्तुगालच्या कोणत्याही खेळाडूने केलेले सर्वाधिक गोल आहे.

## आजचे सामने

**कुरासाओ वि. आयव्हरी कोस्ट**
वेळ : गुरुवारी रात्री १:३०
स्थळ : लिंकन फायनान्शियल फील्ड, फिलाडेल्फिया

**इक्वेडोर विरुद्ध जर्मनी**
वेळ : गुरुवारी रात्री १:३० वाजतापासून
स्थळ : मेटलाइफ स्टेडियम, न्यू जर्सी

**ट्युनिशिया वि. नेदरलँड्स**
वेळ : शुक्रवारी पहाटे ४:३० वाजतापासून
स्थळ : ॲरोहेड स्टेडियम, कॅन्सस सिटी

**जपान वि. स्वीडन**
वेळ : शुक्रवारी पहाटे ४:३० वाजतापासून
स्थळ : एटी अँड टी स्टेडियम, डॅलस

**तुर्की वि. अमेरिका**
वेळ : शुक्रवारी सकाळी ७:३०
स्थळ : सो-फाय स्टेडियम, लॉस एंजेलिस

**पॅराग्वे वि. ऑस्ट्रेलिया**
वेळ : सकाळी ७:३० वाजतापासून
स्थळ : लेव्हीज स्टेडियम, सॅन फ्रान्सिस्को बे एरिया

# कोलंबियाचा काँगोवर १-० ने विजय

### बाद फेरीतील स्थान निश्चित

**ग्वाडलहारा, २४ जून**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत 'गट के' मधील साखळी सामन्यात डॅनियल मुनोजने ७६ व्या मिनिटाला केलेल्या गोलमुळे कोलंबियाने डीआर काँगोवर १-० ने विजय नोंदविला आणि विश्वचषकाच्या 'अंतिम ३२ संघांच्या' बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले.

या सामन्यात डीआर काँगोचा गोलरक्षक लिओनेल म्पासी याने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने कोलंबियाला गोल करण्यापासून वारंवार रोखून धरले होते आणि सामना निराशाजनक वळणावर नेला होता. मात्र सामन्याच्या ७६ व्या मिनिटाला मुनोजने पेनॉल्टी क्षेत्राच्या उजव्या बाजूने निर्णायक गोल केला. त्याने म्पासीला अखेर हुलकावणी दिली. म्पासीने तोपर्यंत आपल्या शानदार कामगिरीने कोलंबियाचे प्रयत्न हाणून पाडले होते.उझबेकिस्तानवर ३-१ असा विजय मिळवून आपल्या विश्वचषक मोहिमेची सुरुवात करणाऱ्या कोलंबियाने सामन्यात चेंडूवर वर्चस्व राखले आणि अनेक संधी निर्माण केल्या. ७३ व्या मिनिटाला सायमन बांझाच्या पासवर विसाने मारलेला शॉट अडवला गेल्यामुळे डीआर काँगोला आघाडी घेण्याची संधी हुकली, मात्र त्यानंतर काहीच वेळात मुनोजने कोलंबियासाठी गोल केला.

दोन सामन्यांतून सहा गुण मिळवत कोलंबियाने बाद फेरीतील प्रवेश निश्चित केला. आता त्यांचा शेवटचा गट सामना पोर्तुगालविरुद्ध होईल. पोर्तुगालने मंगळवारीच उझबेकिस्तानचा ५-० असा पराभव केला होता. ◂ (वृत्तसंस्था)



कोलंबियासाठी गोल करताच जल्लोष करताना डॅनियल मुनोज

# नेमार उपलब्ध, पण खेळणे अनिश्चित

**मियामी, २४ जून**

स्कॉटलंडविरुद्ध होणाऱ्या ब्राझीलच्या तिसऱ्या विश्वचषक गट साखळी सामन्यासाठी नेमार उपलब्ध आहे, परंतु मियामी स्टेडियमवर होणाऱ्या या सामन्यात तो खेळणार की नाही, याबद्दल प्रशिक्षक कार्लो अँसेलोटी यांनी काहीही स्पष्ट केले नाही.

राष्ट्रीय संघापासून जवळपास तीन वर्षे दूर राहिल्यानंतर ३४ वर्षीय आक्रमक खेळाडू नेमारला अँसेलोटी यांनी विश्वचषकासाठी पुन्हा संघात बोलावले होते; मात्र पायाच्या पोटरीच्या दुखापतीमुळे त्याला या स्पर्धेत अद्याप खेळता आलेले नाही.

नेमार उपलब्ध आहे, असे अँसेलोटी यांनी पत्रकारांना सांगितले. त्याने या आठवड्यात सराव केला आहे आणि तो सामन्यासाठी उपलब्ध होऊ शकतो. त्याच्या परतण्यामुळे आम्हाला खूप आनंद झाला आहे, कारण साहजिकच, त्याच्या गुणवत्तेमुळे तो संघाला मदत करू शकतो.

मला त्याला जवळून जाणून घेता आले आहे. त्याने अत्यंत गांभीर्याने सराव केला असून, शक्य तितक्या लवकर दुखापतीतून सावरण्याचा प्रयत्न केला आहे, असेही ते म्हणाले. ◂ (वृत्तसंस्था)

# रोनाल्डिन्होचे वयाच्या ४६ व्या वर्षी इटलीच्या रावेन्नासोबत पुनरागमन

**मियामी, २४ जून**

ब्राझीलचा दिग्गज रोनाल्डिन्हो वयाच्या ४६ व्या वर्षी निवृत्तीतून बाहेर पडून पुन्हा एकदा आपले बूट घालण्याच्या तयारीत आहे. रोनाल्डिन्हो इटालियन सेरी सी क्लब रावेन्ना एफसीसोबत करारबद्ध झाला आहे. त्याच्या पुनरागमनामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, अशी त्याला आशा आहे.

बॅलोन डी'ओरचा माजी विजेता रोनाल्डिन्हो २०१५ मध्ये फ्लुमिनेन्ससाठी शेवटचा क्लब फुटबॉल खेळला होता, त्याने निवृत्तीतून पुनरागमन करून सेरी सी मधील थर्ड-टियर क्लब रावेन्ना एफसी संघात प्रवेश केला आहे. या निर्णयामुळे जगभरात फुटबॉलच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे. एमिलिया-रोमान्या प्रदेशात स्थित रावेन्ना क्लबच्या स्टेडियममध्ये फक्त १२,००० पेक्षा जास्त प्रेक्षक बसू शकतात, तो पारंपरिकरित्या फारसा चर्चेत नव्हता, पण रोनाल्डिन्होच्या आगमनाने हा क्लब जागतिक स्तरावर प्रकाशझोतात आला आहे.



**स्वाक्षरी केलेल्या जर्सीसोबत रोनाल्डिन्हो, शेजारी रावेन्ना एफसीचे अध्यक्ष इग्नाझिओ सिप्रियानी**

पांढऱ्या रंगाचा गणवेश परिधान करून, या ब्राझिलियन खेळाडूने क्लबचे मालक इग्नाझिओ सिप्रियानी यांच्यासोबत आपल्या नवीन रावेन्ना जर्सीचे अनावरण केले. ही जर्सी सर्वप्रथम २००५ मध्ये त्याने जिंकलेल्या बॅलोन डी'ओर ट्रॉफीवर परिधान करण्यात आली होती. ◂ (वृत्तसंस्था)

## ऑलिम्पिकचे यजमान २०२९ मध्ये निश्चित होणार

**नवी दिल्ली, २४ जून**

'अधिक पारदर्शकता आणि खर्चावर नियंत्रण' राखण्याच्या उद्देशाने यजमान निवडीच्या प्रक्रियेत 'धोरणात्मक संवाद' हा टप्पा समाविष्ट करण्यास आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) मंजुरी दिली आहे. यामुळे भारताच्या २०३६ ऑलिम्पिक यजमानपदाच्या महत्त्वाकांक्षी दाव्याचे भवितव्य २०२९ च्या मध्यापर्यंत स्पष्ट होईल.

बुधवारी लुझान येथे झालेल्या जागतिक संघटनेच्या १४६ व्या अधिवेशनात, आयओसीच्या 'फ्युचर होस्ट कमिशन'च्या अध्यक्षा आणि क्रोएशियाच्या माजी राष्ट्राध्यक्ष कोलिंडा ग्रबार-कितारोविच यांनी या नवीन टप्प्याचा प्रस्ताव मांडला, ज्याला उपस्थित सदस्यांनी मतदानाद्वारे मंजुरी दिली. ◂ (वृत्तसंस्था)




# भारत, दक्षिण आफ्रिकेची नजर धावगती सुधारण्यावर

**मॅन्चेस्टर, २४ जून**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत गुरुवारी गट १ मध्ये मॅन्चेस्टर येथे भारत आणि बांगलादेश यांच्यादरम्यान, तर ब्रिस्टल येथे नेदरलॅन्ड व दक्षिण आफ्रिका यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिकेला उपांत्य फेरी गाठण्याची आशा आहे, मात्र त्याकरिता त्यांना आपली निव्वल धावगती सुधारावी लागणार आहे.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय महिला संघाने आतापर्यंत ३ पैकी २ सामने जिंकले व एका सामन्यात पराभव पत्करला असून ते ४ गुणांसह गट एकमध्ये ऑस्ट्रेलियाच्या (८) मागे आधारावर भारत (२.५११) दुसऱ्या स्थानावर, तर दक्षिण आफ्रिका (-०.५४६) तिसऱ्या स्थानावर आहे. त्यामुळे आता गट १ मधील चुरशीच्या लढतीत भारत आणि दक्षिण आफ्रिकेची नजर निव्वळ धावगती सुधारण्यावर असेल.



**बांगलादेशविरुद्ध खेळण्यासाठी हरमनप्रीत कौरचा संघ सज्ज**

दक्षिण आफ्रिकेने २०१० मध्ये नेदरलँड्सविरुद्ध खेळलेला एकमेव टी-२० सामना जिंकला होता, तर बांगलादेशविरुद्ध भारताची जय-पराजयाची आकडेवारी २०-३ अशी आहे.

नेदरलँड्सने अद्याप स्पर्धेत विजयाचे खाते उघडलेले नसल्यामुळे, दक्षिण आफ्रिका या सामन्याकडे आपला 'नेट रन रेट' सुधारण्याची संधी म्हणून पाहेल; कारण उपांत्य फेरीतील प्रवेशासाठी त्यावर अवलंबून राहावे लागू शकते. या दोन संघांमधील एकमेव मागील टी-२० आंतरराष्ट्रीय सामना २०१० मध्ये पॉचेफस्ट्रूम येथे झाला होता, यात दक्षिण आफ्रिकेने ११५ धावांनी विजय मिळवला होता. ◂ (वृत्तसंस्था)

### आजचे सामने

**भारत वि. बांगलादेश**
वेळ : सायंकाळी ७.०० वाजतापासून
स्थळ : मॅन्चेस्टर
००
**नेदरलॅन्ड वि. दक्षिण आफ्रिका**
वेळ : रात्री ११.०० वाजतापासून
स्थळ : ब्रिस्टल
थेट प्रसारण स्टार स्पोर्टसवर

# भारत 'अ', श्रीलंका कसोटी मालिका आजपासून

**गॉल, २४ जून**

भारत 'अ' आणि श्रीलंका यांच्यात गुरुवारी सुरू होणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत, काही नियमित कसोटी खेळाडूंसोबत मैदानात उतरताना वेगवान गोलंदाज आकिब नबीला आपली क्षमता सिद्ध करण्याची संधी असेल.

जम्मू-काश्मीरच्या ऐतिहासिक रणजी करंडक विजयात ६० बळींची उत्कृष्ट कामगिरी करूनही, अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटीसाठी नबीचा विचार न केल्याबद्दल त्याचे चाहते आणि क्रिकेट पंडितांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते.

जर या उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने श्रीलंकेच्या संथ खेळपट्ट्यांवर चांगली कामगिरी केली, तर निवडकर्त्यांसाठी त्याला राष्ट्रीय संघातून बाहेर ठेवणे कठीण जाईल. श्रीलंकेनंतर भारताचा पुढचा मोठा कसोटी दौरा न्यूझीलंडचा आहे व तिथे वेगवान गोलंदाजीस अनुकूल खेळपट्ट्यांवर त्याची गोलंदाजी शैली उपयुक्त ठरू शकते.

अफगाणिस्तानविरुद्ध भारत आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये यशस्वी पदार्पण करणारा गुरनूर ब्रार देखील या संघात आहे.

श्रीलंकेतील या दोन सामन्यांच्या मालिकेत फिरकी गोलंदाजांना मदत मिळण्याची शक्यता आहे, परंतु जर ब्रारने भारत 'अ' संघात प्रभाव पाडला, तर तो वरिष्ठ संघात आपले स्थान कायम राखू शकतो.

गॉल येथे खेळल्या जाणाऱ्या दोन्ही सामन्यांमध्ये नियमित कसोटी खेळाडू ध्रुव जुरेल संघाचे नेतृत्व करेल. ही मालिका साई सुदर्शनसाठी धावा जमवण्याची चांगली संधी असेल, त्यामुळे ऑगस्टमध्ये होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांपूर्वी त्याचा आत्मविश्वास वाढेल. देवदत्त पडिक्कलला अफगाणिस्तानविरुद्धचा सामना खेळण्याची संधी मिळाली नव्हती आणि तो सुदर्शनसोबत तिसऱ्या क्रमांकाच्या स्थानासाठी स्पर्धा करत आहे.



**सर्वांचे लक्ष आकिब नबीवर**

गेल्या वर्षी इंग्लंडमध्ये कसोटी पदार्पण अत्यंत निराशाजनक ठरलेला अंशुल कम्बोजही वेगवान गोलंदाजीच्या फळीचा भाग आहे. ऋतुराज गायकवाड आणि नुकतेच एकदिवसीय पदार्पण केलेला हर्ष दुबेचाही या दौऱ्यावर गेलेल्या संघात समावेश आहे.

श्रीलंकेतील बहु-दिवसीय सामन्यांसाठी भारत 'अ' संघ : ध्रुव जुरेल (कर्णधार आणि यष्टिरक्षक), साई सुदर्शन, आयुष पांडे, देवदत्त पडिक्कल (उपकर्णधार), ऋतुराज गायकवाड, हर्ष दुबे, सारांश जैन, गुरनूर ब्रार, आकिब नबी, यश ठाकूर, अंशुल कंबोज, एन. जगदीसन (यष्टिरक्षक), अमन मोखाडे, शेख रशीद, झिशान अन्सारी. ◂ (वृत्तसंस्था)

# वन-डे क्रमवारीत गिल दुसऱ्या स्थानावर

**दुबई, २४ जून**

बुधवारी जाहीर झालेल्या आयसीसीच्या वन-डे फलंदाजांच्या क्रमवारीत भारताचा शुभमन गिल तीन स्थानांची प्रगती करत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे, तर न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेनरीने कसोटी क्रिकेटमधील अव्वल गोलंदाजांच्या यादीत जसप्रीत बुमराहची बरोबरी केली आहे.

न्यूझीलंडच्या डॅरिल मिचेलपेक्षा गिल आता केवळ २४ रेटिंग गुणांनी मागे आहे. अफगाणिस्तानविरुद्ध नुकत्याच झालेल्या तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत केलेल्या मोठ्या धावसंख्येचा फायदा त्याला या क्रमवारीत झाला आहे.

भारताने ९ गडी राखून जिंकलेल्या मालिकेतील शेवटच्या सामन्यात गिलला फलंदाजीची संधी मिळाली नाही, तरीही त्याने पहिल्या दोन सामन्यांत अनुक्रमे ८४ आणि १५४ धावा केल्या होत्या.

फलंदाजांच्या क्रमवारीत इशान किशनने २१ स्थानांची प्रगती करत ४३ वा क्रमांक गाठला, तसेच तीन भारतीय गोलंदाजांनीही या ताज्या क्रमवारीत मोठी प्रगती केली आहे.

अर्शदीप सिंग १६ स्थानांच्या सुधारणेसह २२ व्या, प्रसिद्ध कृष्णा ३४ स्थानांच्या सुधारणेसह ५८ व्या, तर अष्टपैलू वॉशिंग्टन सुंदर १७ स्थानांच्या प्रगतीसह संयुक्त ७१ व्या क्रमांकावर आहे. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## महेश भाकरे यांचे यश तरुणांसाठी प्रेरणादायी : माजी आमदार साठे

**माढा, दि. २४ जून-**

माढा तालुक्यातील जाधववाडी येथील महेश औदुंबर भाकरे यांची भारत सरकारच्या आयकर विभागात कार्यालयीन अधीक्षक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल माजी आमदार धनाजीराव साठे नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे दादासाहेब साठे यांच्या वतीने महेश भाकरे याचा सत्कार माढा येथील साठे यांच्या मित्र प्रेम निवासस्थानी आयोजित केला होता.. याप्रसंगी माजी आमदार साठे यांनी सांगितले की, महेश भाकरे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत.. अनेक संकटांवर मात करत त्याने हे यश संपादन केले असून.. त्याचे यश इतर तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.. प्रत्येक तरुणाने मोबाईलच्या आभासी जगातून बाहेर येऊन यशाच्या नव्या वाटा शोधत राहावे. महेशच्या आई-वडिलांच्या डोळ्यातील स्वप्नपूर्तीचा अभिमान हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय क्षण असून प्रत्येक तरुणाने आई-वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी महेश भाकरेचा आदर्श घेऊन वाटचाल करावी असेही ज्येष्ठ नेते धनाजीराव साठे यांनी सांगितले. याप्रसंगी दादासाहेब साठे नगराध्यक्षा मीनल साठे, वेदांत साठे, नगरसेवक अजिनाथ राऊत उप अभियंता दळवे उपस्थित होते.



## विवेकानंद केंद्रातर्फे योग दिन साजरा

**सोलापूर, दि. २४ जून-**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी शाखा-सोलापूर यांच्या वतीने दि.२० ते २३ जून दरम्यान सोलापूर शहर व जिल्ह्यात विविध शाळा, महाविद्यालये, उद्योगसंस्था, शासकीय कार्यालये, सामाजिक संस्था तसेच निवासी संकुलांमध्ये योग प्रात्यक्षिके, सूर्यनमस्कार व योगाचे महत्त्व यावरील मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या अभियानांतर्गत २१ ठिकाणी यामध्ये महात्मा विद्या मंदिर, दिलीपराव माने विद्यालय, अल्ट्राटेक सिमेंट, अहिल्याबाई प्रशाला, सोलापूर जिल्हा प्रशासन, सिद्धेश्वर बालक मंदिर, सोरेगाव, झुआरी सिमेंट ई. संस्था सहभागी होत्या. या कार्यक्रमांमध्ये केंद्राच्या ११७ कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. विविध वयोगटांतील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व योगप्रेम ींनी सहभाग नोंदवून योगाभ्यासाचा लाभ घेतला. फक्त २१ जून निमित्त योगा न करता दररोज सातत्य केंद्राचा योग वर्ग मध्ये येण्याचे आवाहन नगरप्रमुख रवि कंटली यांनी केले.

## ज्येष्ठ स्वयंसेवक शांतीलाल जैन यांचे निधन

**सोलापूर, दि.२४ जून-**

सोलापुरातील ज्येष्ठ संघ स्वयंसेवक तथा माजी जिल्हा कार्यवाह शांतीलाल रिखबचंद जैन (वय ७८) यांचे वार्धक्याने भाग्यनगर (हैदराबाद) येथे बुधवारी २४ जून रोजी पहाटे ४ वाजता निधन झाले. पंढरपूर आणि सोलापूर (संयुक्त) जिल्ह्याचे (१९८७/१९९३) जिल्हा कार्यवाह म्हणून त्यांनी दायित्व निभावले होते. तत्पूर्वी (१९८२/८७) सोलापूर शहर कार्यवाह होते. रामजन्मभूमी आंदोलन आणि डॉ.हेडगेवार जन्मशताब्दी काळात संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये संघ कार्य विस्तारात त्यांचे मोठे योगदान होते. मूळचे राजस्थानातील मारवाड प्रांत आहोरचे रहिवासी असलेले शांतीलाल जैन हुबळी येथून सोलापुरात व्यवसायानिमित्त आले. वह्यांचे मोठे उत्पादक म्हणून प्रसिध्द होते. १९८९ मध्ये संघ संस्थापक डॉ.हेडगेवार यांच्या जन्मशताब्दी काळात संघ कार्याचा विस्तार अगदी ग्रामीण भागात वाड्या वस्त्या व गाव पातळीपर्यंत या काळात शांतीलाल जैन यांनी जिल्हा कार्यवाह म्हणून यशस्वीपणे केला. तसेच रामजन्मभूमी आंदोलनाची व्यापकता सर्वस्तरावर नेली. या दोन घटकांबरोबर संघ परिवारातील अन्यान्य संस्था,संघटनांचा पाया अधिक व्यापक प्रमाणात केला. योजकस्य दुर्लभः असे, कार्यकर्त्यांमधील सुप्त गुण हेरून त्यानुसार त्याकडे योग्य ते दायित्व देण्याची हातोटी त्यांच्याकडे होती. त्यामुळे अनेक कुशल संघ स्वयंसेवक कार्यकर्ते या काळात तयार झाले. १९८९ शताब्दी काळातच सोलापुरात डॉ.हेडगेवार रक्तपेढी स्थापन झाली. या रक्तपेढीचे शांतीलाल जैन संस्थापक सदस्य होते. भारतीय जनता पार्टी तेव्हा नव्यानेच स्थापन झाली होती. तेव्हा देखील शांतीलाल जैन यांनी पुढाकार घेत अनेक संघ स्वयंसेवक भाजपाला दिले. लिंगराज वल्याळसह अनेक संघ स्वयंसेवक १९८५मध्ये पहिल्यांदाच नगरसेवक म्हणून निवडून आणले. वल्याळ पुढे महापालिकेत सभापती व १९९२ मध्ये भाजपाचे पहिले आमदार म्हणून निवडून आले. पुढे १९९५ मध्ये दुसर्यांदा पुन्हा आमदार व लोकसभेचे खासदार झाले. विहिंपचे जिल्हा अध्यक्ष सुरेशचंद्र देशमुख गुरुजी यांचे पुत्र सुभाष देशमुख यांना स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत १९९७ मध्ये उभे केले. तेव्हा सोलापूर जिल्ह्यात भाजपाची पाटी कोरी होती. खा.लिंगराज वल्याळ यांच्या मदतीने सुभाष देशमुख यांना भाजपात आणून निवडणूक जिंकवून दिली. स्व. शांतीलाल जैन यांच्या पार्थिवावर भाग्यनगर येथे बुधवारी सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, उद्योजक सुपुत्र महेंद्र, चार विवाहित कन्या, बंधू सूरजमल असा मोठा परिवार आहे.



## शिवानंद हिरेमठ यांचे निधन

**मंद्रूप, दि. २४ जून-**

मंद्रूप येथील वेदमूर्ती शिवानंद ईरय्या हिरेमठ, वय ७३ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुले, सुना नातवंडे व दोन मुली असा परिवार आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष होते. तसेच त्यांनी महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीवर कार्याध्यक्ष म्हणून काम केला आहे. बुधवारी सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले.मंद्रूप शिवयोगेश्वर मठाचे मठाधिपती निरंजन देवरू यांचे ते आजोबा होत.



# खिळखिळी 'लालपरी' पुन्हा पडली बंद

## रणरणत्या उन्हात प्रवाशांचे हाल; प्रशासनाविरोधात तीव्र संताप

### बार्शी तालुक्यातील शेळगावजवळ प्रवाशांनी भरलेली 'एसटी' खोळंबली

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२४ जून-**

'लालपरी'चा प्रवास सुखकर आणि सुरक्षित मानला जात असला, तरी सध्या बार्शी-वैराग-सोलापूर मार्गावरील प्रवाशांसाठी हा प्रवास मात्र अत्यंत म नस्तापाचा ठरत आहे. आज पुन्हा एकदा सोलापूर रोडवरील शेळगावजवळ एसटी बस अचानक नादुरुस्त होऊन बंद पडल्याने प्रवाशांना भरउन्हात रस्त्याच्या कडेला ताटकळत उभे राहावे लागले. जुन्या आणि खिळिखळ्या झालेल्या बसेस मार्गावर सोडल्या जात असल्यामुळे या मार्गावर बस बंद पडणे हे आता नित्याचंच झालं असून, एसटी प्रशासनाच्या या ढिसाळ कारभाराविरोधात प्रवाशांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**सावलीचा आसरा अन् पुढच्या प्रवासाची प्रतीक्षा**

आज दुपारी सोलापूर रस्त्यावरील शेळगाव जवळ प्रवाशांनी भरलेली एसटी बस अचानक रस्त्यातच निकामी झाली. चालक आणि वाहकाने बस सुरू करण्याचा प्रयत्न केला, मात्र बस जागची हलली नाही. कडाक्याच्या उन्हामुळे बसमध्ये बसून राहणे अशक्य झाल्याने, आबालवृद्धांसह महिला आणि बालकांना भरउन्हात रस्त्याकडेला असलेल्या झाडांचा आणि माळरानावरील सावलीचा आसरा घ्यावा लागला. दुसरी गाडी कधी येईल आणि आपला पुढचा प्रवास कधी सुरू होईल, या चिंतेत प्रवाशांना तासनतास एका जागेवर ताटकळत राहावे लागले. यामुळे प्रवाशांना नाहक मानसिक व शारीरिक मनस्ताप सहन करावा लागला.

**खिळिखळ्या गाड्या आणि प्रशासनाची अनास्था**

सोलापूर-बार्शी-वैराग या अत्यंत वर्दळीच्या मार्गावर नेहमीच जुन्या, नादुरुस्त आणि देखभालीअभावी खिळिखळ्या झालेल्या बसेस प्रवाशांच्या सेवेसाठी सोडल्या जातात. या गाड्या प्रवासात कधी आणि कुठे बंद पडतील, याचा नेम उरलेला नाही. 'कधी टायर पंक्चर होणे, तर कधी इंजिनमध्ये बिघाड होणे' अशा तांत्रिक अडचणींमुळे भररस्त्यात प्रवाशांचे हाल होत आहेत. उन्हाळ्याचा कडाका असो वा पावसाळा, प्रवाशांना मात्र नेहमीच अशा त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

**प्रवाशांची संतप्त मागणी: परिवहन मंत्री कधी लक्ष देणार?**

आम्ही नियमित तिकीट काढून प्रवास करतो, मग आम्हाला अशी भंगार दर्जाची सेवा का दिली जाते? भरउन्हात लहान मुले आणि वृद्ध प्रवाशांचे हाल होत आहेत. एसटी महामंडळ आणि परिवहन मंत्र्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या मार्गावर तात्काळ चांगल्या आणि सुसज्ज बसेस उपलब्ध करून द्याव्यात,' अशी संतप्त मागणी अडकून पडलेल्या प्रवाशांनी व स्थानिक नागरिकांनी केली आहे.





## मेहता प्रशालेत दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक प्रशालेत इयत्ता दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या बक्षीस वितरण सम रंभाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेच्या माजी विद्यार्थिनी ऋतुजा रेउरे (वर्ग-२ अधिकारी, अकलूज) तसेच वैष्णवी कोळी (वर्ग-२ अधिकारी, सिंचन विभाग, पुणे) उपस्थित होत्या. यावेळी प्रशालेत प्रथम क्रमांक प्राप्त करणारी विद्यार्थिनी विश्वभारती अंधारे हिच्यासह तिचे पालक श्री. व सौ. अंधारे यांची विशेष उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रशस्तीपत्रे प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या बळावर यश संपादन करावे, विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी व्हावे तसेच शारीरिक व मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष द्यावे, असे मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा मर्यादित वापर करून मैदानी खेळांना प्राधान्य देण्याचा सल्लाही त्यांनी दिला. प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांनी तर सूत्रसंचालन मृणाल आडकर यांनी केले, बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांची यादी आनंद केसकर यांनी वाचली. वर्षा कुलकर्णी यांनी आभार मानले.

## सासूला उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

सुनेचा रॉकेल ओतून पेटून खून करण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून मोहोळ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल असलेली सासू संगीता सलवदे हिच्या अटकपूर्व जामीन अर्जाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मेहरोज पठाण यांच्या समोर होवून न्यायमूर्तींनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला.

फिर्यादीचे लग्न सचिन सलवदे याच्याबरोबर २०१९ साली झाले होते. दि. २१.०४.२०२५ रोजी भांडणांमध्ये सासूने आपल्या अंगावर रॉकेल टाकून खून करण्याचा प्रयत्न केला असे सरकार पक्षाचे म्हणणे होते. सासू संगीता सलवदे चा अटकपूर्व जामीन अर्ज सोलापूर सेशन्स कोर्टाने फेटाळून लावला होता. सदर निकालाविरुद्ध आरोपीने ॲड. जयदीप माने यांचे मार्फत कोल्हापूर उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. सदरचा जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी आरोपीचे वकील ॲड. जयदीप माने यांनी असा युक्तिवाद केला की, फिर्यादी ही अपघाताने भाजलेली होती हे दवाखान्यातील कागदपत्रांवरून स्पष्टपणे दिसून येते. त्यानंतर भाजलेल्या जखमेचा गैरफायदा घेऊन तिने सासूला गुंतवलेले आहे. न्यायमूर्तींनी आरोपी सासू संगीता सलवदे हिचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर केला व तिला पोलीस स्टेशनला हजेरी लावण्याचे आदेश दिले. या प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. जयदीप माने यांनी तर सरकारपक्षातर्फे ॲड. नितीन पाटील यांनी काम पाहिले.

## करमाळ्यात शाहू महाराज जयंती व मोहरमनिमित्त विविध उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २४ जून-**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती आणि मोहरम सणाचे औचित्य साधून करमाळा तालुका मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, शिवजयंती उत्सव समिती व बहुजन विचार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी, २६ जून रोजी करमाळा येथे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष सचिन काळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शुक्रवारी सकाळी ९ वाजता करमाळा येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णांना फळे वाटप करण्यात येणार आहे. तसेच राजर्षी शाहू महाराज आणि शहीद हजरत इमाम हसन हुसेन यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन म्हणून दुपारी २ वाजता रुग्णांना व नागरिकांना अल्पोपहार आणि सरबत वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून मराठा सेवा संघाच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा व पदाधिकाऱ्यांचा सत्कार देखील करण्यात येणार आहे. या सामाजिक उपक्रमाला करमाळ्याच्या कर्तव्यदक्ष तहसीलदार शिल्पा ठोकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) अंजना कृष्णा, पोलीस निरीक्षक रणजीत माने, गटविकास अधिकारी डॉ.अमित कदम, करमाळा नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ. सचिन तपसे, तालुका कृषी अधिकारी देवराव चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.



> हिंदू-मुस्लिम सलोखा कायम राहावा या दृष्टिकोनातून आम्ही हा सामाजिक उपक्रम राबवत आहोत. समाजातील सर्व घटकांनी यात सहभागी व्हावे.
>
> **- सचिन काळे,** तालुकाध्यक्ष, मराठा सेवा संघ, करमाळा

## बार्शीत चाटे शिक्षण समूहातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २४ जून-**

येथील 'चाटे शिक्षण समूह' बार्शी शाखेतर्फे इयत्ता ५ वी ते १० वी मधील विद्यार्थी व पालकांसाठी 'गुणवंत विद्यार्थी सत्कार आणि स्टुडंट-पॅरेंट ओरिएंटेशन प्रोग्राम' नुकताच पार पडला. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने आयोजित विशेष सत्राला पालक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविकात चाटे शिक्षण समूह बार्शी शाखेचे संचालक प्रा. पांडुरंग घाडगे यांनी बार्शी शाखेच्या यशस्वी शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि बदलत्या शैक्षणिक प्रवाहात दर्जेदार शिक्षण देण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे सांगितले. मुख्य मार्गदर्शक म्हणून चाटे शिक्षण समूह कोल्हापूर विभागाचे विभागीय संचालक प्रा. डॉ. भारत खराटे यांनी पालक आणि विद्यार्थ्यांना तंत्रशुद्ध मार्गदर्शन केले. पालकांनी मुलांवर गुणांचे अवाजवी दडपण न आणता त्यांच्याशी सुसंवाद साधला पाहिजे. घरात अभ्यासासाठी पोषक आणि तणावमुक्त वातावरण निर्माण करावे, असे सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. मधुकर पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रातील महत्त्वाच्या बदलांवर प्रकाश टाकला. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे मातृभाषेतील शिक्षणाचे महत्त्व आणि बहुविद्याशाखीय दृष्टिकोन कसा वाढणार आहे, हे सोप्या भाषेत समजावून सांगितले.

याप्रसंगी विविध परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन पूजा कोरफळकर यांनी केले, तर आभार बालाजी माने यांनी मानले.



**प्रमुख वक्त्यांचे मार्गदर्शन**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि बदलत्या शैक्षणिक प्रवाहात दर्जेदार शिक्षण देण्यासाठी चाटे शिक्षण समूह कटिबध्द
**- प्रा. पांडुरंग घाडगे**

विद्यार्थ्यांनी केवळ पाठांतर न करता संवाद कौशल्य, निर्णयक्षमता आणि मानसिक सक्षमता वाढवावी
**- प्रा. भारत खराटे**

आधुनिक काळात शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या क्षमतांना दिशा देणारा 'मार्गदर्शक' झाला आहे.
**- प्रा. मधुकर पाटील**

# जून महिना संपत आला; सोलापूरकरांना प्रतीक्षा पावसाची

### शेतकऱ्यांमध्ये वाढली चिंता



**तभा वृत्तसेवा । राजाराम मस्के**
**सोलापूर, दि. २४ जून -**

मागील वर्षी जुन महिन्यात अपेक्षापेक्षा जास्त पाऊस पडला. यंदा मात्र जून महिना संपत आला असतानाही सोलापूर जिल्ह्यात समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत आहेत. काय करावं, काय करू नये या विवेंचनेत शेतकरी आहे. अपुऱ्या पावसाने जिरायती शेतीचे कामे करता येईना. ज्यांची बागायती आहें त्यांना पिकास पाणी पुरेना झाल्याने चिंता वाढली आहे. शेतातील उभी पिके पाण्याअभावी करपु लागलीत. मागील वर्षी अति पावसाने शेतकरी बेजार झाला. उभी पिके पाण्यात वाहून गेली आणि या वर्षी अद्याप पाऊसच पडला नसलेला शेतकरी, शेतमजूर, हवालदिल झालेत. पावसाची चातकासारखी वाट बघू लागलेत. अशीच परस्थिती राहिली तर येणाऱ्या काळात परस्थिती गंभीर होऊ शकते याची भीती शेताकऱ्या सह सर्वसामान्यांना सतावू लागल्या आहेत. दरम्यान, हवामान विभागाने येत्या काही दिवसांत महाराष्ट्रात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे जूनअखेर किंवा जुलैच्या प्रारंभी समाधानकारक पाऊस होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र तोपर्यंत शेतकऱ्यांनी संयम बाळगून कृषी विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नियोजन करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**देशभरात सुमारे ३५ टक्के पावसाची तूट**

यंदा नैऋत्य मान्सून विलंब लागल्यामुळे महाराष्ट्रासह मध्य भारतात पावसाची मोठी तूट निर्माण झाली आहे. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार जूनच्या पहिल्या पंधरवड्यात देशभरात सुमारे ३५ टक्के पावसाची तूट नोंदविण्यात आली असून मध्य महाराष्ट्रात ही तूट ६० टक्क्यांहून अधिक असल्याचे दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यात साधारणपणे जून महिन्यात सरासरी १२० मि.मी. पाऊस अपेक्षित असतो. यंदा मात्र अद्याप अनेक भागांत अपेक्षित पाऊस झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या असून शेतकरी पावसासाठी आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

**पुरेसा ओलावा निर्माण होईपर्यंत प्रतीक्षा करा**

कृषी तज्ज्ञांच्या मते, पाऊस पडेपर्यंत शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी न करता पुरेसा ओलावा निर्माण होईपर्यंत प्रतीक्षा करावी. शेतातील तण नियंत्रण, बांधबंदिस्ती, नालाबांधणी, सरी-वरंबे तयार करणे, तसेच पावसाचे पाणी अडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे ही मशागतीची कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. यामुळे पाऊस पडल्यानंतर जमिनीत ओलावा अधिक काळ टिकून राहण्यास मदत होईल.जर पाऊस उशिरा आला किंवा कमी प्रमाणात झाला तर कमी कालावधीत येणारी व दुष्काळ सहनशील पिके निवडण्याचा सल्ला कृषी विभागाकडून दिला जात आहे. बाजरी, मूग, उडीद, तूर यांसारख्या पिकांच्या योग्य वाणांची निवड करावी. पेरणी करताना बियाण्यांची उगवणक्षमता तपासूनच वापर करावा. तसेच एकदम संपूर्ण क्षेत्रावर पेरणी करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने पेरणी केल्यास धोका कमी होऊ शकतो.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# बांधकाम विभागाने 'अलर्ट' मोडवर राहावे

## आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद बांधकाम विभागातील सर्व कनिष्ठ अभियंते व उपअभियंते यांनी कोणतीही रजा न घेता सतर्क राहून कामांचे नियमित निरीक्षण करावे, तसेच आवश्यक ठिकाणी तातडीने कार्यवाही करून वारी व्यवस्थापन सुरळीत पार पाडावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार यांनी दिले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य विकास बुळा, नेताजी खंडागळे, प्रदीप खांडेकर, सचिन जाधव, अश्विनी चिवटे आणि अतुल पवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हा परिषद सोलापूर येथे झालेल्या बांधकाम समितीच्या मासिक सर्वसाधारण सभेत विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. सभेत मागील बैठकीतील ठरावांच्या पूर्ततेची नोंद घेण्यात आली. शासनाकडून प्राप्त महत्त्वाच्या पत्रे, परिपत्रके आणि शासन निर्णयांचे वाचन करण्यात आले. यावेळी बांधकाम विभाग क्रमांक १ व २ मार्फत सुरू असलेल्या विविध विकासकामांवरील खर्च, मंजूर निविदा, रस्ते विकासकामे आणि तालुकानिहाय अंगणवाडी इमारत बांधकामांची सद्यस्थिती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विविध कामांची गती वाढवून प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

सभेत छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाच्या सुशोभीकरणासंदर्भात महत्त्वाचा ठराव मंजूर करण्यात आला. तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेत ऊर्जा बचत व पर्यावरणपूरक विकासाला चालना देण्याबाबत चर्चा झाली. मंजूर विकासकामे पूर्ण झाल्यानंतर त्या परिसरात वृक्षारोपण करण्याच्या मागील सूचनांच्या अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला.

वृक्षसंवर्धन आणि हरित विकासासाठी अधिक प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. जिल्हा परिषदेचे स्वउत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेकडील मोक्याच्या जागांची पाहणी करून त्यांचा विकास आणि उत्पन्नवाढीसाठी उपयोग करण्याबाबत माहिती संकलनाच्या कामाचाही आढावा घेण्यात आला.

**बैठकीला विशेष महत्त्व**

जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन हे बैठकीस उपस्थित राहून आवश्यक सूचना देणार आहेत. आषाढीवारी काळात भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये. प्रशासनाची यंत्रणा अधिक प्रभावीपणे कार्यरत राहावी, यासाठी या बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**अनुभवी अधिकाऱ्यांची ३० जूनला बैठक**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेकडून वारी व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी मंगळवार, दि. ३० जून रोजी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. वारी व्यवस्थापनाचा अनुभव असलेल्या वरिष्ठ अधिकारी व संबंधित विभागप्रमुख या बैठकीस उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत वारी मार्गावरील सुविधा, रस्त्यांची स्थिती, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच विविध विभागांमधील समन्वयाचा आढावा घेण्यात येणार आहे.

**इंद्रजीत पवार,**
उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम विभाग

## महत्वाचे...



### राहुल नार्वेकरांना पाठवली बाराखडी अन् व्याकरणाची पुस्तके

**सोलापूर, दि. २४ जून-**

मराठी भाषेचा सातत्याने अवमान करणाऱ्या सरकारचा तसेच विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शोकप्रस्ताव मांडताना केलेल्या मराठी उच्चारांच्या चुकीच्या वापराचा निषेध करत महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोलापूरच्या वतीने बुधवार २४ जून रोजी अनोखे आंदोलन केले. त्यांनी राहुल नार्वेकर यांच्या पत्त्यावर मराठी बाराखडी, मराठी व्याकरणाची पुस्तके आणि काही नामवंत मराठी साहित्यिकांची पुस्तके पाठवून निषेध नोंदविला. यावेळी मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मराठी ही केवळ भाषा नसून महाराष्ट्राची ओळख, स्वाभिमान आणि अस्मिता असल्याचे सांगितले. मराठी भाषेचा अवमान कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, शहरअध्यक्ष जैनोद्दीन शेख, अमर कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष अभिषेक रंपुरे, जितेंद्र टेंभुर्णीकर, सुभाष माने, प्रकाश कोळी, विश्वास गजभार, अभिषेक इरकल, समर्थ माळगे, गोरक्ष उपरे, मयूर सोलनकर, विकास उपरे आदी उपस्थित होते.



### कुचन प्रशालेत बेत व बोगम कुटुंबाकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि. २४ जून-**

कुचन प्रशाला,कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण येथे वासुदेव बेत व सरस्वती बेत यांच्या स्मरणार्थ कुटुंबीयांकडून शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. प्राचार्य युवराज मेटे यांनी प्रास्ताविक केले. पर्यवेक्षिका प्रणिता सामल यांनी परिचय करून दिला. अध्यक्षस्थानी पद्मशाली शिक्षण संस्थेचे विश्वस्त नागनाथ गंजी होते. विश्वस्त अंबादास गज्जम, नागन्नाथ श्रीरामदास यांची प्रमुख उपस्थिती होती. देणगीदार पराग बेत व डॉ.स्नेहल बेत यांच्यामार्फत विद्यार्थ्यांना वह्या व कंपास वाटप केले. सदानंद बोगम व शोभना बोगम यांच्या वतीने ८० विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप केले. याप्रसंगी पराग बेत व सदानंद बोगम यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधला. उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु, मल्लिकार्जुन जोकारे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजशेखर स्वामी यांनी केले. अश्विनी म्हैसूर यांनी आभार मानले.



### सिध्दाराम कोटनूरची आयआयटी मद्रास एमटेक रोबोटिक्समध्ये निवड

**सोलापूर, दि. २४ जून-**

नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या यांत्रिकी अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थी सिद्धाराम जवाहर कोटनूर याची भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) मद्रास येथे पदव्युत्तर एम.टेक. (रोबोटिक्स) या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. सिद्धारामने गेट परीक्षेत ६५२ गुण मिळवून अखिल भारतीय क्रमवारीत ६२५वा क्रमांक प्राप्त केला. करिअर कौन्सिलिंग सेलचे समन्वयक प्रा. दीपक भोगे यांचे मार्गदर्शन लाभले. गेट-२०२६ परीक्षेत ऑर्किड महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी यश संपादन करत पात्रता मिळवली. सिद्धारामचे यांत्रिकी अभियांत्रिकी विभागप्रमुख डॉ. एस. एस. काळे, उपप्राचार्य (करिअर डेव्हलपमेंट) डॉ. श्रीनिवास एस. मेतन, उपप्राचार्य (ॲकॅडमिक ॲण्ड ॲडमिनस्ट्रेशन) डॉ. व्ही. के. पत्की, प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे तसेच विश्वस्तानी अभिनंदन केले.

### तळेहिप्परगा येथे विवाहित तरुणाची गळफासाने आत्महत्या

**सोलापूर, दि. २४ जून-**

अज्ञात कारणावरून एका ३० वर्षीय तरुणाने राहत्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील तळेहिप्परगा येथे बुधवारी सकाळी ११.३० वाजेच्या सुमारास उघडकीस आली. राजू शिवराम पवार (वय ३० रा.तळे हिप्परगा) असे गळफास घेतलेल्या मयत तरुणाचे नाव आहे. तो वाहन चालक म्हणून काम करायचा. बुधवारी सकाळी त्याचा मृतदेह घरातील छताच्या लोखंडी अँगलला गळफास घेतलेल्या अवस्थेत घरच्यांना आढळून आला. त्याला फासातून सोडवून भाऊ किरण याने येथील शासकीय रुग्णालयात दुपारी दीड वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले व भाऊ असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

# मोहरम उत्सवात 'नवसाचे वाघ' ठरताहेत सामाजिक सलोख्याचे प्रतीक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**



शहरातील मोहरम उत्सव हा केवळ एक धार्मिक सोहळा नसून सामाजिक सलोखा, श्रद्धा आणि परंपरेचे अनोखे प्रतीक मानला जातो. यंदाही मोहरमच्या दिवसांत शहरात दिसणारे 'नवसाचे वाघ' हे या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरत असून, या माध्यमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे जिवंत दर्शन घडत आहे.

पूर्व मंगळवार पेठेतील मीठ गल्ली परिसरातील 'बडे मौलाली पंजा सवारी' येथे मोहरमच्या सातव्या आणि आठव्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे. येथे सर्वधर्मीय भाविकांना समान प्रवेश दिला जात असल्याने धार्मिक सौहार्दाचे एक सुंदर चित्र पाहायला मिळत आहे.

अनेक हिंदू आणि मुस्लिम कुटुंबे आपल्या लहान मुलांना वाघाच्या वेशभूषेत सजवून बडे मौलाली पिरांच्या दर्शनासाठी आणत आहेत. श्रद्धेनुसार, अपत्यप्राप्तीसाठी काही दांपत्य बडे मौलाली पंज्यासमोर नवस बोलतात. हा नवस पूर्ण झाल्यानंतर जन्मलेल्या मुलाला वाघाच्या रूपात सजवून दर्शनाला आणले जाते व त्या बालकाच्या हस्ते नैवेद्य अर्पण करून पिरांचे आभार मानले जातात. मोहरमच्या सातव्या व आठव्या दिवशी 'समाचार चौक' परिसरात मुलांना वाघ सजविणारे रंगारी उपलब्ध असतात. आपल्या मुलांना वाघ बनविण्यासाठी पालकांची सकाळपासूनच येथे मोठी गर्दी दिसून येत आहे. रंगारींकडून वाघाचे रंगरूप पूर्ण झाल्यानंतर, अनेक कुटुंबे हलगीच्या गजरात आणि पारंपरिक वाद्यांच्या निनादात आपल्या 'नवसाच्या वाघाची' मिरवणूक काढत आहेत. यामुळे संपूर्ण परिसरात कमालीचे उत्सवी वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे ही परंपरा केवळ एका पिढीपुरती मर्यादित राहिलेली नाही. पणजोबा, आजोबा, वडील आणि आता मुलगा अशा पिढ्यानपिढ्या आमच्या कुटुंबात नवसाचा वाघ बणण्याची परंपरा सुरू असल्याचे अनेक दांपत्यांनी अभिमानाने सांगितले.



# ए. जी. पाटील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांची 'स्मार्ट व्हीलचेअर'ची निर्मिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

ए. जी. पाटील इन्स्टिट्यूटमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकीच्या अमृता पाटील, प्रेरणा जगताप आणि पूनम दुम्मनवार यांनी प्रा. एस. एस. मेटगार यांच्या मार्गदर्शनाखाली "स्मार्ट व्हीलचेअर युजिंग जॉयस्टिक " हा समाजोपयोगी व नाविन्यपूर्ण प्रकल्प विकसित केला आहे. या स्मार्ट व्हीलचेअरमध्ये जॉयस्टिक कंट्रोलर, मायक्रो-कंट्रोलर आधारित नियंत्रण प्रणाली, मोटर ड्रायव्हर सर्किट, डीसी मोटर्स आणि रिचार्जेबल बॅटरीचा वापर करण्यात आला आहे. जॉयस्टिकच्या साहाय्याने व्हीलचेअर पुढे, मागे, डावीकडे व उजवीकडे सहज नियंत्रित करता येते. ही प्रणाली शारीरिकदृष्ट्या दिव्यांग, वृद्ध व्यक्ती किंवा चालण्यात अडचण असलेल्या व्यक्तींना स्वावलंबीपणे हालचाल करण्यास मदत करते. या प्रकल्पाचे मुख्य फायदे म्हणजे दिव्यांग व्यक्तींची स्वावलंबन क्षमता वाढवणे, सुरक्षित हालचाल सुनिश्चित करणे आणि त्यांचे दैनंदिन जीवन अधिक सुलभ बनवणे हे आहेत. या प्रकल्पासाठी प्रकल्प समन्वयक प्रा. आर. बी. बिराजदार यांचे मार्गदर्शन तसेच विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर यांचे सहकार्य लाभले असून, संस्थेचे अध्यक्ष एस. ए. पाटील, सचिव एस. एस. पाटील प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# सोलापूर विद्यापीठात अभियांत्रिकी विभागातील ८ नवीन पदवी अभ्यासक्रमास मान्यता

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सुरुवात होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून**




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून ८ नवीन अभियांत्रिकी विभागातील पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव विद्यापीठाने सादर केला होता. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १८ जूनच्या आदेशान्वये ही मान्यता दिली आहे. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद नवी दिल्ली यांच्या मान्यतेच्या अधीन राहून ही मंजुरी देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या संकुलात हे अभ्यासक्रम स्वयं-अर्थसहाय्यीत/ कायम विनाअनुदान तत्त्वावर चालवले जाणार आहेत. या निर्णयामुळे तंत्रशिक्षण क्षेत्रात सोलापूर विभागातील विद्यार्थ्यांसाठी नवीन संधी उपलब्ध झाल्या आहेत. हे सर्व अभ्यासक्रम विद्यापीठ स्तरावरील नियमानुसार आणि तंत्र शिक्षण परिषदेच्या निकषांनुसार राबविले जातील. अभ्यासक्रमासाठी आवश्यक शिक्षक, पायाभूत सुविधा आणि प्रयोगशाळांची जबाबदारी विद्यापीठाची असेल. तसेच, प्रवेश प्रक्रिया शासनाच्या नियमांनुसार पार पडेल. सदर अभ्यासक्रम सुरू करण्याकरिता आवश्यक जागा, बांधकाम, शिक्षकेतर कर्मचारी, प्रयोगशाळा, यंत्रसामुग्री व साधनसामुग्री व ग्रंथालय याबाबींवर होणारा आवर्ती व अनावर्ती संपूर्ण खर्च विद्यापीठाच्या स्तरावर भागविणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**मंजूर झालेले नवीन अभ्यासक्रम आणि प्रवेश क्षमता**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग, सायबर सिक्युरिटी आणि डेटा सायन्सेस (सर्व ६०), बायोटेक्नॉलॉजी, केमिकल टेक्नॉलॉजी, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी आणि फूड टेक्नॉलॉजी (सर्व २०)

# पूर नियंत्रण, स्वच्छता आणि अतिक्रमण निर्मूलनावर विशेष भर

## महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील विकासकामांची आयुक्तांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जून-**

महात्मा गांधी प्राणी संग्रहालयातील विविध विकासकामांचा महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी मंगळवारी प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला. विकास निधी तसेच एनटीपीसीच्या सीएसआर निधीतून सुरू असलेल्या कामांची गुणवत्ता, प्रगती आणि पूर्ततेचा कालावधी याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यावेळी पूर नियंत्रण, स्वच्छता आणि अतिक्रमण निर्मूलनावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी अतिक्रमण नियंत्रण अधिकारी नीलकंठ मठपती, विभागीय अधिकारी जावेद पानगल, डॉ. सतीश चौगुले, गोकुळ चिंतारे, अविनाश वाघमारे, चेतन प्रचंडे, स्वप्नील सोलणंकर, अभियंते व संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान आयुक्तांनी मगरींसाठी उभारलेल्या नव्या पिंजऱ्याची तसेच वाघ आणि बिबट्यांसाठी उभारेत असलेल्या अत्याधुनिक पिंजऱ्यांची पाहणी केली. एनटीपीसीच्या सीएसआर निधीतून प्राण्यांसाठी उभारलेल्या विशेष निवाऱ्यांचाही आढावा घेतला.

संग्रहालयाशेजारील मैदानात वाढलेली वेडी बाभळीची झाडे मुळासकट काढून परिसर स्वच्छ करण्याचे आदेश दिले. प्राणी संग्रहालय परिसरातील स्वच्छतेबाबत हयगय खपवून घेणार नसल्याचा इशाराही दिला. पाहणीवेळी परिसरातील एका विहिरीवर रेल्वे प्रशासनाकडून दावा करण्यात येत असल्याची बाब समोर आली. याबाबत संबंधित जागेच्या मालकी हक्काची माहिती रेल्वे प्रशासनाकडून अधिकृत पत्राद्वारे मागविण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. पूर नियंत्रण, स्वच्छता आणि अतिक्रमण निर्मूलनाला प्राधान्य दिले जाईल, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.



**सर्व अतिक्रमणे तात्काळ हटविण्याचे आदेश**

आधार हॉस्पिटल ते मंदिर परिसरादरम्यानच्या रस्त्यालगत आणि महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील सर्व अतिक्रमणे तात्काळ हटविण्याचे आदेश देण्यात आले. अतिक्रमणधारकांना नोटिसा बजावून आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्याच्या सूचनाही महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिल्या.

**नाल्याचे खोलीकरण, रुंदीकरण युद्धपातळीवर करा**

प्राणी संग्रहालय परिसरात यापूर्वी पाणी साचल्याच्या घटनांची दखल घेत आयुक्तांनी संग्रहालयालगतच्या नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरण युद्धपातळीवर करण्याचे आदेश दिले. पावसाळ्यात पाण्याचा निचरा सुरळीत राहून पूरस्थिती निर्माण होणार नाही, यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या.



# कुंभेज ग्रामस्थांचे स्मशानभूमीसाठी आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.२४ जून**

कुंभेज (ता.करमाळा) या गावासाठी स्मशानभूमीसाठी जागा मिळण्यासाठी सुहास साळुंखे यांनी ग्रामस्थांसह तहसील कार्यालयास निवेदन देत उपोषण सुरू केले आहे.

गावालगत असलेल्या वन विभागाच्या गट नंबर २३ मधील २१ गुंठे जागेची स्मशानभूमीसाठी उपलब्धता करून द्यावी, अशी मागणी आहे. उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी करमाळा तहसीलसमोर अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी भेटी दिल्या. यामध्ये जिल्हा परिषद सदस्य गणेश चिवटे, भीम आर्मीचे उत्तरेश्वर कांबळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष वारे, रिपब्लिकन सेनेचे देवा लोंढे इत्यादी उपस्थित होते

सर्व ग्रामस्थांच्या वतीने करमाळा तहसील कार्यालयास निवेदन देण्यात आले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर | गुरुवार, २५ जून २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## महत्वाचे...

### आई प्रतिष्ठान गवळी संस्थेतर्फे गुणवंतांचा रविवारी सत्कार

**सोलापूर, दि. २४ जून-**
आई प्रतिष्ठान गवळी समाज सामाजिक संस्था सोलापूरच्या वतीने गवळी समाजातील इयत्ता १०वी व १२वी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच करिअर मार्गदर्शन कार्यक्रम रविवार २८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता मीठ गल्ली येथील शिवानुभव मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रशांत झिपरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. कार्यक्रमात पुणे येथील सॉफ्टवेअर इंजिनिअर कॉर्पोरेट ट्रेनर प्रा. संभाजी बारसे ते विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, करिअरच्या विविध संधी आणि बदलत्या रोजगार क्षेत्रातील आव्हानांबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या पत्रकार परिषदेला संदीप कालगते, प्रसाद भास्कर, सागर अंजीखाने, योगेश झिपरे, उमेश बडवणे प्रवीण पंगुडवाले आदी उपस्थित होते.

### दुचाकी धडकेतील जखमी पादचाऱ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि. २४ जून-**
दुचाकीच्या धडकेत जखमी झालेल्या मोहोळ येथे राहणाऱ्या एका पादचाऱ्याचा उपचारदरम्यान मृत्यू झाला.पोपट नागनाथ बाबर ( वय ५० वर्ष, रा. श्रीकृष्ण नगर मोहोळ ) असे त्या मयत व्यक्तीचे नाव आहे. ते १२ जून रोजी रात्री लातूर येथील हरणगुळ रेल्वे स्टेशन जवळून चालत जाताना एका दुचाकीने त्यांना धडक दिली होती. यात गंभीर जखमी झाल्याने त्यांना लातूर व सोलापूरच्या दोन खाजगी दवाखान्यात उपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाऊ दयानंद याने मंगळवारी रात्री बेशुद्ध अवस्थेत दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### घरगुती वादात विवाहितेने पिले गोचीड मारण्याचे औषध

**सोलापूर, दि. २४ जून-**
घरगुती वादात एका विवाहितेने गोचीड मारण्याचे औषध पिल्याची घटना मोहोळ येथे मंगळवारी संध्याकाळी घडली. सुवर्णा अतुल चव्हाण (वय ३० वर्ष, रा मोहोळ )असे त्या विवाहितेचे नाव असून घरगुती वाद झाल्याने त्यांनी मंगळवारी संध्याकाळी घरामध्ये गोचीड मारण्याचे औषध पिले. याचा त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात पती अतुल यांनी रात्री दाखल केले.

### तू दुसरे लग्न कसा केलेस असे म्हणून तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. २४ जून-**
तू दुसरे लग्न कसा केलास असे म्हणून एका तरुणाला लाकूड , दगड व लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आल्याची घटना अकलूज येथे घडली. जुबेर हिदायतुल्ला काझी (वय ३६ वर्ष, पंचवटी अकलूज) असे त्या जखमी तरुणाचे नाव असून तो घराजवळ असताना तू दुसरे लग्न कसा केलास असे म्हणून आस्मा काजी, सलमा काझी व इतर सहा जणांनी मिळून त्याला मारहाण केली. यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्याला अकलूजच्या आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात भाऊ जावेद याने आज बुधवारी सकाळी दाखल केले.

### जावयाला काठी व लाथाबुक्क्याने मारहाण

**सोलापूर, दि. २४ जून-**
सासरी आलेल्या एका जावयाला मेहुण्याने काठी व लाथाबुक्याने मारहाण केल्याची घटना तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे मंगळवारी रात्री दहा वाजता घडली. रामहरी दत्तू पवार (वय ४२ वर्ष, रा. करदळी, दक्षिण सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या जावयाचे नाव असून ते मंगळवारी रात्री तामलवाडी येथे सासरी गेले असता त्यांना म ेव्हणा गणेश कदम याने तु इथे का आलास असे म्हणून काठी व लाथाबुक्याने मारहाण केली. त्यामुळे त्यांना तामलवाडी येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात बुधवारी दुपारी ते स्वतः दाखल झाले .

### मागील भांडणावरून तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. २४ जून-**
मागील भांडणाच्या कारणावरून एका तरुणास तिघा जणांनी मिळून बर्फ तोडण्याचा टोचा व लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना वळसंगकर हॉस्पिटल समोर मंगळवारी सायंकाळी घडली. श्रीकांत नामदेव जाधव ( वय ३२ वर्ष , राहणार पटवर्धन चाळ, वांगी रोड सोलापूर) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून मंगळवारी सायंकाळी तो वळसंगकर हॉस्पिटल समोरील रिक्षा स्टॉप वर असताना त्याला मागील भांडणाच्या कारणावरून शाहन कुरेशी व इतर दोन जणांनी मिळून मारहाण केली . यात डोक्याला जखम झाल्याने तो उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी स्वतः दाखल झाला.

# म्हेत्रे-पाटलांची एकाच गाडीतून एंट्री; अक्कलकोटच्या राजकारणात नवा संदेश?

## दोघे एकत्र दिसल्याने राजकीय चर्चांना उधाण

## झेडपीतून दोन्ही नेते पुन्हा एकाच गाडीतून माघारी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**
अक्कलकोट तालुक्यातील दोन वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे प्रमुख नेते बुधवारी जिल्हा परिषदेत एकाच वाहनातून दाखल झाल्याने राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. शिवसेनेचे नेते तथा माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे आणि काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांनी एकत्रितपणे जिल्हा परिषदेत हजेरी लावल्याने उपस्थितांच्या भुवया उंचावल्या.

सध्या अक्कलकोटच्या राजकारणात सिद्धाराम म्हेत्रे हे शिवसेनेच्या माध्यमातून सक्रिय आहेत, तर मल्लिकार्जुन पाटील काँग्रेसची धुरा सांभाळत आहेत. राजकीय वाटा वेगळ्या असल्या तरी दोन्ही नेते एकाच गाडीतून जिल्हा परिषदेत दाखल झाल्याने विविध तर्कवितर्कांना सुरुवात झाली.

जिल्हा परिषदेत आल्यानंतर दोन्ही नेत्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या दालनात भेट दिली. काही काळ तेथे चर्चा सुरू होती. या चर्चेचा नेम का विषय काय होता, याबाबत अधिकृत माहिती समोर आली नसली तरी त्यांच्या भेटीने अनेकांच्या उत्सुकता वाढवल्या. चर्चेदरम्यान सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील तसेच शिक्षणाधिकारी कादर शेख हे देखील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात दाखल झाल्याचे पाहायला मिळाले. विशेष म्हणजे चर्चा संपल्यानंतर दोन्ही नेते पुन्हा एकाच वाहनातून रवाना झाले. वाहनाचे स्टेअरिंग काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील यांच्याकडे होते. त्यामुळे या भेटीला केवळ शिष्टाचार भेट म्हणायचे की त्यामागे काही राजकीय समीकरणांची नांदी आहे,

### 'सहज चहा पिण्यासाठी आलो'

दरम्यान, प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी याबाबत माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांना विचारणा केली असता त्यांनी 'सहज आलो... चहा पिण्यासाठी आलो होतो,' असे मिश्कील उत्तर दिले. मात्र, अक्कलकोटच्या राजकीय पटावर प्रतिस्पर्धी पक्षांतील दोन नेत्यांचा हा एकत्रित प्रवास आणि जिल्हा परिषदेत झालेली भेट यामुळे तालुक्यात नव्या राजकीय चर्चांना चांगलेच खतपाणी मिळाले आहे.

### 'चहाची भेट' की नव्या समीकरणांची चाहूल?

सिद्धाराम म्हेत्रे आणि मल्लिकार्जुन पाटील यांच्या एकत्रित भेटीमागे केवळ प्रशासकीय काम काज होते की आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काही नवीन राजकीय समीकरणांची जुळवाजुळव सुरू आहे, याची उत्सुकता आता अक्कलकोटच्या राजकीय वतुर्ळाला लागून राहिली आहे.



# स्मार्ट मीटरची सक्ती कराल तर... मनसे स्टाईलने उत्तर देऊ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**
शहरामध्ये स्मार्ट मीटर जबरदस्तीने सोलापूर शहरवासीयांना लादण्याचे व सक्तीने बसवण्याचे जे प्रकार चालू आहे ते तात्काळ थांबविण्यात यावे स्मार्ट मीटरचे युरिनट हे जनतेला परवडणारे नसून या युनिटची माहिती ग्राहकाला न मिळता डायरेक्ट वरून बिल आकारण्यात येत आहे व वरून बीज कनेक्शन खंडित करण्यात येत आहे.

शहरांमध्ये सर्वत्र या निर्णयाविरोधात ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महावितरणचे अधिक्षक अभियंता सुनील माने यांना स्मार्ट मीटर बसवण्याच्या सक्तीस महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुर्णपणे विरोध करत स्मार्ट मीटरची सक्ती तात्काळ थांबवावी, अशी म ागणी निवेदनाद्वारे केली आहे. सक्ती कराल तर मनसे स्टाईलने चोप दिला जाईल असा इशारा शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख यांनी दिला आहे.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, संतोष कुमार घोडके, अमर कुलकर्णी, प्रकाश कोळी, अभिषेक रंपुरे, सुभाष माने, निलेश भंडारे, जितेंद्र टेंभुर्णीकर आदी उपस्थिती होते .

# समायोजित शिक्षकांना रुजू करून घ्या, अन्यथा कारवाईला सामोरे जा

## माध्यमिक शिक्षण विभागाचा थेट कारवाईचा इशारा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जून-**
सोलापूर जिल्ह्यातील अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेला काही शाळांकडून अद्यापही प्रतिसाद मिळत नसल्याची माहिती समोर आली आहे. शिक्षण विभागाने समायोजन आदेश दिल्यानंतरही काही संस्था आणि शाळा शिक्षकांना रुजू करून घेत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर माध्यमिक शिक्षण विभागाने संबंधित शाळांना नोटिसा बजावत वेतन रोखण्यासंबंधी कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यात शिक्षकांच्या उपलब्धतेत असमतोल निर्माण झाल्यानंतर अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यात आले होते. या प्रक्रियेत अनेक शिक्षकांना नवीन शाळांमध्ये नियुक्ती देण्यात आली. मात्र काही शाळांनी विविध कारणे पुढे करत या शिक्षकांना रुजू करून घेण्यास टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे समायोजनाचा मूळ उद्देशच धोक्यात आला आहे. शिक्षण विभागाच्या माहितीनुसार, समायोजित शिक्षकांना स्वीकारण्यास नकार देणाऱ्या शाळांना कारणे दाखवा नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. आदेशाचे पालन न करणाऱ्या संस्थांवर प्रशासकीय कारवाईसह वेतन मंजुरी, अनुदान प्रक्रिया आणि इतर शासकीय बाबींमध्ये कठोर भूमिका घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, जिल्ह्यात शेकडो शिक्षकांची पदे रिक्त असताना समायोजित शिक्षकांना प्रवेश नाकारण्यामागील कारणांबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बाजूला शिक्षकांची कमतरता भासत असताना दुसऱ्या बाजूला उपलब्ध शिक्षकांना रुजू करून घेतले जात नसल्याने शैक्षणिक व्यवस्थेतील विसंगती पुन्हा एकदा समोर आली आहे.

समायोजन प्रक्रिया प्रभावीपणे राबविली गेल्यास शिक्षकांचे योग्य नियोजन होऊन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळू शकते. त्यामुळे शासनाचे आदेश आणि विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन संबंधित शाळांनी तातडीने समायोजित शिक्षकांना रुजू करून घ्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कंत्राटदारांच्या थकीत निधीला अखेर गती?

## सामाजिक न्यायमंत्र्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन केले स्थगित

## दोन दिवसांत निधी वाटपाचे आदेश अपेक्षित



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**
जिल्हा समाजकल्याण विभागामार्फत विविध विकासकामे पूर्ण केलेल्या कंत्राटदारांच्या थकीत निधीच्या प्रश्नाला अखेर गती मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी थकीत निधी वाटपाबाबत दोन दिवसांत आवश्यक आदेश देण्याचे आश्वासन दिल्यानंतर महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने जाहीर केलेले आंदोलन स्थगित केले आहे.

सोलापूर जिल्हा समाजकल्याण सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्या दालनात म हाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेच्या शिष्टमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत गेल्या दोन वर्षांतील विविध कामांच्या निधी वाटपाचा प्रश्न प्रामुख्याने चर्चिला गेला. संघटनेच्या म्हणण्यानुसार, सन २०२३-२४ मधील सुमारे ११ कोटी रुपये आणि सन २०२४-२५ म धील ५ कोटी रुपये असा एकूण १६ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध असूनही संबंधित कंत्राटदारांना गेल्या पाच महिन्यांपासून देयके अदा करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे कंत्राटदारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली होती. थकीत देयके न मिळाल्याने महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने बुधवार दि.२४ जून रोजी जिल्हा समाजकल्याण कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. मात्र, मंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने आणि निधी वाटपाबाबत आश्वासक भूमिका समोर आल्याने हे आंदोलन मागे घेण्यात आले.या बैठकीस कांतीलाल डुबल, कैलास लांडे, आनंद तोडकरी, नरेंद्र भोसले, विनोद चव्हाण, हेमंत जाधव, जितेश कदम, किरण गावडे आणि गणेश पवार यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### ठळक मुद्दे

✻ दोन आर्थिक वर्षांतील सुमारे १६ कोटी रुपयांचा निधी प्रलंबित. ✻ कंत्राटदारांची देयके पाच महिन्यांपासून रखडलेली. ✻ सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांचे दोन दिवसांत आदेश देण्याचे आश्वासन. ✻ जाहीर केलेले आंदोलन तात्पुरते स्थगित. ✻ निधी वितरण प्रक्रियेकडे आता कंत्राटदारांचे लक्ष.

### निधी वाटप प्रक्रियेला गती

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी बैठकी दरम्यान सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्याशी दूरध्वनीवरून थेट संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. सहाय्यक आयुक्तांच्या उपस्थितीत झालेल्या या चर्चेत मंत्री शिरसाट यांनी निधी वाटप प्रक्रियेला गती देण्यासाठी दोन दिवसांत आवश्यक आदेश काढण्याचे आश्वासन दिल्याचे भोसले यांनी सांगितले.

# भर दुपारी व्यापाऱ्याचे बंद घर फोडले; सोन्याच्या दागिन्यांसह ११ लाखांचा ऐवज लंपास

## वसंत विहार परिसरातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जून-**
बंद घराचा कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी केवळ २ तासाच्या अवधीत एका व्यावसायिकाच्या बंद घरातून तब्बल साडे १३ तोळे सोन्याचे दागिने आणि ६० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेल्याची खळबळ जनक घटना वसंत विहार परिसरातील ज्ञानेश्वरीनगर येथील शीतल पॅरडाइजच्या तिसऱ्या मजल्यावर मंगळवार दि. २३ जून रोजी दुपारी ३.१५ वा ते सायंकाळी ५.२० वा. चे दरम्यान घडली.



दरम्यान याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबत व्यावसायिक अमर रामचंद्र पवार (वय- ३५ वर्षे, रा. फ्लॅट नं. ३०१, शितल पॅराडाईज अपार्टमेंट, धानेश्वरी नगर, वसंत विहार सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. मंगळवार रोजी यातील फिर्यादीची पत्नी व मुले पुण्याला गेली होती, तर वडील आणि भाऊ कामानिमित्त बाहेर होते. दुपारच्या सुमारास अमर पवार हेदेखील तुळजापूरहून सोलापुरात आले, त्यानंतर पुन्हा कामानिमित्त दुपारी ३ वाजता घराबाहेर पडले. पवार कुटुंबीयांच्या हालचालींवर आधीपासूनच पाळत ठेवून असलेल्या चोरांनी ते बाहेर पडताच त्यांच्या घराच्या दरवाजाची मुख्य कडी कोयंडा तोडून आत प्रवेश केला व बेडरूम मधील कपाटातील सोन्याचे २ गंठण , २ लॉकेट , अंगठ्या ,नेकलेस , कानातील टॉप्स , रिंगा ,ठुशी ,चांदीचे जोडवे व रोख रक्कम ६० हजार रुपये मिळून एकुण १० लाख ८२ हजार २५३ रुपये किमतीचा ऐवज घेऊन चोरटे पसार झाले. ही चोरी दुपारी ३.१५ वा ते सायंकाळी ५.२० वा. चे दरम्यान घडली. दरम्यान फिर्यादीचे बंधू सायंकाळी ५.२० वाजण्याच्या सुमारास घरी आल्यानंतर घरात चोरी झाल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी लगेच खाली मजल्यावर राहणाऱ्यांना याची माहिती दिली. त्यानंतर ही माहिती पोलिसांना दिली.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, प्रीतम यावलकर, गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त दीपक पवार, पोलिस निरीक्षक अरविंद माने, महादेव राऊत तसेच स्थानिक पोलिस स्टेशनचे डीबी पथक आणि श्वान पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गुन्ह्याचा पुढील तपास महिला फौजदार जेऊघाले या करीत आहेत .

### सीसीटीव्ही व सुरक्षारक्षक नसल्यामुळे चोरांचे फावले

काही दिवसांपूर्वीच या परिसरात 'कोयता गँग' आणि 'चड्डी गँग'च्या हालचालींची चर्चा होती. या दहशतीमुळे नागरिक आधीच घाबरलेले असताना ही मोठी घरफोडी झाली. सर्वात गंभीर बाब म्हणजे, या परिसरात सुरक्षेसाठी अत्यंत आवश्यक असणारे सीसीटीव्ही कॅमेरेच उपलब्ध नाहीत. स्थानिक प्रशासनाच्या आणि गृहनिर्माण सोसायट्यांच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे चोरांचे फावले आहे.

# अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणासाठी धर्माबाद ते मुंबई महापदयात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**
अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करून वंचित घटकांना न्याय द्यावा या प्रमुख मागणीसाठी लोकस्वराज्य आंदोलनाच्या वतीने धर्माबाद ते मुंबई अशी महापदयात्रा काढण्यात आली असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. रामचंद्र भरांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्याच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ११ जून ते ६ जुलै २०२६ या कालावधीत ही पदयात्रा सुरू असून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार राज्यांना अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार प्राप्त झाला आहे. वास्तविक समानता, अंतरगत मागासलेपणा आणि अपुरे प्रतिनिधित्व या निकषांवर आधारित आरक्षणाचा लाभ खऱ्या अर्थाने वंचित घटकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.महाराष्ट्रातील अनुसूचित जाती सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या समान नसून काही मोठ्या जातींना आरक्षणाचा अधिक लाभ मिळाला आहे. तर मातंगसह अनेक जाती आजही मागासलेल्या स्थितीत असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे अनुसूचित जातींचे 'वंचित अनुसूचित जाती' आणि 'इतर अनुसूचित जाती' असे दोन गट करून १३ टक्के आरक्षणापैकी ६ टक्के आरक्षण वंचित घटकांसाठी राखीव ठेवावे, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय शैक्षणिक प्रवेश, शासकीय योजना, उद्योग क्षेत्रातील संधी, तसेच १९६० पासूनचा भरतीतील अनुशेष प्राधान्याने भरावा, अशीही मागणी करण्यात आली. एका गटात पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास दुसऱ्या गटातील उमेदवाराला संधी देण्याची लवचिक व्यवस्था ठेवावी.

महाराष्ट्र शासनाने लोकसंख्या किंवा जातवार महामंडळांच्या आधारे नव्हे, तर सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केलेल्या निकषांनुसार उपवर्गीकरण करावे, अशी भूमिका लोकस्वराज्य आंदोलनचे डॉ. भरांडे यांनी मांडली. मुख्यमंत्री यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही डॉ. भरांडे यांनी दिला. पत्रकार परिषदेला विजय डोईवाड, नगरसेवक समाधान आवळे, श्रीमंत जाधव, श्रीकांत रणदिवे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४८२

**कां नटलेनि लाघवें। नटू जैसा न झकवे।।**
**तैसें गुणजात देखावें। न होनियां।।**

सत्व, रज, तम या तिन्ही गुणांबद्यल भगवंतांनी अर्जुनाला आतापर्यत स्वतंत्रपणे माहिती दिली आहे. त्यानंतर भगवंत पुनश्च थोडक्यात या तिन्ही गुणांचा देहाशी, अंत:करणाशी संबंध कसा आहे हे सांगत आहेत. हे तिन्ही गुण देहाच्या निमित्तानेच आपले सामर्थ्य दाखवितात. दहयाच्या रुपाने जसे दुध रुपांतरीत होते किंवा गोडपणा उसाच्या निमित्ताने प्रत्यक्षात येतो. त्या प्रमाणे त्रिगुणच अंत:करणासह देहाच्या रुपाने परिणामाला प्राप्त होतात, म्हणून ते देहादिकाच्या तादात्म्याद्वारा जिवात्म्याच्या बंधाला कारण होत असतात. खरे म्हणजे जिवाला त्रिगुणाचे असे बंधन असले तरीही मुक्तस्थितीला ते बिघडू शकत नाहीत. हे तिन्ही गुण रात्रंदिन देहाच्या मागेपुढे हालचाल करीत असले तरीही, आत्म्याच्या गुणातीतपणास धक्का लागत नाही. हा धक्का लागू नये म्हणून ज्ञानी पुरुषाप्रमाणे आपणही काळजी घ्यायला हवी. चैतन्य हे गुणात असूनही गुणास वश होणारे नसते हे, भगवंतांनी अर्जुनाला यापूर्वीच सांगितले आहे. ज्यावेळी जिवाला आत्मबोध होतो, तेव्हा सर्व खरा खोटेपणा जिवाच्या लक्ष्यात येतो.जागे झाल्यावर स्वप्नातील खोटारडेपणा, आभास जसा लक्षात येतो किंवा पाण्यातील लाटांबरोबर डोलणारे किंवा पाण्यात तुकडे-तुकडे झालेले दिसणारे शरीर म्हणजे आपण नव्हे, हे काठावर बसल्याने आपल्या लक्षात येते. त्या प्रमाणे जिवात्म्याला आत्मबोधाने हे सर्व लक्षात येत असते. या वर आणखी स्पष्टीकरण करीत असतांना भगवंत म्हणाले,



**कां नटलेनि लाघवें। नटू जैसा न झकवे।।**
**तैसें गुणजात देखावें। न होनियां।।**

अर्थात, नाटकात पात्र करणारा नट हा घेतलेल्या सोंगाणे किंवा भूषवित असलेल्या पात्राने तो फसत नसतो. त्याप्रमाणे आपण त्रिगुणासारखे न होता, त्रिगुण हे आपल्यापेक्षा भिन्न आहेत आणि आपले स्वरुप स्वतंत्र आहे, हे मुमुक्षाने लक्षात घ्यायला हवे.

आकाशात हिवाळा-पावसाळा-उन्हाळा हे ऋतू येत असतात, पण आकाश या ऋतूंना धारण करुनही आपल्या वेगळेपणास बाधा येऊ देत नाही. त्याप्रमाणे त्रिगुणात राहूनही जो गुणापलिकडे राहतो, जो स्वयंसिध्द आत्मतत्वास जाणतो तो या त्रिगुणात अजिबात अडकत नाही. त्रिगुणच सर्व कार्यांना कारण असून आपण अकर्ता, अभोक्ता आणि साक्षी असल्याचे ज्ञानी भक्त जाणतो. सर्वप्रकारचे कर्मकांड हे सत्व रज,तमाणेच होत असतात याची जाण आपणाला असावी. आपल्यात आणि ज्ञानी भक्तात सर्वात महत्वाचा हाच फरक आहे की, ज्ञानी भक्त त्रिगुणात स्वत:ला अडकू देत नाही आपण मात्र हा देह म्हणजे मी म्हणून या देहाला त्रिगुणात अडकून टाकतो. एकदा का देह त्रिगुणात अडकला आणि आपण या देहाला मी समजून वागू लागलो की, मग आत्मतत्व, आत्मज्ञान, ब्रम्हस्वरुप, ज्ञानीभक्ती, हे सर्व मिथ्या वाटू लागते. हे शाश्वत सत्य मिथ्या ठरवणे म्हणजे आपले सर्वस्व आपणच नष्ट केल्यासारखे आहे. आपणाला आपले सर्वस्व नष्ट होऊ द्यायचे नसल्याने आपण देहाला या त्रिगुणात अडकू न देता आत्मज्ञान जाणून घेण्याचा प्रयत्न करायला हवा.या नाशिवंत देहालाच मी समजून बसणा-यांना आत्मतत्वाचे ज्ञान होणे दुरापास्त असते,हे आपण लक्षात ठेवायला हवे.मी ला जोपासणारे आपणच असल्याने त्याला नष्ट करण्याची जबाबदारीही आपलीच आहे,हे आपणाला विसरता येणार नाही. जय जय राम कृष्ण हरी। डॉ. विजयकुमार पं. फड श्री. माऊली निवास ९४२२२१६४४८. संत ज्ञानेश्वर महाराजांचा फोटो घ्यावा.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार,
दि. २५ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - ज्येष्ठ शु. एकादशी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- स्वाती (१६.२८)
योग - शिव (१०.५३)
करण - वणिज (०७.०८)
राहू काल : गुरूवार
दु. १२.०० ते ०१.३०

दिनविशेष : १८६९: महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतीचे शिरोमणी आणि चापेकर बंधूंपैकी ज्येष्ठ दामोदर हरी चापेकर यांचा जन्म.
१९७५ : भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात अंतर्गत आणीबाणी जाहीर केली. हा दिवस भारतीय इतिहासातील एक काळा दिवस मानला जातो.
१९८६: मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री सई ताम्हनकर यांचा वाढदिवस.

# ‘बालसुरक्षेसाठी दुहेरी आरोग्य कवच’

## अतिसारमुक्त बालपणसह पोलिओमुक्त भविष्याकडे सोलापूरची वाटचाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बालकांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभागाने दुहेरी मोहिमेचा प्रारंभ केला आहे. ‘अतिसार थांबवा’ अभियानाद्वारे बालमृत्यू रोखण्याचा निर्धार करण्यात आला असून, त्याचबरोबर २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवून पाच वर्षांखालील प्रत्येक बालकापर्यंत आरोग्यसेवा पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर ‘अतिसार थांबवा’ मोहीम ३१ जुलै २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे. बालकांमध्ये अतिसारामुळे होणारे मृत्यू पूर्णपणे रोखणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

उन्हाळा आणि पावसाळ्यात वाढणाऱ्या अतिसाराच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी आशा स्वयंसेविका घरोघरी जाऊन शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांचे आरोग्य सर्वेक्षण करणार आहेत.

जिल्ह्यातील ३ उपजिल्हा रुग्णालये, १४ ग्रामीण रुग्णालये, ८२ प्राथमिक आरोग्य केंद्रे, शहरी आरोग्य केंद्रे आणि ४३३ उपकेंद्रांमधून



ओआरएस व झिंक गोळ्यांचे मोफत वितरण केले जाणार आहे. तसेच प्रत्येक आरोग्य संस्थेत ‘झिंक-ओआरएस कॉर्नर’ सुरू करण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ३६ हजार ५७२ बालकांना या मोहिमेचा लाभ मिळणार असून, सर्वेक्षणा दरम्यान अतिसाराची लक्षणे आढळल्यास तातडीने उपचार आणि औषधोपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

दरम्यान, रविवारी २८ जून रोजी राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यासाठीही आरोग्य विभागाने व्यापक तयारी केली आहे. जिल्ह्यातील ४ लाख ३६ हजार ५७२ बालकांना पोलिओ प्रतिबंधक डोस देण्यासाठी ग्रामीण भागात ५ हजार ५७०, शहरी भागात ५७० आणि महानगरपालिका क्षेत्रात ३७३ लसीकरण बूथ उभारण्यात आले आहेत.

या मोहिमेसाठी ७ हजार २२२ कर्मचारी नियुक्त करण्यात आले असून, वैद्यकीय अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी आणि जिल्हास्तरीय पर्यवेक्षक यांच्यामार्फत देखरेख केली जाणार आहे. बसस्थानके, रेल्वे स्थानके, बाजारपेठा, विटभट्ट्या, साखर कारखाने, यात्रा आणि लग्न समारंभ स्थळांवर विशेष लसीकरण सुविधा उपलब्ध राहणार आहेत.

तसेच भटक्या वसाहती व ऊसतोड कामगारांच्या वस्त्यांपर्यंत पोहोचण्यासाठी मोबाईल पथके कार्यरत राहतील. बालकांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासन, आरोग्य यंत्रणा आणि पालक यांचा समन्वयच या दोन्ही मोहिमांच्या यशाचा खरा आधार ठरणार आहे.

### सर्व बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजावेत

‘एकही बालक वंचित राहू नये’ हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून आरोग्य विभागाने पालकांना आवाहन केले आहे. पाच वर्षांखालील सर्व बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजावेत, तसेच अतिसाराची लक्षणे दिसताच आशा सेविका किंवा जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड यांनी केले आहे.

### ठळक आकडेवारी

- मोहीम कालावधी : ३१ जुलै २०२६ पर्यंत
- ० ते ५ वर्षे वयोगटातील बालके : ४,३६,५७२
- उपजिल्हा रुग्णालये : ३
- ग्रामीण रुग्णालये : १४
- प्राथमिक आरोग्य केंद्रे : ८२
- आरोग्य उपकेंद्रे : ४३३
- झिंक-ओआरएस कॉर्नर : सर्व आरोग्य संस्थांमध्ये
- राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम : २८ जून २०२६
- ग्रामीण भागातील पोलिओ बूथ : ५,५७०
- शहरी भागातील पोलिओ बूथ : ५७०
- महानगरपालिका क्षेत्रातील पोलिओ बूथ : ३७३
- एकूण लसीकरण कर्मचारी : ७,२२२
- विशेष मोबाईल पथके : भटके, स्थलांतरित व ऊसतोड कामगारांच्या वस्त्यांसाठी.

# आसार मैदान येथे पंजे व सवारींचा संगम; मलिदा प्रसादाचे वाटप

### धावत्या ‘शहीद-ए-आझम’ पंज्यासह नाले हैदर हुसेन बाशा सवारीचे आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

मोहरम उत्सवानिमित्त मंगळवारी सायंकाळी शनिवार पेठेतील शहीद-ए-आझम पंजा, जिंदशाह मदार चौक येथील मानकरी इकबाल रंगरेज यांच्या तर्फे इमाम-ए-कासीम पंजा, तसेच शनिवार पेठेतील घोडेवाले यांची पारंपरिक नाले हैदर हुसेन बाशा सवारी यांची भव्य मिरवणूक उत्साहात काढण्यात आली. श्रद्धा, परंपरा आणि धार्मिक वातावरणाने नटलेल्या या मिरवणुकांनी शहरातील मोहरम उत्सवाला विशेष रंगत आणली.

मिरवणुकीपूर्वी पंज्यांना आकर्षक फुलांच्या सेहऱ्याने सजविण्यात आले होते. त्यानंतर ढोल-ताशांच्या गजरात आणि धार्मिक घोषणांमध्ये या सवाऱ्या विजापूर वेस, माणिक चौक, दत्त चौक मार्गे आसार मैदान येथे दाखल झाल्या. शहरातील विविध भागांतून आलेल्या सवारींच्या भेटीमुळे आसार मैदान परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.



शनिवार पेठेतील शहीद-ए-आझम पंज्याची मिरवणूक धावत काढण्याची परंपरा आजही जपली जात आहे. धावत्या पंज्याचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. तसेच मंगळवेढा येथून आणलेल्या घोड्यांच्या नृत्यासाठी प्रसिद्ध असलेल्या नाले हैदर सवारीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या सवारीमध्ये रफिक बिजापुरे घोडेवाले यांना मानाचे स्थान आहे.

यंदाच्या मोहरम उत्सवात नाले हैदर हुसेन बाशा सवारी देखील आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली. या सवारीचे घोडे नाचवणारे मानकरी समाधान भोसले आणि अण्णा बिनवडे (मूळ मंगळवेढा) यांनी परंपरेनुसार सहभाग नोंदवत सवारीची शान वाढविली. आसार मैदान येथे सर्व पंजे आणि सवारी एकत्र आल्यानंतर शकील मौलवी यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी गूळ आणि चपातीपासून तयार करण्यात आलेल्या पारंपरिक मलिदा प्रसादाचे भाविकांना वाटप करण्यात आले. या प्रसंगी मोहरम उत्सवाचे मकबूल मोहोळकर, इक्बाल दुर्वेश उपस्थित होते.



# कुलकर्णी प्रशालेतील ग्रंथालयास श्यामची आई पुस्तकांच्या प्रती भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

येथील ग.ल. कुलकर्णी प्राथमिक व बी.एस.कुलकर्णी माध्यमिक प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर साने गुरुजी कथामालेच्या वतीने वह्यांचे आणि श्यामची पुस्तकांचे भेट स्वरुपात वितरण करण्यात आले

सोलापूर कथामालेच्या अध्यक्षा आरती काळे यांच्या सौजन्याने व ग्रंथपाल माधवी अभ्यंकर यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या विश्वस्त मुख्याध्यापिका ऐश्वर्या कुलकर्णी होत्या. कथामालेचे मार्गदर्शक अशोक खानापुरे, कोषाध्यक्ष अशोक म्हमाणे, कार्यवाह डॉरामचंद्र धर्मसाले हे उपस्थित होते. उपाध्यक्ष सुनील पुजारी आणि सहकार्यवाह अरुण धुमाळ यांनी खरा तो एकची धर्म ही विश्व प्रार्थना मुलांकडून तालासुरात गाऊन घेतली. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. आरती काळे यांनी कथा सांगितली डॉ. रामचंद्र धर्मसाले यांनी साने गुरुजींच्या प्रार्थनेचा अर्थ समजून सांगितला. होतकरु विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आल्या,तर ग्रंथालयास श्यामची पुस्तकाच्या प्रती भेट देण्यात आल्या. कविता थंबद यांनी सूत्रसंचालन केले तर, मंगल गोटे यांनी आभार मानले. परिचय जयदेवी भालेकर यांनी करुन दिला.

# सेवासदन प्रशालेत योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जून-**

योग दिनानिमित्त सेवासदन प्रशालेमध्ये योगसाधना मंडळाच्या अध्यक्षा रोहिणी उपळाईकर, उपाध्यक्ष संगीता गायकवाड, कार्याध्यक्ष नागनाथ पाटील यांनी विविध योगासने प्राणायाम यांची प्रात्यक्षिके सादर केली.

याप्रसंगी पर्यवेक्षिका स्वाती पोतदार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. क्रीडा प्रमुख ज्ञानेश्वर काळे यांनी कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले. या प्रसंगी सेवासदन संस्थेच्या सचिवा वीणा पतकी, योग साधना मंडळाचे सदस्य शीतल ढेपे, मनीषा बडवे, शुभांगी घाडगे,भाग्यश्री चेळेकर, सुनील माढेकर, बाबूशेठ सोनी,



सेक्रेटरी योगिराज कलबुर्मे, बालवर्ग विभाग प्रमुख मनीषा दिकोंडा, सेवासदन प्राथमिक विभाग प्रमुख संजीवनी नगरकर, कनिष्ठ महाविद्यालय विभाग प्रमुख सतीश कुलकर्णी आदी उपस्थित होते.



# साकव फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २४ जून-**

सामाजिक बांधिलकी जपत शिक्षणाला बळ देण्याच्या उद्देशाने साकव फाउंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इ. ल. तांडा आणि साईबाबा प्रशाला येथे एकूण २६० विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्यांचे वाटप करण्यात आले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, इ. ल. तांडा येथे साकव फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. जगदीश पाटील व राहुल बिराजदार यांच्या हस्ते इयत्ता पहिली ते सातवीच्या १५० विद्यार्थ्यांना वह्यांचे वितरण करण्यात आले. यावेळी वाचक दूत श्रीधर खेडगीकर यांनी विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने गोष्टींची पुस्तके भेट दिली. यावेळी शिक्षकवृंद खेडगीकर, सय्यद, राठोड व कडगी उपस्थित होते. त्यानंतर साईबाबा प्रशाला येथे माळवदे, डॉ. जगदीश पाटील आणि राहुल बिराजदार यांच्या हस्ते ११० विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक टिपण्णा कोळी, पाटील, थोरात व शिक्षकवृंद उपस्थित होते.

# महापालिकेच्या विकास आराखडा डॅशबोर्डचे लोकार्पण

## विकास आराखड्याची माहिती एका क्लिकवर उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**



महानगरपालिकेच्याव तीने शहराच्या नियोजन प्रक्रियेत पारदर्शकता, सुलभता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढविण्याच्या उद्देशाने ’वेब जीआयएस’ आधारित विकास आराखडा डॅशबोर्ड विकसित करण्यात आला असून त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे.

हा डॅशबोर्ड सोलापूर शहराच्या भविष्यातील विकास आराखड्याशी संबंधित विविध भौगोलिक व नियोजनविषयक माहिती नागरिक, वास्तुविशारद, नगररचनाकार, संशोधक, विकासक आणि इतर संबंधित घटकांना ऑनलाइन स्वरूपात उपलब्ध करून देणार आहे.

सोलापूर महानगरपालिकेने शहरी नियोजन प्रक्रियेला अधिक पारदर्शक, जबाबदार आणि नागरिकाभिमुख बनविण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विकास आराखड्याची माहिती रिअल-टाइममध्ये उपलब्ध करून देण्यात येत असल्याने माहितीवर आधारित निर्णय घेणे अधिक सोपे होणार आहे. तसेच संशोधक, शैक्षणिक संस्था, नगररचनाकार आणि विविध विभागांना शहराच्या विकासविषयक अभ्यासासाठी हा डॅशबोर्ड उपयुक्त ठरणार आहे.

‘डीपी२०४७ डॅशबोर्ड हे नागरिकाभिमुख डिजिटल व्यासपीठ असून यामुळे विकास आराखड्याची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सहज पोहोचेल. नियोजन प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होईल तसेच शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुयोग्य शहरी विकासासाठी हे प्रभावी साधन ठरेल, असे महापालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सर्व नागरिक, व्यावसायिक, संशोधक आणि विविध संस्थांना या डॅशबोर्डचा लाभ घेण्याचे तसेच सोलापूर शहराच्या भविष्यकालीन विकासाच्या सामूहिक ध्येयात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वेब जीआयएस विकास आराखडा डॅशबोर्ड (डीपी २०४७) संकेतस्थळ https://gis-dp.solapurcorporation.org/ असे आहे.

### विकास आराखड्यातील तरतुदींची माहिती सहज तपासता येणार

या आधुनिक डिजिटल प्रणालीमुळे नागरिकांना त्यांच्या मालमत्तेच्या परिसरातील विकास आराखड्यातील तरतुदी, प्रस्तावित रस्ते, नियोजन क्षेत्रे आणि इतर महत्त्वपूर्ण माहिती सहजपणे तपासता येणार आहे. यामुळे विकास आराखड्याशी संबंधित माहिती मिळिवण्यासाठी महानगरपालिका कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता कमी होणार असून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार आहे.



# पीएसपीएम महिला होमिओपॅथी मेडिकल कॉलेजतर्फे योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

पीएसपीएम महिला होमिओपॅथी मेडिकल कॉलेज आणि भारत विकास परिषद शाखेतर्फे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. वंदे मातरम गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक महादेव न्हावकर यांनी केले. त्यानंतर योग शिक्षक अमृता बदामीकर यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय प्रोटोकॉलनुसार योगदिनाच्या प्रात्यक्षिक प्रमुख प्राजक्ता रबकई प्रात्यक्षिके केली त्यानुसार सर्वांनी योगासने, प्राणायाम, ध्यान इत्यादी केले.सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांसह संस्थेचे शिक्षक आणि भारत विकास परिषदेच्या सचिवा स्मिता देशपांडे, सदस्य किशोरी भट याही सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी विद्या इंग्लिश मिडीयम स्कूलचे विद्यार्थी-विद्यार्थिनी, पीएसपीएम महिला होमिओपॅथी मेडिकल कॉलेजच्या विद्यार्थिनी, मथुराबाई हरपाळे नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनी, डॉ. विलास हरपाळे पीजी कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग या संस्थांमधून एकत्रित होता. कार्यक्रमास या सर्व संस्थांचे संस्थापक चेअरमन डॉ विलास हरपाळे, विद्या इंग्लिश मिडीयम स्कुलच्या प्राचार्या पौरवी हरपाळे वडगावकर, संस्थेचे सिईओ अभिजित वडगावकर, माणेकरी, ज्योती उडगे, वर्षा पगारे, शारदिनी काळे तसेच भारत विकास परिषदेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत कुर्रा, सचिवा स्मिता देशपांडे, जेष्ठ सदस्य श्रीकांत कुलकर्णी, महादेव न्हावकर, सेवा प्रमुख व योग शिक्षक रघुनाथ क्षीरसागर, आनंद देशपांडे, पवार, साठे, किशोरी भट उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्या पत्तार यांनी केले.

# समता विद्यालयात योग दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

श्री वसंतराव नाईक हायस्कूल व समता मराठी विद्यालय येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी योगशिक्षिका डॉ. प्रा. भाग्यश्री राठोड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली प्रात्यक्षिकाद्वारे सर्व विद्यार्थी, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगासन व प्राणायाम घेण्यात आले. प्रशालाचे मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण यांनी योग दिनाचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले, योग शिक्षिका यांचा सत्कार पवार, मुदलीयार, राठोड व कोरे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी क्रीडाशिक्षक देशमाने व योगगुरु लवटे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन राठोड गणेश यांनी केले आभार लवटे यांनी मानले.



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची बदली

**पंढरपूर, दि.२४ जून -**



येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची कल्याण येथे उपविभागीय अधिकारी म्हणून बदली झाली आहे. गेल्या दोन वर्षापासून शेळके बदली व्हावी म्हणून प्रयत्न करत होते; अखेर त्यांना यश आले आहे. आता विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारीपदी कोणाची नियुक्ती होणार याकडे लक्ष लागले आहे.



### जिल्हा परिषद शाळा अंत्रोळीत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**सोलापूर, दि. २४ जून-**

जिल्हा परिषद शाळा अंत्रोळीत दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, योगामुळे होणारे शारीरिक व मानसिक फायदे आदीबाबत नागनाथ म्हमाणे यांनी मार्गदर्शन केले. यानंतर शाळेचे मुख्याध्यापक श्रीरंग बनसोडे यांनी विद्यार्थ्यांना मुक्त हालचालींचा सराव करून घेतला. विविध योगासने आणि प्राणायाम ाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने योगासने केली. किर्ती जाधव, राठोड आणि बनसोडे यांनीही योगासनांचे मार्गदर्शन करून ात्यक्षिक दाखविले. सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी एकत्रितपणे योगाभ्यास केला.

### मंगळवेढा बसस्थानकावर महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने लंपास

**मंगळवेढा दि. २४ जून -**

मंगळवेढा बसस्थानकावर मंगळवेढा ते स्वारगेट या बसमध्ये चढत असताना एका ६० वर्षीय महिलेच्या पर्समधील सोन्याची माळ व रोख रक्कम असा एकूण ४५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल गर्दीचा फायदा घेवून चोरट्यांनी लंपास केला. याप्रकरणी अज्ञात चोरटयाविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी नुरजहाँ काझी ह्या पुणे येथे रहावयास असून खुपसंगी येथे घराचे बांधकाम सुरु असल्याने पाहणीसाठी आल्या होत्या. दि.२१ जून रोजी दुपारी १.३० वा. पुण्याला जाण्यासाठी मंगळवेढा बसस्थानकावर उमंगळवेढा ते स्वारगेट बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या पर्समध्ये ठेवलेली ४० हजार रुपयांची सोन्याची माळ व रोख ५ हजार रुपये असा एकूण ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल अलगदपणे काढून घेवून पोबारा केला असल्याचे काझी यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

### यशासाठी कठोर परिश्रमासोबत सातत्य आवश्यक : नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे

**अक्कलकोट, दि. २४ जून -**

तांत्रिक व उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात यश संपादनासाठी कठोर परिश्रम आवश्यक असतात. कोणत्याही क्षेत्रात दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी सातत्य हा महत्त्वाचा गुण आहे, असे प्रतिपादन दुधनी नगरपालिकेचे नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे यांनी केले.

समर्थ प्रतिष्ठान, अक्कलकोटच्या वतीने आयोजित दहावी, बारावी तसेच जेईई, सीईटी, डिप्लोमा आदी विविध शाखांतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. डिप्लोमा कॉम्प्युटर इंजिनिअरिंग शाखेत ९४.१२ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या सोमनाथ कडबगांवकर याचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मैंदर्गीच्या नगराध्यक्षा अंजली बाजारमठ, श्री स्वामी समर्थ मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, लायन्स क्लबचे माजी प्रांतपाल राजशेखर कापसे, समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश हिंडोळे, नगरसेवक रमेश कापसे, नगरसेवक तम्मा शेळके, अशोक जाधव, ज्येष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी, संगमेश्वर महाविद्यालयाचे प्रा. संतोष पवार, प्रशांत शिंपी, दयानंद बिडवे, दिलीप महिंद्रकर, श्रीकांत झिपरे, प्रदीप हिंडोळे, शिवशरण इचगे, जाधव, आंदोडगी, सत्यजित लोके, अनिल बिडवे, जगदीश शेटे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समर्थ प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश हिंडोळे, दयानंद बिडवे, अप्पू संगापुरे, श्रीकांत झिपरे, राजू एकबोटे, रवी वाघमोडे, अरुण शिंदे, ओमब जिरगे यांनी परिश्रम घेतले. सूत्र संचालन राजकुमार भोसले यांनी केले.

### ट्रॅक्टरने धडक दिल्याने वृद्धेचा जागीच मृत्यू

**चालकावर गुन्हा दाखल**



**मंगळवेढा, दि. २४ जून-**

निंबोणी येथे रस्त्याने चालत जाणाऱ्या वृध्द महिलेस ट्रॅक्टर भरधाव चालवून धडक दिल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

या प्रकरणी ट्रॅक्टर चालक दत्ता भिवा देवकते याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. दि.२२ रोजी सायंकाळी ६.०० वाजता फिर्यादी रजाक तांबोळी याची आई वजीरबी रमजान तांबोळी (वय ७७) ही निंबोणी गावातील चौकातून रस्त्याने चालत जात होती.

तेव्हा दत्ता देवकते याने त्याच्या ताब्यातील बिगर नंबरचा ट्रॅक्टर भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीच्या आईला समोरून जोराची धडक दिली. यात तिला फरफटत नेवून गंभीर जखमी झाल्याने मृत्यू झाला, असे करून फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस हवालदार काळे हे करीत आहेत.

# जिल्ह्यात पालखी सोहळे, वारकरी येण्यापूर्वीच सर्व सुविधा पूर्ण करा

**जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन; वारी कालावधीत व्हीआयपी दर्शन बंद; नो व्हेईकल झोनचेही आदेश**

- वारी कालावधीत भीमेतील सर्व बोटींची तपासणी करा
- बोट चालकांची स्वतंत्र बैठक घ्यावी
- पंढरपूर शहरातील ऑटो चालकांवर लक्ष ठेवा




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२४ जून -**

आषाढी एकादशी सोहळ्यानिमित्त पालखी सोहळ्यांसमवेत येणाऱ्या लाखो वारकरी, भाविकांसाठी द्यावयाच्या सर्व सोयी सुविधा पालखी सोहळे जिल्ह्यात येण्यापुर्वीच पुर्ण करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दिल्या.

आषाढी वारी २०२६ पूर्व तयारी बैठकीत जिल्हाधिकारी कार्तिकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, पोलिस उपविभागीय अधिकारी प्रशांत डगळे, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहआयुक्त नगरपालिका आशिष लोकरे, अन्न धान्य पुरवठा अधिकारी ओंकार पडोळे, महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उपमुख्यकार्यकारी अधिकारी ग्राम पंचायत सूर्यकांत भुजबळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्याम कुंभार, पंढरपूर नगरपरिषद मुख्याधिकारी महेश रोकडे, गटविकास अधिकारी अमोल जाधव यांच्यासह पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील सर्व संबंधित अधिकारी ऑनलाइनद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्तीकेयन म्हणाले की, सर्वसामान्य भाविकांचे दर्शन सुलभ व कमी वेळेत होण्यासाठी यावर्षीही व्हीआयपी दर्शन बंदच राहणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने पालखी तळाचे मुरमीकरण करण्याबाबत आवश्यक ती तात्काळ कार्यवाही करावी. पालखी तळावरील स्वच्छता, काटेरी झुडपे काढणे, शौचालय दुरुस्ती, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधा, जंतनाशक फवारणी, हायमास्ट, स्नानगृह, हिरकणी कक्ष आदी सुविधांबाबत संबंधित नगरपालिकेने कार्यवाही करावी. नातेपुते येथील वाढीव पालखी तळाबाबत संबंधित जागा मालकाशी चर्चा करावी, यात्रा कालावधीत पालखी तळांवर सुलभ शौचालयाकडून वारकऱ्यांकडून पैसे घेत असल्याची तक्रारी येत आहेत. त्याबाबत तात्काळ सूचना द्याव्यात. तोंडले-बोंडले येथे संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सुरक्षितरित्या जाण्यासाठी पालखी सोहळा प्रमुखांशी चर्चा करून सुरक्षित मार्गाची व्यवस्था राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने करावी. पालखी महामार्गावरून पिराच्या कुरोली येथील पालखी तळाकडे जाणाऱ्या रस्तादुरुस्तीचे काम तात्काळ करावे. भंडीशेगाव येथे सोपान काका पालखी तळासाठी पाटबंधारे विभागाची जागा उपलब्ध करून दिली आहे. त्या ठिकाणी पाटबंधारे विभागाच्या वापरात नसलेल्या व पाडण्यासाठी परवानगी मिळालेल्या तीन इमारती तात्काळ पाडून सपाटीकरण व मुरमीकरण करावे. पालखी कट्टा तयार करावा, हायमास्ट दिवे आदी व्यवस्थेबाबत तात्काळ कार्यवाही करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी दिल्या.

वाखरी व कॉलेज चौक ते सरगम चौक येथील पुलाचे काम राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने तात्काळ पूर्ण करावे. तसेच साईड पट्टीचे काम व रस्त्याच्या कडेला पडलेला राडारोडा काढून टकावा. पोलिस प्रशासनाने वॉच टॉवरसाठी प्रस्ताव सादर करावा. ६५ एकर (भक्ती सागर) येथे पिण्याचे पाणी, शौचालय, हायमास्ट, मुरमीकरण, सुशोभीकरण आदी सुविधा नगरपालिका प्रशासनाने उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

चंद्रभागा नदी पात्रात होडी चालकांना तसेच जलप्रवाशांना लाइफ जॅकेटची उपलब्धता करावी. नदीपात्रात रेस्क्यू वाहन, सुरक्षा रक्षक नेमावेत, आसन क्षमतेपेक्षा जास्त जलप्रवासी वाहतूक करू नये. सूर्यास्तानंतर जलप्रवास वाहतूक बंद ठेवावी. याची ठिकाणे निश्चित करावीत. टँकर भरण्यासाठी जाणारे रस्ते सुस्थितीत असावेत याची दक्षता घ्यावी. आरोग्य विभागाने तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती करावी. मुबलक औषध साठा उपलब्ध ठेवावा, असेही कार्तिकेयन म्हणाले. जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी म्हणाले की 'यात्रा कालावधीत चंद्रभागेच्या घाटांना मजबूत बॅरिकेटिंग करावे. काही घाटांचे दगड सैल झालेले असल्यामुळे त्याची दुरुस्ती तात्काळ करावी. सीसीटीव्हीची संख्या वाढवावी. वाखरी पालखी तळावर कायमस्वरूपी वॉच टॉवर तयार करावा. पोलिस विभागाच्या वतीने एकूण ३३ वॉच टॉवर उभारले जातील.

मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी जिल्हा परिषदेला यात्रा कालावधीत पालखी सोहळे, वारकऱ्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ६१.५० कोटीचा निधी उपलब्ध झाला आहे. त्या अनुषंगाने २३ ठिकाणी जर्मन हंगर उभारणी करणार आहे. चरण सेवा उपक्रम, ५०० महिला स्नानगृह, पालखी मुक्कामाच्या ठिकाणी जोड रस्ते, मुरमीकरण, हिरकणी कक्ष, १५ मोबाईल चार्जिंग व्हॅन, तीनशे मोबाईल आरोग्य दूत, पाणी टँकरची व्यवस्था, ५ हजार मोबाईल टॉयलेटची व्यवस्था, १० हजार वृक्षारोपण करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी पंढरपूर नगरपरिषदेच्या वतीने पंढरपूर शहर तसेच ६५ एकर परिसरात उपलब्ध करून देणाऱ्या सोयीसुविधांची माहिती दिली. मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर, मंदिर परिसर तसेच वाळवंटात मंदिर समितीच्या वतीने भाविकांसाठी सुलभ व जलद दर्शन व्यवस्था तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करत असल्याचे सांगितले.

## पंढरपूर वारीच्या पार्श्वभूमीवर आज विशेष बैठक

**विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना उपस्थितीचे निर्देश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सोलापूर जिल्हा परिषदेची विशेष सभा गुरुवार, दि. २५ जून रोजी दुपारी २ वाजता पंढरपूर येथील स्वेरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे होत आहे. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे निर्देश दिले आहेत.

जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक अरुण वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या विशेष सभेत आषाढी वारीदरम्यान पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांतून मार्गक्रमण करणाऱ्या विविध संतांच्या पालख्यांसोबतच्या वारकऱ्यांना पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, स्वच्छता, रस्ते, वीजपुरवठा, वाहतूक व्यवस्थापन आणि इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासंदर्भात मान्यता देण्याचा विषय चर्चेसाठी आला आहे. मोठ्या तयारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद प्रशासनाने आरोग्य, पाणीपुरवठा, कृषी, समाजकल्याण, पशुसंवर्धन, सार्वजनिक बांधकाम, महावितरण, परिवहन आणि जलसंधारणासह विविध विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना सभेस उपस्थितीचे निर्देश दिले आहेत.

बैठकीत पालखी मार्गावरील सुविधा, आरोग्य पथके, तात्पुरत्या वैद्यकीय केंद्रांची उभारणी, स्वच्छता व्यवस्था, पाणीपुरवठा आणि आपत्कालीन व्यवस्थापन याबाबत विभागनिहाय आढावा घेऊन आवश्यक मंजुरी देण्याची शक्यता आहे.

वारीच्या यशस्वी नियोजनासाठी ही विशेष सभा महत्त्वपूर्ण मानली जात आहे. वारकऱ्यांना अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि सुविधा-संपन्न वारीचा अनुभव देण्याच्या दृष्टीने प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे या बैठकीवरून स्पष्ट होत आहे.

## 'भैरवनाथ शुगर'मध्ये हंगामपूर्व रोलर पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २४ जून -**




भैरवनाथ शुगर वर्क्स लि., लवंगी येथे गळीत हंगाम २०२६-२७ च्या शुभारंभापूर्वी रोलर पूजन विधी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कारखान्याची निरंतर प्रगती, ऊस उत्पादक शेतकरी बांधवांची समृद्धी तसेच आगामी गळीत हंगाम यशस्वी व विक्रमी करण्याचा निर्धार करण्यात आला.

भैरवनाथ शुगर हा केवळ साखर कारखाना नसून हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्याचा, विश्वासाचा आणि समृद्धीचा भक्कम आधारस्तंभ ठरला आहे. माजी आरोग्यमंत्री आमदार डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच भैरवनाथ उद्योग समूहाचे चेअरमन अनिल सावंत यांच्या दूरदृष्टीमुळे कारखान्याने शेतकरी, कामगार आणि ग्रामीण भागाच्या विकासात उल्लेखनीय योगदान दिले आहे.

गळीत हंगामाच्या शुभारंभापुर्वी आयोजित रोलर पूजन सोहळ्यास जनरल मॅनेजर बाळासाहेब शिंदे, वर्क्स मॅनेजर नानासाहेब पोकळे, चिफ अकौंटंट देवानंद पासले, मुख्य शेतकी अधिकारी शिवाजी चव्हाण, शेतकी अधिकारी कृष्णदेव लोंढे, ईडीपी मॅनेजर गजानन माने-देशमुख, केनयार्ड सुपरवायझर शंकर पाटील, सुरक्षा अधिकारी कमळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी-वाहतूक ठेकेदार तसेच परिसरातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कारखान्याच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, शेतकरी आणि तोडणी-वाहतूक ठेकेदारांचे आभार व्यक्त करण्यात आले. शेतकरी, तोडणी-वाहतूक यंत्रणा, अधिकारी, कर्मचारी आणि सभासद यांच्या सहकार्यामुळेच कारखाना सातत्याने प्रगतीपथावर आहे. शेतकऱ्यांच्या विश्वासावर उभा असलेला कारखाना आगामी हंगामात उत्तम सेवा, वेळेत ऊस गळीत आणि कारखान्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कटिबद्ध आहे. सर्वांच्या सहकार्याने गळीत हंगाम २०२६-२७ यशस्वीपणे पार पडेल, असा विश्वास यावेळी प्रमुख अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## विद्यार्थ्यांनी आवड, कौशल्यांच्या आधारे करिअर निवडावे

**प्रा.विजय नवले; फॅबटेकमध्ये विद्यार्थी सन्मान व शिक्षक कृतज्ञता सोहळा**




**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२४ जून-**

पैसा हेच करिअरचे अंतिम उद्दिष्ट नसून समाजहितासाठी काम करणारी पिढी घडवणे ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी गुण, आवड आणि कौशल्यांच्या आधारे करिअर निवडावे असे मत प्रा.विजय नवले यांनी व्यक्त केले.

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथे आयोजित गुणवंत विद्यार्थी सन्मान व शिक्षक कृतज्ञता सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.पी.सी.झपके, संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, बाबुराव गायकवाड, प्रा.अशोक नवले, बाळासाहेब काटकर, बबनराव जानकर, डॉ.पियुष साळुंखे पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व दिपप्रज्वलनाने करण्यात आली. यांप्रसंगी जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी, संस्थाध्यक्ष, प्राचार्य, शिक्षक, पालक यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

> **'ए.आय.'मुळे नवीन रोजगार**
>
> 'ए.आय.' मुळे नोकऱ्या कमी होणार नसून नव्या प्रकारच्या रोजगार संधी निर्माण होतील.भविष्यात जमिनींचे एक्स-रे काढणारे तंत्रज्ञान, अपघात प्रतिबंधक संशोधन आणि अनेक नाविन्यपूर्ण शोध मानवजातींच्या सेवेसाठी उपलब्ध होतील.
>
> **प्रा.विजय नवले**

### सांगोला महाविद्यालयात योग दिन साजरा

**सांगोला, दि. २४ जून-**

आंतरराष्ट्रीय योग दिन सांगोला महाविद्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी योगाचे महत्त्व सांगून हे आरोग्यासाठी किती आवश्यक आहे याबद्दल माहिती सांगितली. डॉ. विजयकुमार गाडेकर व प्रा.जगदिश चेडे यांनी योगासने प्रात्यक्षिक करून दाखवली व त्यानंतर सर्वांकडून क्रमाने योनासने करून घेतली. या कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, एन.सी.सी कॅडेट, एन.एस.एस स्वयंसेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुगळी परिसरात एकाच एसटीमुळे गैरसोय

**विद्यार्थ्यांसह शेतकरी, व्यापारी, नागरिकांना इच्छित स्थळी जाणे होतेय अवघड**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि २४ जून -**

अक्कलकोट तालुक्यातील महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील मुगळी आणि परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून दिवसभरातून केवळ एकच एसटी बस धावत आहे. यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांसह शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. त्याविरोधात शिवसेनेचे सलगर जिल्हा परिषद सदस्य शिवराज म्हेत्रे यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

शिवराज म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली अक्कलकोट पंचायत समिती सदस्या संगीता पाटील व शिवसेनेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या अक्कलकोट आगारप्रमुखांची भेट घेतली. त्यांना निवेदन दिले. तसेच या भागातील नागरिकांच्या समस्यांवर सविस्तर चर्चा करून तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली. मुगळी गणातील नागूर, इब्राहिमपूर, मुगळी यांसह परिसरातील इतर गावांमधील विद्यार्थी व विद्यार्थिनी शाळा-महाविद्यालयासाठी, नागरिक विविध कामांसाठी सकाळच्या बसने मैंदर्गी आणि अक्कलकोटला येतात. मात्र, दुपारच्या वेळी गावी परतण्यासाठी एकही बस उपलब्ध नसल्यामुळे, त्यांना काम संपल्यानंतर थेट सायंकाळी ६ वाजेपर्यंत बसस्थानकात ताटकळत बसावे लागते.

विद्यार्थिनींना आणि महिलांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक नागरिकांना नाईलाजाने अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. परिणामी प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. ही गंभीर अडचण सोडवण्यासाठी दुपारी १ वाजता अतिरिक्त बसफेरी सुरू करणे अत्यंत आवश्यक असल्याचे शिष्टमंडळाने आगार प्रमुखांच्या निदर्शनास आणून दिले. यावर आगार प्रमुखांनी सकारात्मक प्रतिसाद देत येत्या दोन दिवसांत या मार्गावर दुपारची अतिरिक्त बस सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे.

> **... तर शिवसेना स्टाईल आंदोलन**
>
> आम्ही आगार प्रमुखांशी चर्चा केली. त्यांनी दोन दिवसांत बस सुरू करण्याची ग्वाही दिली आहे. जर दिलेल्या मुदतीत अतिरिक्त बससेवा सुरू झाली नाही, तर शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
>
> **शिवराज म्हेत्रे**
> सदस्य, सलगर जिल्हा परिषद.



### पीएनजी ज्वेलर्सतर्फे 'प्युअर पर्पल' एक्सक्लुझिव ज्वेलरी शोचे आयोजन

**सोलापूर, दि. २४ जून-**

पीएनजी ज्वेलर्सतर्फे आयोजित प्युअर पर्पल एक्सक्लुझिव ज्वेलरी शोचे आज उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, नेहा खरटमल, शांता चव्हाण, सुप्रिया जाधव, गंगा लोणी, अनुराधा बारड, जयश्री उजळंबे, वैभव पाटील यांच्या हस्ते शोचे उद्घाटन झाले. शोमध्ये गोल्ड, डायमंड, पोलकी आणि कुंदन या श्रेणीतील नाविन्यपूर्ण, आकर्षक आणि उत्कृष्ट दर्जेदार दागिन्यांचे खास कलेक्शन सोलापूरकरांसाठी उपलब्ध केले आहे. आधुनिक डिझाईन, पारंपरिक सौंदर्य आणि उत्कृष्ट कारागिरीचा संगम असलेले हे दागिने ग्राहकांचे विशेष आकर्षण ठरत आहेत. हा ज्वेलरी शो २० ते २८ जून दरम्यान पीएनजी ज्वेलर्स, ओल्ड एम्प्लॉयमेंट चौक, ध्रुव हॉटेलसमोर येथे सर्वांसाठी खुला आहे.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पंढरपुरात मनमानी भाडे आकारणीवर होणार कारवाई

**सोलापूर, दि. २४ जून -**

आषाढी एकादशी महासोहळा २०२६ च्या पार्श्वभूमीवर पंढरपूरात येणाऱ्या भविकांच्या सेवेसाठी जिल्हा प्रशासन दक्ष झाले आहे. पंढरपूर शहर व परिसरात धावणाऱ्या ऑटो रिक्षांवर संयुक्त धडक मोहीम राबविण्यात येत असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

वैध चालक परवाना नसताना प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा चालकांवरही कारवाई करुन संबंधित वाहने जप्त करण्यात येतील. प्रशासनाने निश्चित केलेल्या दरांपेक्षा जास्त भाडे आकारणाऱ्या किंवा मनमानी पद्धतीने पैसे वसूल करणाऱ्या रिक्षा चालकांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात येतील. नियमबाह्य व जादा प्रवासी वाहतुकीवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

रिक्षा चालकांना वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र, विमा आणि चालक परवाना सोबत बाळगणे बंधनकारक आहे. तसेच, निश्चित केलेले भाडेपत्रक प्रवाशांना स्पष्ट दिसेल अशा ठिकाणी लावणे आवश्यक आहे. प्रवासी व वारकऱ्यांनी कोणत्याही रिक्षा चालकाकडून जादा भाड्याची मागणी झाल्यास किंवा गैरवर्तन झाल्यास तात्काळ परिवहन विभागाच्या मदत कक्षाशी (०२१७-२३०३०९९) संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे. निर्णयामुळे रिक्षा चालकांना दक्षता घ्यावी लागणार आहे.



## महत्त्वाचे...



### प्रा.बबन गायकवाड यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप

**सांगोला,दि.२४ जून-**

सेवानिवृत्तीनिमित्त सांगोला महाविद्यालयाचे प्रा.बबन गायकवाड यांनी कडलास येथील जि.प.प्रा.शाळा करलवस्ती, महांकाळवाडी व विठ्ठलवाडी येथे २० डझन वह्या विद्यार्थ्यांना वाटप केल्या. यावेळी आपुलकी मित्रमंडळचे उपाध्यक्ष विश्वनाथ शिंदे, इंजि.नितीन गायकवाड उपस्थित होते.

### पोलिस महानिरिक्षकांची मंगळवेढा पोलिस स्टेशनला धावती भेट

**मंगळवेढा दि. २४ जून -**



मंगळवेढा पोलिस स्टेशनला कोल्हापूर परिक्षेत्राचे नूतन पोलिस म हानिरिक्षक रंजनकुमार शर्मा यांनी नुकतीच धावती भेट दिली. कामकाजाचा आढावा घेवून काही महत्वाच्या सूचना केल्याचे पोलिस सुत्रांकडून सांगण्यात आले. शर्मा हे पंढरपूर येथे आले होते. तदनंतर त्यांनी अचानक मंगळवेढा पोलिस स्टेशनला धावती भेट दिली. पोलिस स्टेशन व परिसराची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला.महत्वाच्या पोलिस कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या. ते प्रथमच मंगळवेढा पोलिस स्टेशनला आल्याने त्यांचे स्वागत पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरिगिड्डे यांनी केले. यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक विनोद लातूरकर,पोलिस उपनिरिक्षक नागेश बनकर, विजय पिसे, महिला पोलिस उपनिरिक्षक डॉ.आरती कणिरे यांच्यासह पोलिस ठाण्यातील सर्व अंमलदार आदी उपस्थित होते.

### अवैधरित्या सावकारी; नगरसेवक लखन कोळी यांच्यावर गुन्हा

**मोहोळ, दि. २४ जून-**

अवैधरित्या सावकारी करत असल्याचे आढळून आल्यामुळे मोहोळचे नगरसेवक लखन कोळी यांच्याविरुद्ध मोहोळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यामुळे शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

मोहोळ पोलीस स्टेशन आणि सहायक निबंधक सहकारी संस्था मोहोळ यांच्या कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार याविषयीची तक्रार कोन्हेरी येथील अण्णासाहेब शेटे, विशाल शेटे आणि सुवर्णा शेटे यांनी दाखल केली होती. त्यानुसार शेटे कुटुंबीयांनी लखन कोळी यांच्याकडून ४ लाख रुपये व्याजाने घेतले होते. शेटे यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी ती सर्व रक्कम परत केली. मात्र १५ टक्के प्रमाणे व्याजाने ८ लाख रुपये तुमच्याकडे शिल्लक राहतात. ते दिल्याशिवाय तुमची बुलेट क्रमांक एम एच १३ डिओ ७८७१ व मारुती कार क्र. एम एच१३ / परत देणार नाही असे सांगितले. यामुळे शेटे कुटुंबीयांनी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे तक्रार केली होती. तक्रारीची शहानिशा करून व त्यांचे जाबजबाव घेऊन दि. २३ जून रोजी जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड आणि मोहोळचे सहायक निबंधक सुमित कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख एस.टी.शिंदे, के.बी.जमादार, डी. एस. साळुंके, संदीप शेंद्रे हे लखन कोळी यांच्या घरी गेले. सर्व झाडा झडती घेऊन तेथे तपासणी करण्यात आली. त्यावेळी लखन कोळी यांच्या घरात अनेक व्यक्तींचे सह्या असलेले कोरे चेक, त्याचबरोबर शंभर रुपयाचे काही स्टॅम्प आढळून आले. त्यामुळे लखन कोळी यांच्याविरुद्ध महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम ३९,४१(ग)अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मिलिंद नगरात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २४ जून-**

अज्ञात कारणावरून एका तरुणाने घरातील छताच्या लोखंडी पाईपला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मनोहरनगर झोपडपट्टी येथे मंगळवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. संकेत नाईकनवरे (वय २५, रा.१३७ बुधवारपेठ, मिलिंदनगर सोलापूर) असे मयत तरुणाचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास त्याचा मृतदेह मनोहरनगर झोपडपट्टी येथील अनिता धोत्रे यांच्या घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत मिळून आला. ही खबर फौजदार चावडी पोलिसांना समजली असता पोलीस हवालदार बी.जे. कसबे यांनी घटनास्थळी पोहचून इतरांच्या साहाय्याने गळफास सोडवून मृतदेह येथील शासकीय रुग्णालयात संध्याकाळी दाखल केला असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## कृषी विभागाला वाढीव निधीचा प्रस्ताव

### जिल्हा परिषद अर्थ समितीत विकासकामांवर भर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २४ जून-**



जिल्हा परिषद सोलापूरच्या अर्थ व बांधकाम समितीच्या बैठकीत कृषी विभागाला जिल्हा परिषद सेस निधीतून अधिक आर्थिक तरतूद करण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील विकासकामांना गती देण्यासाठी आणि शेतकरी हिताच्या योजनांची प्रभावी अंम लबजावणी करण्याच्या दृष्टीने हा मुद्दा बैठकीचा केंद्रबिंदू ठरला. यावेळी जिल्हा परिषद सदस्य चरण हनुमंत चवरे, अर्जुनसिंह मदनसिंह मोहिते पाटील, पुनम सुदर्शन इंगवले, रेश्मा देवेंद्र डोके यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम समितीचे सभापती इंद्रजीत पवार यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २४) ही बैठक पार पडली. बैठकीत विविध आर्थिक व प्रशासकीय विषयांचा आढावा घेण्यात आला. सुरुवातीला दि. २६ मे रोजी झालेल्या मागील बैठकीच्या कार्यवृत्तांतास मंजुरी देण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या नव्या शासन निर्णयांचे वाचन करून त्यांची नोंद घेण्यात आली. अर्थ विभागाच्या लेखा विषयक नोंदवह्यांचा आढावा घेऊन त्या अद्ययावत असल्याचे समितीने नमूद केले.

बैठकीदरम्यान सभापतींच्या परवानगीने आयत्या वेळचे काही महत्त्वाचे विषयही चर्चेस घेण्यात आले. विशेषतः कृषी विभागाच्या विविध योजनांची व्याप्ती वाढत असल्याने जिल्हा परिषद सेस निधीतून अतिरिक्त आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याबाबत सदस्यांनी चर्चा केली. यामुळे शेतकरी केंद्रित उपक्रमांना बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

**निर्णय प्रक्रियेला दिशा**

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे, आर्थिक शिस्त राखणे आणि उपलब्ध निधींचा लोकहितासाठी परिणामकारक वापर करणे या दृष्टीने समितीच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय प्रक्रियेला दिशा देण्यात आली.

**- इंद्रजीत पवार,**
उपाध्यक्ष तथा सभापती अर्थ व बांधकाम विभाग





## दिघंची जिल्हा हद्द ते वाणी चिंचाळे भोसे रस्त्यासाठी ३४२ कोटी मंजूर

### आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२४ जून-**

आ.बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे दिघंची जिल्हा हद्द ते खवासपूर-लोटेवाडी-सोनलवाडी ते भोसे रस्ता राज्य मार्ग ३८६ साठी ३४२ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी केली होती. त्याची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी तत्काळ निधी मंजूर केला. या रस्त्यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतमाल वा००हतुकीसाठी मोठा फायदा होणार आहे. सदरचा निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

## उळे गावात पालखी मुक्कामासाठी विकासनिधीचा प्रस्ताव

**पत्राशेड, रस्ते व मूलभूत सुविधांसह पथदिवे उभारण्याची नेताजी खंडागळे यांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जून-**

संतश्रेष्ठ श्री गजानन महाराजांच्या पालखी सोहळ्यादरम्यान उळे (ता. दक्षिण सोलापूर)तील सुविधा सक्षम करण्यासाठी विकासनिधी उपलब्ध करून देण्याची मागणी जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे यांनी जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांच्याकडे केली आहे.

ब्रह्मांडनायक श्री गजानन महाराजांच्या पालखी मुक्कामाच्या ठिकाणी भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जिल्हा परिषद ग्रामपंचायत विभाग आणि सेस फंडातून निधीची तरतूद करण्याचा प्रस्ताव दिला आहे. जिल्हा परिषद सदस्य नेताजी खंडागळे यांनी याबाबत निवेदन सादर केले आहे. पालखी मुक्कामस्थळी तात्पुरते तसेच कायमस्वरूपी पत्राशेड उभारणे, पथदिवे, रस्त्यांची डागडुजीची मागणी केली आहे. मुक्कामस्थळी सावली, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि सुरक्षित वाहतुकीसाठी मूलभूत सुविधा निर्माण करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद आहे. यासंदर्भात ग्रामपंचायत विभागामार्फत किरकोळ आणि तातडीच्या कामांसाठी पाच लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

## पानगाव आरोग्य केंद्रातील गैरव्यवहारांची चौकशी सुरू



### उपचारातील हलगर्जीपणा व पैशांच्या मागणीच्या तक्रारींनंतर प्रशासन ॲक्शन मोडवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२४ जून-**

पानगाव प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय सेवांबाबत गंभीर तक्रारी समोर आल्यानंतर आरोग्य प्रशासन खडबडून जागे झाले असून, संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी सुरू करण्यात आली आहे. अपघातग्रस्त रुग्णाला वेळेत प्राथमिक उपचार न मिळाल्याचा आरोप तसेच गर्भवती महिलांच्या प्रसूतीसाठी पैशांची मागणी केल्याच्या तक्रारींमुळे या प्रकरणाला गांभीर्य प्राप्त झाले आहे.

या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी पानगाव आरोग्य केंद्राला भेट देत प्रत्यक्ष पाहणी केली. आरोग्य केंद्रातील सेवा, उपलब्ध मनुष्यबळ, रुग्णसेवा आणि तक्रारींशी संबंधित बाबींचा आढावा घेण्यात आला. तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

दरम्यान, ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आणि मोफत आरोग्य सेवा देण्यासाठी शासन प्रयत्नशील असताना अशा प्रकारच्या तक्रारी गंभीर स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे चौकशी अहवालानुसार जबाबदार व्यक्तींवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. या घटनेमुळे ग्रामीण आरोग्य यंत्रणेतील सेवा गुणवत्ता, जबाबदारी आणि पारदर्शकतेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून नागरिकांमध्येही आरोग्य सेवांबाबत जागरूकता वाढविण्याची गरज व्यक्त होत आहे.



रुग्णांना वेळेत उपचार मिळणे आणि शासकीय आरोग्य सेवा पारदर्शकपणे उपलब्ध होणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. पानगाव येथील घटनेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींची चौकशी सुरू असून संबंधित तालुका आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या भूमिकेचीही तपासणी करण्यात येत आहे.

**-दीपक वैद्य,**
अध्यक्ष, जिल्हा परिषद.

## अक्कलकोट तालुक्यात शेतकरी वर्ग पावसाअभावी चिंतेत

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि २४ जून -**

तालुक्यातील शेतकरी वर्ग मोठ्या पावसाच्या प्रतीक्षेत आहे. जून महिना संपत आला तरी अद्यापही थोडा देखील पाऊस झाला नाही. परिणामी खरीप पेरण्या रखडल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. शेतकरी वर्ग चातकाप्रमाणे आकाशाकडे टक लावून बसला आहे .

खरीप हंगाम २०२५ अतिवृष्टीने गेला, आता यंदाचा खरीप अनावृष्टीने जातो काय अशी स्थिती निर्माण होत आहे. अक्कलकोट तालुक्यात शेतकऱ्यांनी खरीप पेरणीसाठी बियाणे, खते याची जुळवणी करून ठेवलेली आहे. पण यंदा मे महिन्यात अवकाळी पाऊसही झाला नाही. जून महिना संपत आहे तरीही पावसाचा पत्ता नाही. थोडेफार ढग येतात, वारा वाहतो. पण अद्यापही पावसाने सुरवात न केल्याने शेतकऱ्याची चिंता वाढली आहे. उन्हाळ्यात कशी बशी जगवलेली केळीची बाग, ऊस, चिक्कू, भाजीपाला टमाटे, वांगी, काकडी, कोबी आदी पिके विहिरी व कुपनलिकेतील पाणी कमी झाल्याने व पाऊस लांबल्याने जगविणे कठीण झाले आहे. हंगामी भाजीपाला पिकवणेही शेतकऱ्यांना कठीण बनले आहे. जमिनीतील पाण्याची पातळी खालावल्याने कुपनलिका १ तास चालणेही कठीण झाल्याने ऊस जळून जात आहे. परिणामी यंदा साखर कारखानेही अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मागील खरीप, रब्बी पिक विमा बाबत साऱ्यांचे मौन

खरीप हंगाम २०२५ व रब्बी हंगाम २०२५ साठी अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांनी पिक विमा भरला. अतिवृष्टीने खरीप हंगाम २०२५ मधील सर्व पिके गेली. सरकारने महसुल यंत्रणेमार्फत पिकाचे पंचनामे करून मदत केली. पण शेतकऱ्यांनी पिक विमा भरूनही खरीप पिक विमा २०२५ चा पिक विमा प्राप्त झाला नाही.

परिणामी शेतकऱ्यांमध्ये पिक विमा कंपनीबद्दल तीव्र संताप व्यक्त होत आहे. खरीप हंगाम २०२५ पिक विमा मिळण्याबाबत शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत, अशी मागणी उ.बा.ठा. शिवसेना कार्यकर्ते रवि डोके, विजयकुमार शिंदे, माजी तालुकाप्रमुख सोपान निकते, मनोज पवार यांनी केली आहे.

### सलगरवाडीत घरगुती भांडणात एकाने घेतला गळफास

**सोलापूर, दि.२४ जून-**

घरगुती भांडणातून एका ४० वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. सलगरवाडी येथील डोणगाव रोडजवळ मंगळवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. रविकांत मारुती खांडेकर असे गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे. घरच्यांना ही बाब समजताच त्याला फासातून सोडवून भाऊ किरण त्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात रात्री दाखल केले.

## महापुरातील शेतकरी नऊ महिन्यानंतरही मदतीपासून वंचित

### सरकारने नियमावलीत बदल करून मदत करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा । शेखर म्हेत्रे**
**माढा, दि. २४ जून-**

माढा तालुक्यात सप्टेंबर २०२५ मध्ये सीना नदीत आलेल्या महापुरात अनेक शेतकऱ्यांच्या पिकासह जमिनीही वाहून गेल्या. मात्र नऊ महिन्यानंतरही अनेक शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. काही शेतकऱ्यांना मदत मिळाली आहे, पण ती खूपच तोकडी आहे.

ज्या शेतकऱ्यांची जमीन खरवडून गेली आहे, त्यांना सरकारने साडेतीन लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. यामध्ये ४७ हजार रुपये थेट स्वरुपात तर तीन लाख रुपये मनरेगाच्या माध्यमातून देण्याचे जाहीर केले होते. मात्र अनेक शेतकऱ्यांना ही मदत मिळाली नाही. शासनाच्या अटी आणि शर्तीमुळे अनेक शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. ज्या शेतकऱ्यांना मदत मिळाली, त्यामध्ये खरवडून गेलेली जमीन नीट करणे शक्य नाही. कारण शेतात दहा दहा फुटाचे खड्डे



पडले आहेत.

जमिनी खरवडून गेल्यामुळे नापीक बनल्या आहेत. अनेक ठिकाणी नदीची वाळू शेतात येऊन बसली आहे. त्यामुळे आमचे पुनर्वसन करावे अशी मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे. काही शेतकऱ्यांनी सरकारी मदतीची वाट पाहून अखेर व्याजाने पैसे काढून जमिनी नीट करण्यास सुरुवात केली आहे. महापुरामध्ये जमिनी वाहून गेल्यामुळे आमच्या मुलांची लग्न होत नसल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली. जमीन बघून आलेले लोक माघारी जात असल्याचं शेतकऱ्यांनी सांगितलं.

यामुळे शेतकऱ्यांचं मानसिक आरोग्यही खचत चालले आहे. सरकारने आमच्याकडे लवकरात लवकर लक्ष द्यावं; नाहीतर आत्महत्या करण्याशिवाय आमच्याकडे पर्याय नाही, अशा भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत.

सप्टेंबर २०२५ मध्ये सीना नदीला आलेल्या महापुरात माझी साडेतीन एकर केळीची बाग आणि दोन एकर ऊस जमिनीसकट वाहून गेला होता. निर्यातक्षम केळी तयार झाली होती.

विक्रीसाठी आलेली केळी महापुरानं उद्ध्वस्त केली. म हापुरानं आमच्या तोंडचा घास हिरावल्याचे शेतकरी शंकर लटके यांनी सांगितले.

सीना नदीला आलेल्या महापुरात माझी सर्व पाच एकर जमिन ऊसासकट वाहून गेली. या नुकसानीचे मला फक्त ८० हजार रुपये मिळाले आहेत. या पैशात काहीच होणार नाही. त्यामुळं सरकारनं आम्हाला दुसरीकडे जमीन देऊन पूनर्वसन करावे. आमच्यावर आत्म हत्या करण्याचे वेळ आली आहे.

**-दत्तात्रय धर्मे,** पूरग्रस्त शेतकरी, केवड

ज्यांच्या जमिनी खरवडून गेल्या, त्यांना सरकारने साडेतीन लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. मात्र, माझं एवढं नुकसान होऊनही सरकारची एक रुपयाची मदतही मि ळालेली नाही. आता मी व्याजाने पैसे काढून माझी जमीन नीट करत आहे.

**-शंकर लटके,** पूरग्रस्त शेतकरी, केवड

महापुरात माझा दोन एकर उस जमिनीसकट वाहून गेला होता. एक टिपरुही जमिनीवर राहीलं नाही. मला सरकारची १ रुपयाची मदत देखील मिळाली नाही. बँकेचं माझ्यावर कर्ज आहे. ते कर्ज मी कसे भरायचे? आमच्यावर आत्महत्या करण्याचे वेळ आली आहे.

**-जालिंदर धर्मे,** पूरग्रस्त शेतकरी, केवड.